भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणें

त्रैमासिक

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

खंड १५

वर्ष ५३ : अंक १-४

संपादक समिति

१ डॉ. अ रा. कुलकर्णी (कार्यकारी संपादक)

२ प्रा. ग. ह. खरे

३ श्री. दि. वि. काळे

४ श्री. स. मा. गर्गे

५ श्री. वि. त्र्यं. शेटे

६ प्रा. रा. वि. ओतुरकर

७ श्री. बापूराव नाईक

विनंती

हें मंडळ आजही मुख्यतः लोकाश्रयावर अवलंबून आहे. म्हणून आम्ही सर्व वाचकांस अत्यंत नम्र व कळकळीची विनंती करतों कीं, त्यांनी

(१) आपल्याजवळ असलेल्या ताम्रपट, नाणीं, कागदपत्र, पोथ्या, हत्यारें, इ. वस्तू मंडळास देऊन,

(२) या मंडळाचे अधिकांत अधिक वरच्या वर्गाचे सभासद होऊन,

(३) मंडळास हस्ते, परहस्ते, अधिकांत अधिक मोठी देणगी देऊन,

(४) उच्च कोटीचें लिखाण प्रकाशनासाठी पाठवून,

(५) मंडळानें स्वतः प्रकाशिलेलीं अथवा इतरांनीं प्रकाशित केलेलीं भारतीय इतिहास व संस्कृति या विषयांचीं पुस्तकें विकत घेऊन,

मंडळाची समानधाकारक प्रगति होण्यास साह्य करावें.

चिटणीस—भा. इ. सं. मंडळ

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ व ओतुरकर निधि--पुरस्कृत

भारत इतिहास संशोधक मंडळ, स्वीय माला १०७

वर्ष ५३]   त्रैमासिक   [अंक १–४

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

खंड ~~१४~~ १५

प्रा. रा. वि. ओतुरकर यांना सादर अर्पण

शक १८९४ चा जोड अंक

प्रसिद्धिवर्ष : रा. श. ३००, शा. श. १८९५, इ. १९७४.

अनुक्रमणिका

निवेदन

भा. इ. सं. मंडळाचा हा शक १८९४ चा जोड अंक आम्ही कृतज्ञतापूर्वक प्रा. रा. वि. ओतुरकर यांना अर्पण करीत आहोत. प्रा. ओतुरकरांनी मंडळावर अमाप उपकार केले आहेत. आजीव सभासद, कारभारी मंडळाचे सभासद आणि चिटणीस या विविध नात्यांनी त्यांनी मंडळाची सेवा केली आहे. विद्यमान कारभारी मंडळाचे ते सभासद आहेत. मंडळाच्या कार्याला हातभार लावण्यासाठी त्यांनी २५ हजार रुपयांची देणगी दिली आहे. इतिहासाच्या एका शिक्षकाने आपल्या मर्यादित उत्पन्नातून कणशः बचत करून ही देणगी दिली आहे त्यामुळे ती अत्यंत मोलाची आहे. प्रा. ओतुरकरांचा परिचय करून देणारा एक लेख तसेच त्यांच्या या देणगीसंबंधीच्या निधीची माहिती या अंकात इतरत्र आढळेल.

प्रस्तुत अंकाचा एक विशेष म्हणजे श्री. रा. पां. गोस्वामी संपादित संस्कृत भाषेतील एक शिवकाव्य. श्री. सकळकळे यांनी रचलेल्या काव्यातील शिवकाव्याचा काही भाग येथे आम्ही मुद्रित केला आहे. राज्याभिषेक त्रिशतसांवत्सरिक समारोहाच्या सुमारास प्रसिद्ध होणारे हे संस्कृतकाव्य इतिहासप्रेमी लोकांना आवडेल अशी पेक्षा आहे. या खेरीज डॉ. वि. वि. भिडे यांचे ब्राह्मणकालीन समाजदर्शन आणि प्रा. अ. रा. कुलकर्णी यांचा अक्कलकोट प्रकरण हे दोन संशोधनपर निबंध व प्रा. दि. के. देशपांडे यांचा प्रा. ओतुरकरांचा परिचय करून देणारा लेख यांत समाविष्ट केलेले आहेत.

त्रैमासिकाचा शक १८९५ चा जोड अंक त्रिशतसांवत्सरिक राज्याभिषेकाच्या निमित्ताने येत्या जूनमध्ये प्रसिद्ध होईल. शिवकालातील फार्सी ऐतिहासिक साधनांचा हा खंड राहील. विविध भाषेतील अस्सल साधने इतिहास संशोधकांना उपलब्ध करून देणे हे या मंडळाचे एक प्रमुख कार्य आहे व ते अविरतपणे हे मंडळ पार पाडीत आले आहे. ही फार्सी साधने शिवकालाच्या अभ्यासास उपयक्त ठरणारी आहेत. प्रा. ग. ह खरे हे या साधनांचे संपादक आहेत.

बिकानेर आणि अन्य ठिकाणाहून मिळविलेल्या फार्सी साहित्याचा एक संग्रह " औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार " हा प्रा. खरे यांनी संपादिलेला ऐतिहासिक फार्सी साहित्य सहावा खंड अभ्यासकांना सादर करताना आम्हास अत्यंत आनंद होत आहे. या ग्रंथाची निर्मिती व प्रकाशन यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संकृती मंडळ, पुणे, शिवाजी व मराठवाडा विद्यापीठे, विद्यापीठ अनुदानमंडळ आणि श्री. वि. द. घाटे यांनी अनुदान दिले आहे. मंडळ या सर्वांचे अत्यंत ऋणी आहे. ' वकील रिपोर्टस ' वर आधारित आणखी एक ऐतिहासिक फार्सी साहित्याचा खंड लौकरच

प्रसिद्ध करण्यात येईल. ही साधन सामुग्री संशोधकाना उपलब्ध करून देण्याचे सारे श्रेय प्रा. ग. ह. खरे आणि त्यांचे सहकारी यांना द्यावयास हवे.

मंडळाचे वार्षिक संमेलन मे च्या २५, २६, २७ या तारखांना भरेल. या संमेलनासाठी तसेच दि. २१ जून रोजी येणाऱ्या वाढदिवसासाठी संशोधकांनी शोध निबंध पाठवेत व या दोन्ही कार्यक्रमांत भाग घ्यावा अशी विनंती आहे. त्रिशत-सांवत्सरिक राज्याभिषेक समारोहाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आढावा घेणारे शोध निबंध वाचले जावेत अशी अपेक्षा आहे.

विद्यमान कारभारी मंडळाची मुदत या फाल्गुन अखेर संपेल. त्रैवार्षिक निवड-कीच्या कार्यास प्रारंभ झाला आहे. मतदारांच्या याद्या रवाना झाल्या आहेत. मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात या निवडणुका पूर्ण होतील व नवीन कारभारी मंडळ अधिकारपदावर येईल. गेल्या दीड वर्षाच्या कालात आम्हास संस्थेच्या सभासदांनी जे सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचे हार्दिक आभार मानतो. तसेच हा अंक सिद्ध करण्याचे कामी मंडळाचे क्यूरेटर प्रा. मा. चि टेंभेकर यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचेही आभार मानतो. लोकसंग्रह छापखान्याचे व्यवस्थापक श्री. सोनार यांनी छपाईच्या कामात आम्हास संपूर्ण सहाय्य केले. मंडळ त्यांचे आभारी आहे.

शा. १८९५ फा. व॥ ३ शिवजयंती
११ मार्च, १९७४

अ. रा. कुलकर्णी
चिटणीस, कार्यकारी संपादक

दोन पिढ्यांचे इतिहास-शिक्षक



प्रा. राजाराम विनायक ओतुरकर

ब्राह्मणकालीन समाजदर्शन*

डॉ. विद्याधर विश्वनाथ भिडे

[व्याख्यान पहिले]

सन्माननीय अध्यक्ष, भारत इतिहास संशोधक मंडळाचे चिटणीस आणि उपस्थित विद्वज्जनहो,

इचलकरंजीकर स्मृतिदिनानिमित्त मी व्याख्याने द्यावीत असे अनेक वेळा सुचविले गेले, पण मी त्यास नकार दिला होता. यावर्षी मंडळाचे चिटणीस प्रा. ग. ह. खरे यांनी व्याख्याने देण्याचा आग्रहच केला. त्यामुळे मी आपणासमोर माझा विषय मांडणार आहे. माझे गुरुजन ही व्याख्याने ऐकण्यास उपस्थित आहेत, म्हणून मला अधिकच समाधान वाटत आहे, भीतीही वाटत आहे. तरी हीच खरी परीक्षा आहे, असे समजून मी माझ्या विषयाकडे वळतो.

'ब्राह्मणकालीन समाजदर्शन' हा विषय पुष्कळ मोठा असला, तरी संक्षेपरूपाने तो दोन व्याख्यानांतच सांगण्याचा प्रयत्न मी करणार आहे.

ब्राह्मण म्हणजे काय ?

संपूर्ण वैदिक वाङमयाचे संहिता, ब्राह्मण, आरण्यक व उपनिषदे असे चार भाग कल्पिले आहेत. त्यांत ब्राह्मणग्रंथ हा एक महत्त्वाचा भाग आहे. परंतु संहिता व ब्राह्मण हेच खरे भाग असून आरण्यके व उपनिषदे ही मुख्यतः ब्राह्मणांतच समाविष्ट आहेत. त्यामुळेच वेदाचे लक्षण करताना प्राचीन सूत्रकारांनी "मन्त्रब्राह्मणयोर्वेद-नामधेयम्" (म्हणजे मंत्र व ब्राह्मण यानाच वेद असे नाव आहे[1]) असे म्हटले आहे. संहिता या मंत्ररूप आहेत. म्हणजे त्या छंदोबद्ध आहेत; तर ब्राह्मणग्रंथ हे गद्यमय भाषेत असून त्यांत अनेक गद्यमंत्र (=यजुस्) व विवेचनात्मक भाग आहे. ब्राह्मण हा शब्द नपुंसकलिंगी असेल, तेव्हा त्याचा अर्थ 'वेदाचा भाग' असा होतो. या दृष्टीने वैदिक वाङमयात 'ब्राह्मणं' 'ब्राह्मणानि' ब्राह्मणेषु' इत्यादि प्रयोग आढळून येतात. अनेक मुद्यांचे विवेचन करून शेवटी 'इति ब्राह्मणम्' किंवा 'तस्योक्तं ब्राह्मणम्' असे वाक्य शतपथ ब्राह्मण, शाङखायन ब्राह्मण किंवा गोपथ ब्राह्मण यांत अनेक

* इचलकरंजीकर स्मृतिदिनानिमित्त आश्विन व॥ ७ व ८, शके १८९४, दि. २८ व २९।१०।१९७२ या दिवशी झालेली व्याख्यानें.

१. आपस्तंब श्रौतसूत्र २४.१.३१.

वेळा आले आहे. ब्राह्मण शब्दाचा अर्थ स्पष्ट करताना ज्ञानकोशात म्हटले आहे, की "ब्राह्मण या शब्दाचा मूळ अर्थ यज्ञकर्मामधील एखाद्या मुद्यावरील विद्वान् याज्ञिकाचे विवेचन असा आहे आणि या शब्दाचा समुदायविषयक अर्थ घेतल्यास यज्ञकर्मावरील याज्ञिकांच्या अशा चर्चांचा व विवेचनांचा संग्रह असा अर्थ निघतो."

ब्रह्मतत्त्वाचे प्रतिपादन करीत असल्यामुळे वेदांनाही ब्रह्म असे म्हणतात आणि या ब्रह्मप्रतिपादक वेदांचे रक्षण करणारे म्हणून ब्राह्मणांनाही ब्रह्म असे म्हटले आहे. ब्रह्म म्हणजे वेद जाणणारा तो ब्राह्मण अशा अर्थाने ब्राह्मण शब्द जातिवाचक, असाही वैदिक वाङ्मयात आढळून येतो. ब्रह्म हा शब्द 'बृह्' म्हणजे वाढणे या धातूपासून उत्पन्न होतो. म्हणून सर्वव्यापी परमात्मा म्हणजेच ब्रह्म. ब्रह्म म्हणजे वेद आणि त्या वेदांचा अर्थ सांगणारे ग्रंथ म्हणजे ब्राह्मण होत. ब्राह्मण या शब्दाचा व्युत्पत्तीने नीट अर्थ कळू शकत नाही, असे 'एन्साक्लोपीडिया ब्रिटानिका' या ज्ञानकोशात म्हटले आहे[1]. 'ब्रह्मन्' या शब्दाच्या अर्थात फरक दाखवताना स्वरभेद असल्याचेही दिसून येते. 'ब्र' उदात्त असेल, तेव्हा 'ब्रह्मन्' शब्दाचा अर्थ मंत्र असा घ्यावा, व 'ह्म' उदात्त असेल, तेव्हा त्याचा अर्थ ब्राह्मण व्यक्ति असा घ्यावा, असे ऋग्वेदातील अनेक उदाहरणांवरून दिसून येते. 'ब्रह्मासंबंधी जे' त्यास ब्राह्मण म्हणावे असा, मूळ 'ब्रह्मन्' शब्दावरून 'अण्' प्रत्यय होऊन, हा अर्थ मिळतो.[२] ब्राह्मण या शब्दाचा अर्थ अनेक प्रकारे होत असला, तरी प्रस्तुत विवेचनात सर्वत्र ब्राह्मण हा शब्द ब्राह्मणग्रंथ या अर्थानेच वापरला आहे.

ब्राह्मणग्रंथांचा विस्तार

वेदाच्या ज्या शाखा आहेत, त्यांचे पुष्कळ ब्राह्मणग्रंथ आजही उपलब्ध होतात. एकाच संहितेवर अनेक ब्राह्मणग्रंथ असल्याचेही दिसून येते.

ऋग्वेदाचे ऐतरेय, शाङ्खायन किंवा कौषीतकी असे दोनच ब्राह्मणग्रंथ उपलब्ध आहेत. कृष्ण यजुर्वेदाच्या चार शाखा उपलब्ध असल्या, तरी तैत्तिरीय ब्राह्मण असा एकच संपूर्ण ग्रंथ आढळून येतो. कठ शाखेचे कठ ब्राह्मण नावाचा एक त्रुटित ग्रंथही उपलब्ध झाला आहे. शुक्ल यजुर्वेदाच्या माध्यंदिन शाखेचे शतपथ ब्राह्मण व काण्व शाखेचे शतपथ ब्राह्मण असे दोन ब्राह्मणग्रंथ उपलब्ध आहेत. तथापि त्यांत फारच थोडा फरक आहे. सामवेदाच्या कौथुमी शाखेचे तांड्यमहाब्राह्मण किंवा पञ्चविंश ब्राह्मण या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. याशिवाय षड्विंश ब्राह्मण, सामविधान ब्राह्मण, मंत्र ब्राह्मण, आर्षेय ब्राह्मण, वंश ब्राह्मण, दैवत ब्राह्मण, संहितोपनिषद् ब्राह्मण असेही ब्राह्मणग्रंथ उपलब्ध आहेत. जैमिनी शाखेचे जैमिनीय ब्राह्मण किंवा

---

1. *The exact derivation and meaning of the name Brāhmaṇa is somewhat uncertain. Brahman is sacred utterance or rite.*

२. अष्टाध्यायी ४. ३. १२०—तस्येदम् ।

तलवकार ब्राह्मण आणि छन्दोग ब्राह्मण असे ब्राह्मणग्रंथ उपलब्ध आहेत. यावरून सामवेदाचे बरेच ब्राह्मणग्रंथ असल्याचे आढळून येते. परंतु अभ्यासाच्या दृष्टीने तांड्यमहाब्राह्मण हा एकच ग्रंथ महत्त्वाचा आहे. आणि इतर ब्राह्मणांचे स्वरूप प्रातिशाख्यासारखे आहे. अथर्ववेदाचे गोपथ ब्राह्मण हा एकच ग्रंथ उपलब्ध आहे. ब्राह्मणग्रंथांतील एकूण विषयाच्या दृष्टीने ऋग्वेदाचे ऐतरेय, यजुर्वेदाचे शतपथ व तैत्तिरीय ब्राह्मण आणि सामवेदाचे तांड्यब्राह्मण याच ग्रंथांचा विशेष अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

ब्राह्मणांचे उद्दिष्ट

ब्राह्मण हे संहितांनंतर निर्माण झालेले ग्रंथ आहेत, ही गोष्ट प्राचीन व अर्वाचीन सर्वच विद्वानांनी मानली आहे. संहितेमध्ये असलेल्या मंत्रांचा अर्थ सांगणे हे एक ब्राह्मणग्रंथांचे प्रमुख उद्दिष्ट आहे. तथापि मंत्रांचा अर्थ सांगण्यासाठीच केवळ या ग्रंथांची प्रवृत्ती झालेली नसल्याने प्रत्येक मंत्राचा पदशः अर्थ ब्राह्मणांत सांगितलेला नसतो. परंतु यज्ञांचे विधान सांगणे, हा ब्राह्मणांचा मुख्य विषय असल्यामुळे त्या त्या यज्ञात ज्या मंत्रांचा विनियोग करायचा त्या मंत्रांचा अर्थ कर्मानुरूप आहे हे दाखवण्यासाठीच मंत्रांचा अर्थ करण्याचा प्रयत्न ब्राह्मणकारांनी केलेला आढळून येतो. त्यामुळे मूळ मंत्रातील अर्थ वेगळा असला, तरी तो कर्मानुरूपच आहे हे दाखविण्यासाठी कित्येक वेळा अर्थाची ओढाताणही केलेली आढळून येते.

उदाहरणार्थ— "आगन् देव ऋतुभिर्वर्धतु क्षयं दधातु नः सविता सुप्रजामिषम्" (=सूर्यदेव आला आहे. तो ऋतूंसह वृद्धिगत होवो व आम्हाला उत्तमस्थान, सुप्रजा व अन्न देवो), हा मंत्र ऋग्वेदांत (४·५३·७) सूर्यास उद्देशून गायलेल्या सूक्तात आला आहे. परंतु ऐतरेय ब्राह्मणाने या मंत्राचा विनियोग अग्निष्टोम प्रकरणातील सोमक्रयात केला आहे. अर्थात् या मंत्राचा सोमाशी काहीतरी संबंध दाखवलाच पाहिजे. 'आगन्' या पदावरून 'सोमराजा आला आहे,' असा ब्राह्मणकाराने अर्थ केला आहे. पण मग ऋतू व सविता या शब्दांच्या अर्थाचे काय ? ऋतू हे सोमराजाचे भाऊबंद आहेत, असे ब्राह्मणांत म्हटले आहे, तर सवितृ म्हणजे प्रेरक एवढाच अर्थ केला आहे.[1]

"आ नो मित्रावरुणा" (ऋ. ३.६२.१६) या ऋचेवरील सामगान दीर्घ रोगाने पछाडलेला मनुष्य बरा व्हावा, म्हणून करण्यास सांगितलेल्या यज्ञात करावे, असे तांड्य ब्राह्मणात (६·१०·४—५) सांगितले आहे. मूळ मंत्रात मित्रावरुणांची स्तुती आहे. पण हा मंत्र ज्या कर्मांत म्हणावयाचा त्याच्याशी या मंत्राचा संबंध काय हे

[1] ऐतरेय ब्राह्मण. १.१३ –'आगन् देव इत्यन्वाह । आगतो हि स तर्हि भवति । ऋतुभिर्वर्धतु क्षयमित्यृतवो वै सोमस्य राज्ञो राजभ्रातरो यथा मनुष्यस्य तै रेवैनं तत् सहागमयति ।

दाखविताना तांड्यब्राह्मणात पुढे म्हटले आहे, की 'मित्र व वरुण यांचा संबंध प्राण व अपान यांच्याशी आहे. मित्र ही दिवसाची देवता असून ती प्राणाची प्रतिनिधि आहे; तर वरुण ही रात्रीची देवता असून ती अपानाशी संबंधित आहे. म्हणून या देवतांनी दीर्घ रोगाने पछाडलेल्या मनुष्याच्या शरीरात वास करावा व त्याच्या प्राणापानाचे नियमन करावे.'

ब्राह्मणग्रंथांत यज्ञांचेच तपशिलाने वर्णन आहे. म्हणून या ग्रंथांना यज्ञसंविधान किंवा विनियोगशास्त्र असे म्हणणे योग्य होईल. ब्राह्मणांचे अशा प्रकारचे महत्त्व सांगताना प्रो. मुखर्जी लिहितात—

Brāhmaṇas, the earliest indo-European prose literature, are theological treatises, explaining in minute details the Vedic sacrificial, ceremonial, and illustrating its value by numerous stories.[1] (अर्थ—ब्राह्मणग्रंथ अतिप्राचीन इंडो-युरोपिय गद्यात लिहिलेले दैवतशास्त्राचे ग्रंथ आहेत. वेदांतील यज्ञासंबंधी बारीक सारीक गोष्टीचे विधान करणे व त्यांच्या श्रेष्ठ ते-बंधी अनेक कथा सागणे हे ब्राह्मणग्रंथांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.)

ब्राह्मणांचे विषय

ब्राह्मणग्रंथांचा मुख्य विषय म्हणजे वेगवेगळ्या यज्ञांचे विधान सांगणे. पण हे सांगत असताना कोणत्या गोष्टी करू नयेत याचाही उल्लेख केलेला असतो. वाईट कर्माची निंदा किंवा अकर्माचा निषेध ब्राह्मणांत आहे. म्हणजे विधि व निषेध ब्राह्मणांत असतात. पण केवळ एवढाच भाग ब्राह्मणांत असता, तर त्यांचा एवढा विस्तार झाला नसता. परंतु ब्राह्मणग्रंथांचा जो विस्तार झाला आहे तो अर्थवादांनी होय. अर्थवाद म्हणजे कर्तव्य कर्माची स्तुती व निषिद्ध कर्माची निंदा होय. ('स्तुतिनिन्दान्यतरं वाक्यमर्थवादः') विधि, निषेध व अर्थवाद यांच्या बरोबरच कथाआख्याने, शब्दांच्या व्युत्पत्ती इत्यादी विषय ब्राह्मणांत आले आहेत. ब्राह्मणांचे स्वरूप सांगताना प्रसिद्ध पाश्चात्य पंडित वेबर याने म्हटले आहे, की—

We find in them (Br.) the oldest rituals we have, the oldest linguistic explanations, the oldest traditional and oldest philosophical speculations. (अर्थ—ब्राह्मणग्रंथांत आपल्याला सर्वांत जुना विधी, जुने भाषाशास्त्रीय विवेचन, सर्वात जुनी परंपरा आणि जुने तत्त्वज्ञान यांचा विचार आढळून येतो.)

जैमिनीच्या मीमांसासूत्रांवर भाष्य करताना शबराचार्यांनी (जै. सू. २.१.८ वरील भाष्य) ब्राह्मणग्रंथांचे दहा विषय सांगितले आहेत, ते असे—

---

१ *Hindu Civilization*, P. 90.

हेतुर्निर्वचनं निन्दा प्रशंसा संशयो विधिः ।
परक्रिया पुराकल्पो व्यवधारणकल्पना ।
उपमानं दशैते तु विधयो ब्राह्मणस्य तु ।

अर्थ–हेतू, शब्दांची व्युत्पत्ती, निषिद्ध कर्माची निन्दा, कर्तव्य कर्माची स्तुती, शंकाप्रदर्शित करणे (अमुक एक कर्म केले, तर फलाची प्राप्ति होईल की नाही), विधान करणे, दुसऱ्याने केलेल्या कर्माचे प्रतिपादन, पूर्वीच्या कथा, निश्चय करणे आणि उदाहरण सांगणे असे ब्राह्मणग्रंथांचे दहा विषय आहेत.

सायणाचार्यांच्या मते ब्राह्मणांचे विषय इतिहास, पुराणे, विद्या, उपनिषद्, श्लोक, सूत्र, व्याख्यान आणि अनुव्याख्यान असे आठ आहेत.

ब्राह्मणांचा मुख्य विषय म्हणजे यज्ञ होय. हे यज्ञ कोणते ? किती प्रकारचे ? हे यज्ञ कुणी करावे ? यज्ञांतील हवी कोणते ? ते यज्ञ केव्हा करावे ? इत्यादी अनेक विषयांची माहिती ब्राह्मणग्रंथात आली आहे. जे मूलभूत यज्ञ आहेत त्यांना प्रकृति असे म्हणतात, अर्थात् इतर यज्ञ हे विकृति याग होत. सप्त हविःसंस्था, सप्त सोमसंस्था आणि अहीन, सत्र, राजसूय, अश्वमेध यासारखे यज्ञ ब्राह्मणग्रंथांत सांगितले आहेत. काही यज्ञ हे एका व्यक्तीने करावयाचे आहेत; तर काही यज्ञ अनेकांच्या साहाय्याने करावयाचे असतात. काही यज्ञ हे ब्राह्मणांनी करावयाचे, काही केवळ क्षत्रियांनी करावयाचे, तर काही निषाद, स्थपती, इत्यादींनी करावयाचे आहेत. या सर्व यज्ञांची माहिती विस्ताराने येथे सांगणे शक्य नाही. म्हणून काही महत्त्वाच्या यज्ञांचा येथे थोडक्यात विचार करणे इष्ट होईल.

अग्निहोत्र म्हणजे रोजचा होम. गाईच्या दुधाने करावयाचा म्हणून गाईला अग्निहोत्री व दुधाला व्रत असे म्हटले आहे. दैनंदिन जीवनात याला विशेष महत्त्व आहे. हा होम व्यक्तिगत स्वरूपाचा आहे.

दर्शपूर्णमास, चातुर्मास्य, पशुबंध हे विशिष्ट काळी करावयाचे यज्ञ. या यज्ञांत, काही ऋत्विजांचे साहाय्य लागते. यांना साधनसामग्रीही बरीच लागते. ब्राह्मणग्रंथांत या यज्ञासंबंधी पुष्कळ चर्चा केली आहे.

सोमयाग हा एक महत्त्वाचा व मूलभूत असा यज्ञ आहे. यास अनेक ऋत्विज लागतात. अनेकांचे साहाय्य लागते आणि साधनसामग्रीही पुष्कळ लागते. सोम या वनस्पतीसंबंधी बारीक सारीक विधी सांगितले आहेत, ते असे—सोमक्रय, सोमानयन, सोमातिथ्य, सोमाभिषव, सोमग्रह, सोमाहुती, सोमपान. याशिवाय दीक्षाविधी, मंडपनिर्माण, पशुयाग, प्रातःसवन, माध्यंदिन सवन, तृतीयसवन, सामगान, शस्त्रपठन, अवभृतस्नान इत्यादी अनेक लहान मोठे विधी सांगितले आहेत.

वर उल्लेखिलेल्या यज्ञांसंबंधी तसेंच अश्वमेध, राजसूय, सत्र, चयने इत्यादी यज्ञांसंबंधी व प्रायचित्तांसंबंधी विस्ताराने माहिती मुख्यतः ऐतरेय, शतपथ आणि

दाखविताना तांड्यब्राह्मणात पुढे म्हटले आहे, की ‘मित्र व वरुण यांचा संबंध प्राण व अपान यांच्याशी आहे. मित्र ही दिवसाची देवता असून ती प्राणाची प्रतिनिधि आहे; तर वरुण ही रात्रीची देवता असून ती अपानाशी संबंधित आहे. म्हणून या देवतांनी दीर्घ रोगाने पछाडलेल्या मनुष्याच्या शरीरात वास करावा व त्याच्या प्राणापानाचे नियमन करावे.’

ब्राह्मणग्रंथांत यज्ञांचेच तपशिलाने वर्णन आहे. म्हणून या ग्रंथांना यज्ञसंविधान किंवा विनियोगशास्त्र असे म्हणणे योग्य होईल. ब्राह्मणांचे अशा प्रकारचे महत्त्व सांगताना प्रो. मुखर्जी लिहितात—

Brāhmaṇas, the earliest indo-European prose literature, are theological treatises, explaining in minute details the Vedic sacrificial, ceremonial, and illustrating its value by numerous stories.[1] (अर्थ—ब्राह्मणग्रंथ अतिप्राचीन इंडो-युरोपिय गद्यात लिहिलेले दैवतशास्त्राचे ग्रंथ आहेत. वेदांतील यज्ञासंबंधी बारीक सारीक गोष्टीचे विधान करणे व त्यांच्या श्रेष्ठतेबंधी अनेक कथा सागणे हे ब्राह्मणग्रंथांचे प्रमुख उद्दिष्ट आहे.)

ब्राह्मणांचे विषय

ब्राह्मणग्रंथांचा मुख्य विषय म्हणजे वेगवेगळ्या यज्ञांचे विधान सांगणे. पण हे सांगत असताना कोणत्या गोष्टी करू नयेत याचाही उल्लेख केलेला असतो. वाईट कर्माची निंदा किंवा अकर्माचा निषेध ब्राह्मणांत आहे. म्हणजे विधि व निषेध ब्राह्मणांत असतात. पण केवळ एवढाच भाग ब्राह्मणांत असता, तर त्यांचा एवढा विस्तार झाला नसता. परंतु ब्राह्मणग्रंथांचा जो विस्तार झाला आहे तो अर्थवादांनी होय. अर्थवाद म्हणजे कर्तव्य कर्माची स्तुती व निषिद्ध कर्माची निंदा होय. (स्तुतिनिन्दान्यतरं वाक्यमर्थवादः’) विधि, निषेध व अर्थवाद यांच्या बरोबरच कथा-आख्याने, शब्दांच्या व्युत्पत्ती इत्यादी विषय ब्राह्मणांत आले आहेत. ब्राह्मणांचे स्वरूप सांगताना प्रसिद्ध पाश्चात्य पंडित वेबर याने म्हटले आहे, की——

We find in them (Br.) the oldest rituals we have, the oldest linguistic explanations, the oldest traditional and oldest philosophical speculations. (अर्थ—ब्राह्मणग्रंथांत आपल्याला सर्वांत जुना विधी, जुने भाषाशास्त्रीय विवेचन, सर्वात जुनी परंपरा आणि जुने तत्त्वज्ञान यांचा विचार आढळून येतो.)

जैमिनीच्या मीमांसासूत्रांवर भाष्य करताना शबराचार्यांनी (जै. सू. २.१.८ वरील भाष्य) ब्राह्मणग्रंथांचे दहा विषय सांगितले आहेत, ते असे—

१ *Hindu Civilization*, P. 90.

हेतुर्निर्वचनं निन्दा प्रशंसा संशयो विधिः ।
परक्रिया पुराकल्पो व्यवधारणकल्पना ।
उपमानं दशैते तु विधयो ब्राह्मणस्य तु ।

अर्थ–हेतू, शब्दांची व्युत्पत्ती, निषिद्ध कर्माची निन्दा, कर्तव्य कर्माची स्तुती, शंकाप्रदर्शित करणे (अमुक एक कर्म केले, तर फलाची प्राप्ति होईल की नाही), विधान करणे, दुसऱ्याने केलेल्या कर्माचे प्रतिपादन, पूर्वीच्या कथा, निश्चय करणे आणि उदाहरण सांगणे असे ब्राह्मणग्रंथांचे दहा विषय आहेत.

सायणाचार्यांच्या मते ब्राह्मणांचे विषय इतिहास, पुराणे, विद्या, उपनिषद्, श्लोक, सूत्र, व्याख्यान आणि अनुव्याख्यान असे आठ आहेत.

ब्राह्मणांचा मुख्य विषय म्हणजे यज्ञ होय. हे यज्ञ कोणते ? किती प्रकारचे ? हे यज्ञ कुणी करावे ? यज्ञांतील हवी कोणते ? ते यज्ञ केव्हा करावे ? इत्यादी अनेक विषयांची माहिती ब्राह्मणग्रंथात आली आहे. जे मूलभूत यज्ञ आहेत त्यांना प्रकृति असे म्हणतात, अर्थात् इतर यज्ञ हे विकृति याग होत. सप्त हविःसंस्था, सप्त सोमसंस्था आणि अहीन, सत्र, राजसूय, अश्वमेध यासारखे यज्ञ ब्राह्मणग्रंथांत सांगितले आहेत. काही यज्ञ हे एका व्यक्तीने करावयाचे आहेत; तर काही यज्ञ अनेकांच्या साहाय्याने करावयाचे असतात. काही यज्ञ हे ब्राह्मणांनी करावयाचे, काही केवळ क्षत्रियांनी करावयाचे, तर काही निषाद, स्थपती, इत्यादींनी करावयाचे आहेत. या सर्व यज्ञांची माहिती विस्ताराने येथे सांगणे शक्य नाही. म्हणून काही महत्त्वाच्या यज्ञांचा येथे थोडक्यात विचार करणे इष्ट होईल.

अग्निहोत्र म्हणजे रोजचा होम. गाईच्या दुधाने करावयाचा म्हणून गाईला अग्निहोत्री व दुधाला व्रत असे म्हटले आहे. दैनंदिन जीवनात याला विशेष महत्त्व आहे. हा होम व्यक्तिगत स्वरूपाचा आहे.

दर्शपूर्णमास, चातुर्मास्य, पशुबंध हे विशिष्ट काळी करावयाचे यज्ञ. या यज्ञांत, काही ऋत्विजांचे साहाय्य लागते. यांना साधनसामग्रीही बरीच लागते. ब्राह्मणग्रंथांत या यज्ञासंबंधी पुष्कळ चर्चा केली आहे.

सोमयाग हा एक महत्त्वाचा व मूलभूत असा यज्ञ आहे. यास अनेक ऋत्विज लागतात. अनेकांचे साहाय्य लागते आणि साधनसामग्रीही पुष्कळ लागते. सोम या वनस्पतीसंबंधी बारीक सारीक विधी सांगितले आहेत, ते असे—सोमक्रय, सोमानयन, सोमातिथ्य, सोमाभिषव, सोमग्रह, सोमाहुती, सोमपान. याशिवाय दीक्षाविधी, मंडपनिर्माण, पशुयाग, प्रातःसवन, माध्यंदिन सवन, तृतीयसवन, सामगान, शस्त्रपठन, अवभृतस्नान इत्यादी अनेक लहान मोठे विधी सांगितले आहेत.

वर उल्लेखिलेल्या यज्ञांसंबंधी तसेंच अश्वमेध, राजसूय, सत्र, चयने इत्यादी यज्ञांसंबंधी व प्रायचित्तांसंबंधी विस्ताराने माहिती मुख्यतः ऐतरेय, शतपथ आणि

तैत्तिरीय ब्राह्मणांत आढळून येते. सोमयागासंबंधीचे वेगवेगळे प्रकार तांड्यमहाब्राह्मणात सांगितले आहेत.

यज्ञांच्या अनुषंगाने ब्राह्मणग्रंथांत अनेक कथा सांगितलेल्या आढळून येतात. त्यांतील काही कथा ऐतिहासिक दृष्टचाही महत्त्वाच्या आहेत; तर काही अत्यंत मनोरंजक आहेत. ऐतरेय ब्राह्मणात राजसूयासंबंधी अनेक विधी सांगितलेले असून त्यात मुख्य दिवशी शुनःशेपाख्यान ऐकवावे असे म्हटले आहे.[1]

या आख्यानाचा थोडक्यात सारांश असा—हरिश्चंद्र राजाला पुत्रसंतान नव्हते. त्याच्याकडे नारद ऋषी आले व त्यांनी राजाला पुत्रमाहात्म्य वर्णन करून सांगितले व पुत्र मिळवण्याचा मार्ग सांगितला. ते म्हणाले, 'तू वरुणाकडे जा आणि त्याला म्हण की 'मला पुत्रप्राप्ती होऊ दे. तो पुत्र मी तुला यज्ञात अर्पण करीन.' राजाने वरुणाची प्रार्थना केली. त्याच्या कृपेने राजाला मुलगा झाला. त्याचे नाव त्याने रोहित असे ठेवले. वरुण राजाकडे आला व मुलास मागू लागला. तेव्हा 'मुलगा दहा दिवसांचा होऊ दे' 'त्याला दात येऊ देत.' असे अनेक वेळा वायदे करून राजाने वरुणाला परत पाठविले. रोहित मोठा झाला. तेव्हा त्याला खरी परिस्थिती समजली व तो अरण्यात पळून गेला. इकडे वरुणाच्या अवकृपेने राजाला जलोदर झाला. रोहिताला ही गोष्ट समजली. वडिलांना भेटण्यासाठी व आत्मार्पण करण्यासाठी तो परत येऊ लागला. परंतु त्याला ब्राह्मणरूप घेऊन इंद्राने अनेक वेळा अडविले. राजाने यज्ञ मांडला. पण रोहित काही येईना. रोहिताला आजीगर्त नावाचा ऋषी भेटला. त्याला शुनःपुच्छ, शुनःशेप व शुनोलांगूल नावाचे तीन मुलगे होते. आजीगर्त अत्यंत दरिद्री होता. रोहिताने त्याला १०० गाई देऊन त्याच्या मधल्या मुलाला म्हणजे शुनःशेपाला विकत घेतले. त्याला घेऊन रोहित वडिलांकडे आला. रोहिताऐवजी शुनःशेप हा ब्राह्मणबळी बरा असे समजून वरुणाने ते मान्य केले. परंतु शुनःशेपाला यूपाला बांधण्यास कोणी तयार होईना. आणखी १०० गाई घेऊन आजीगर्तच हे काम करण्यास तयार झाला. त्याने शुनःशेपाला यूपाला बांधले. हे काय होत आहे, याची कल्पना नसलेल्या त्या लहान शुनःशेपाने देवतांची स्तुती आरंभली. त्या स्तुतीमुळे शुनःशेपाचे पाश गळून पडले आणि इकडे राजाचा जलोदरही बरा झाला. हा चमत्कार पाहून इतर ऋत्विजांनी शुनःशेपाला यज्ञात घेतले. विश्वामित्र हा त्या यज्ञात प्रमुख ऋत्विज होता. त्याने तर त्याला आपला मुलगा म्हणूनच स्वीकारले.

चार्तुमास्यातील अग्निमंथनाचे विधान करताना शतपथ ब्राह्मणात पुरूरवस् व उर्वशी यांचे आख्यान आले आहे (११·५·१); तर जैमिनी ब्राह्मणात (२·४३८) सरमा व पणी यांची कथा आली आहे. शतपथ ब्राह्मणात (१·४·५·८—१२) एक गंमतीची कथा आली आहे, ती अशी——मन व वाणी यांच्यात एकदा श्रेष्ठतेसंबंधी वाद उत्पन्न झाला. मन म्हणाले, की "माझ्या कृतीचे तू अनुकरण करतेस, म्हणून मी तुझ्या-

---

१ ऐब्रा. ७·१८—शौनःशेपमाख्यानं तद्धोता राज्ञेऽभिषिक्तायाऽऽचष्टे।

पेक्षा श्रेष्ठ आहे" वाणी म्हणाली, कीं "तुला जे कळते ते मी कळविते, प्रकट करते म्हणून तुझ्यापेक्षा मी श्रेष्ठ" दोघेही शेवटी प्रजापतीकडे गेले. प्रजापतीने मनाचे बाजूने निकाल दिला. वाणी रागावली. ती प्रजापतीला म्हणाली, की "तुझ्या हविसंबंधीचे मंत्र मी उच्चारणार नाही." म्हणून प्रजापतीचा याग उपांशु म्हणजे हळूहळू मंत्र म्हणून करतात. तैत्तिरीय संहितेत (१·५·१०) एक कथा आली आहे, की "कयाधूचा मुलगा प्रल्हाद याने आपल्या मुलाला म्हणजे विरोचनाला खाली पाडले. त्यामुळे तेथे खड्डा पडला. असुरामुळे तो खड्डा पडला असल्याने त्यातील पाणी पिऊ नये." याशिवाय देव आणि असुर यांच्यामध्ये झालेल्या युद्धाच्या कथा, त्यांच्यामध्ये लागलेल्या स्पर्धा, इंद्र-वृत्र-कथा इत्यादी अनेक कथा ब्राह्मणग्रंथांत आल्या आहेत.

शब्दांच्या व्युत्पत्ती करण्याचा प्रयत्न ब्राह्मणग्रंथांनी मोठ्या गंमतीदारपणे केला आहे. त्यामुळेच कित्येक व्युत्पत्ती अतिशय चमत्कारिक आहेत. तैत्तिरीय ब्राह्मणात "परोक्षप्रिया हि वै देवाः" असे वाक्य अनेक वेळा आढळते. 'दशमं हूताः दशहोता' 'चतुर्धा होतारः चतुर्होता (तै. ब्रा. २·३·१). अशा सारख्या व्युत्पत्ती दिल्या आहेत. 'स्वाहा' शब्दाची व्युत्पत्ती सांगताना ब्राह्मणात म्हटले आहे, की होम कसा करावा याचा विचार करणाऱ्या प्रजापतीला एक देवता म्हणाली, की "होम कर" प्रजापतीने विचारले "तू कोण आहेस" त्यावर ती म्हणाली, "तुझी स्वतःची जी वाणी तीच मी आहे" प्रजापतीने 'स्वाहा' म्हणून आहुती दिली. त्यामुळे स्वाहाकाराचा जन्म झाला[1].

ठोकून ठोकून केली म्हणून पृथ्वीला पृथ्वी म्हणतात (तै. ब्रा. १·१·३). देव घरी येऊन रहातात म्हणून यज्ञाच्या आदल्या दिवसास उपवसथ म्हणतात (श. ब्रा. १·१·१). जी आहुती दिल्याने देवता संतुष्ट होते त्या आहुतीला अवदान म्हणतात. (श. ब्रा. १·१·५). तो ओरडतो म्हणून अग्नीला रुद्र म्हणतात (तै. सं. १·५·१).

अशाप्रकारे ब्राह्मणग्रंथांत निरनिराळ्या शब्दांच्या व्युत्पत्ती केलेल्या आढळून येतात. त्यांचा भाषाशास्त्रदृष्टया आणि वैज्ञानिकदृष्टया अभ्यास केल्यास त्यांतूनच व्याकरणशास्त्र प्रगत झालेले आहे, हे सहज ध्यानात येऊ शकेल.

ब्राह्मणग्रंथांची वैशिष्टये

अनेक यज्ञांचे विधान सांगत असताना ब्राह्मणग्रंथांत मानवाच्या जीवनमूल्यांसंबंधी विचार आलेले आहेत. चांगले काय व वाईट काय ? सद्‌गुण कोणते व दुर्गुण कोणते ? इत्यादी द्वन्द्वांचा उल्लेख करून मनुष्याने नेहमी चांगले असेल त्याचे अनुकरण करावे, असे ब्राह्मणकारांनी सांगितले आहे. सत्य, अहिंसा, तप, दम, दान,

---

१. तैत्तिरीय ब्राह्मण २·१·२— कस्त्वमसीति । स्वैव ते वागित्यब्रवीत् । सोऽजुहोत् स्वाहेति । तत् स्वाहाकारस्य जन्म ।

वगैरे चांगल्या गोष्टींची स्तुती करून मद, दर्प, अहंकार इत्यादी दुर्गुण नाहीसे करावे, असे सांगताना ब्राह्मणग्रंथांत अनेक नीतिकथाही आल्या आहेत. ' देवांनी यज्ञ आरंभिला. वेगवेगळच्या दिशांकडून आक्रमणे येऊ नयेत, म्हणून इंद्राने वरुण, बृहस्पती व विष्णू यांची नियुक्ती केली. पण ते म्हणाले " आम्ही एकेकटे आहोत. " इंद्र म्हणाला, " मी तुमच्या सहाय्यास केव्हाही येईन. " तेव्हा त्यांना धीर आला. तात्पर्य एकेकटचात शक्ती नसली, तरी दोघांच्यात मिळून मोठे सामर्थ्य असते' असे गोपथ ब्राह्मणातील एका कथेत म्हटले आहे. शतपथ ब्राह्मणातही (१·७·२) दर्शपूर्णमासप्रकरणात होमासाठी द्रव्य कसे घ्यावे, म्हणजे त्या द्रव्याचे अवदान कसे करावे हे सांगताना देवऋण, ऋषिऋण, पितृऋण व मनुष्यऋण या चार ऋणांचा निर्देश केला आहे. प्रजापतीने देवांना ' द ' म्हणजे इंद्रिय दमन करा, मनुष्यांना ' द ' म्हणजे दान करा व असुरांना ' द ' म्हणजे दया करा असा उपदेश केला. म्हणून ' द द द ' असे तीन ' द ' कार दम, दान व दया या तीन गोष्टी शिकवतात, असे बृहदारण्यकोपनिषदात (५·२) म्हटले आहे. ' अहिंसतायै ' असे म्हणून अहिंसेची श्रेष्ठताही ब्राह्मणांत अनेक ठिकाणी सांगितली आहे.

संहितेतील मंत्रांचा यज्ञकर्मांत विनियोग सांगताना त्या मंत्राचा अर्थ स्पष्ट करून सांगण्याचा प्रयत्नही ब्राह्मणांत अनेक ठिकाणी केलेला आढळून येतो. या दृष्टीने ब्राह्मण ग्रंथ म्हणजे संहितामंत्रांवरील सर्वांत जुनी भाष्ये होत. ज्या शब्दांच्या अर्थांवरून केल्या जाणाऱ्या कर्मासंबंधी काही सांगता येणे शक्य आहे, अशा शब्दांचे अर्थ ब्राह्मणकार स्पष्ट करून सांगतात; पण मंत्रातील जे शब्द कर्मानुरूप नाहीत अशा शब्दांवर काहीच भाष्य आढळत नाही. म्हणून मंत्रावर भाष्ये लिहिणे हे ब्राह्मणांचे प्रयोजन नाही, हेच कळून येते.

ब्राह्मणग्रंथांत यज्ञांच्या अनुषंगाने अनेक देवतांचा उल्लेख असला, तरी त्यामध्ये प्रजापतीला सर्वश्रेष्ठ स्थान दिलेले आढळून येते. प्रजापतीने देव, मनुष्य, पितर, सर्प, वनस्पती इत्यादी सृष्टी निर्माण केली, असे ब्राह्मणग्रंथांत म्हटले आहे. इतकेच नव्हे; तर प्रजापतीने यज्ञ केला व सृष्टी उत्पन्न केली असेही अनेक वाक्यांवरून दिसून येते. " अग्निष्टोमेन वै प्रजापतिः प्रजा असृजत " " वैश्वदेवेन व प्रजापतिः प्रजा असृजत " अशी अनेक वाक्ये ब्राह्मणग्रंथांत आढळून येतात. हीच कल्पना स्पष्ट करताना भगवद्गीतेत म्हटले आहे, की ' यज्ञाबरोबरच प्रजापतीने प्रजा उत्पन्न केली व तो प्रजेला म्हणाला, की या यज्ञाने तुम्ही तुमच्या इच्छा पूर्ण करून घ्या. यज्ञ हा सर्व इच्छा पूर्ण करणारा आहे ' (गीता ३·१९). प्रजापतीच्या स्वरूपासंबंधी डॉ. देवस्थळींनी विवेचन केले आहे, ते असे —

" It is quite clear that in the eyes of the authors of the Brāhmaṇas Prajāpati was a great cosmic principle responsible for the whole creation. He came to be identified with Samvatsara as

one complete unit of time and also with sacrifice. Prajāpati was thus everything in space and time as also beyond them[1]." (अर्थ :—ही गोष्ट स्पष्ट आहे की ब्राह्मणकारांच्या दृष्टीने प्रजापती हे सर्व सृष्टीला कारण असलेले एक महान् वैश्विक तत्त्व आहे. पूर्ण काळाचा विभाग असलेले वर्ष आणि यज्ञ यांच्याशी प्रजापतीची एकरूपता असल्याचे दिसते. म्हणून जे दिक्कालाशी संबद्ध आहे आणि जे दिक्कालातीत आहे, असे तत्त्व म्हणजेच प्रजापती होय.)

योग्य प्रकारे अग्नीत आहुती दिली असता, तो अग्नी ती त्या देवतेस नेऊन पोहोचवितो. त्या त्या आहुतीने ती ती देवता संतुष्ट होऊन यजमानास फल देते. आम्ही तुम्हाला हवी देतो, तुम्ही आम्हाला फल दिलेच पाहिजे, असे ब्राह्मणकालीन यज्ञसंस्थेचे वर्णन अभ्यासत असतानाही आढळून येते. पुढे गीतेमध्येही देव व यज्ञकर्ते यामध्ये या परस्पर देवाण-घेवाणीचा स्पष्ट उल्लेख आला आहे (गीता ३·११) देव आणि मानव यांच्यांत फारसा फरक नसून मानवांच्या अगोदर, आपल्या कर्माने देवानी स्वर्गसुख मिळवले इतकेच. म्हणूनच "देवा वै सत्रमासत" "ते देवाः स्वर्गं लोकमायन्" अशा सारखी वाक्ये ब्राह्मणग्रंथांत आढळतात. तात्पर्य देवांनाही सुख मिळविण्यासाठी यज्ञ हेच साधन होते. अर्थात् वेदमंत्र म्हणून केलेला यज्ञ हा श्रेष्ठ समजला जात असे. आमचा यज्ञ, आमचे मंत्र, आमचे संस्कार, आमचे ऋत्विज सर्व काही श्रेष्ठ असल्यामुळे देवांनी येथे आलेच पाहिजे ही भावना ब्राह्मणग्रंथांत आढळते. त्यामुळे एक प्रकारे देवांना गौण स्थान दिले आहे. वेदमंत्र व यज्ञकर्म हे सर्वश्रेष्ठ मानले आहे, असेच ब्राह्मणग्रंथांतील यज्ञसंस्थेचा अभ्यास करताना आढळून येते.

एका यज्ञप्रसंगी इंद्र उपस्थित होतो आणि तो आला आहे हे कसे समजावे यासंबंधी चातुर्मास्य यज्ञाच्या संदर्भात एक गमतीचा विधी आहे, तो असा—साकमेध पर्वात पहाटे पूर्णादर्वी नावाचा एक होम असतो. यात इंद्रास उद्देशून शेषहविर्द्रव्याची आहुती मंत्र म्हणून दिली जाते. तो मंत्र असा—

पूर्णा दर्वि परा पत सुपूर्णा पुनरापत ।
वस्नेव वि क्रीणावहा इषमूर्जं शतक्रतो ।।[२]

अर्थ —हे दर्वि, तू (हवीने) भरलेली येथून देवांकडे जा व पुन्हा (सुखसमृद्धीने)

---

1. *Religion and Mythology of the Brāhmaṇas, by* Dr. G.V. DEVASTHALI; P. 151–152.

२. वाजसनेयी संहिता ३·४९; तै. सं. १·८·४.

भरलेली इकडे परत ये. हे इंद्रा, आपण द्रव्याप्रमाणे क्रयविक्रय व्यवहार करू. मी तुला अन्न देतो तू आम्हास सामर्थ्य दे !

यावेळी एका बैलाला हाक मारावी. तो ओरडला तर तोच वषट्कार समजून आहुती द्यावी. कारण इंद्र हाच स्वतःच्या रूपाने आवाज करीत असतो. बैल हे इंद्राचेच एक रूप आहे. म्हणून बैल ओरडला, तर असे समजावे, की इंद्र माझ्या यज्ञात उपस्थित झाला आहे.[1]

यज्ञामध्ये काम करणारा ऋत्विज याचेही माहात्म्य फारच मोठे आहे, कारण त्याच्या मनामध्ये यजमानाचे भले व्हावे, असे असेल तरच तो यज्ञ नीट पार पडू शकेल. ऋत्विजाचा अपमान हा सर्व नाशाला कारण आहे. ऋत्विज हा देव आणि मनुष्य यामधला दुवा आहे. ऐतरेय ब्राह्मणात (२·३२) म्हटले आहे, की 'ऋत्विजि हि सर्वो यज्ञः प्रतिष्ठितः' (सर्व यज्ञ हा ऋत्विजावर अवलंबून आहे.)

ब्राह्मणांच्या अभ्यासांतील अडचणी

ब्राह्मणग्रंथ हे गद्यमय भाषेत आहेत. त्यामुळे त्यांची भाषा संहितांहून अगदी वेगळी आहे. संहितेंतील भाषा, तिचे व्याकरण, त्यामधले स्वर, संधी वगैरे गोष्टींचा अभ्यास करण्यास प्रातिशाख्ये, शिक्षा, निरुक्त यांसारखे ग्रंथ उपलब्ध आहेत. पण ब्राह्मणग्रंथांचे स्वरूप भिन्न भिन्न असल्यामुळे त्यांच्या अभ्यासास योग्य साधने उपलब्ध नाहीत. ब्राह्मणग्रंथांपैकी तैत्तिरीय ब्राह्मणात त्रैस्वर्य आहे; तर शतपथ ब्राह्मणात मुख्यतः दोनच स्वर असल्याचे म्हटले आहे. इतर ब्राह्मणग्रंथ स्वररहितच आहेत. त्यात छंद नाहीत. केवळ गद्यमय भाषा आहे. त्यामुळे या ग्रंथांचा अभ्यास करणे कठीण झाले आहे. संहितांमध्ये एकेका देवतेची सूक्ते आढळतात. त्यामुळे संदर्भाने त्यातील शब्दांचा अर्थ समजून घेणे फारसे कठीण नाही. पण ब्राह्मणग्रंथांमध्ये असा एक विषय आढळत नाही. ब्राह्मणांत एकाच देवतेचे अथवा विधीचे वर्णन करणारे सलग मंत्र नाहीत. मंत्र कोणते आणि विधिप्रतिपादक वाक्ये कोणती याचा निर्णय करणेही कठीण. ब्राह्मणांत वाक्ये अगदी लहान लहान असतात. तसेच 'ह, वै, च, वाव, हि, उ' इत्यादी अनेक निरर्थक शब्द वारंवार येतात. त्यामुळे ब्राह्मणांतील भाषेला अनेक ठिकाणी कृत्रिमता आली आहे.

ब्राह्मणग्रंथांत मुख्य विषय आहे यज्ञ. त्याची प्रक्रिया खूप जटिल आहे. त्यामुळे त्या प्रक्रियेचे सूक्ष्म ज्ञान असल्याखेरीज त्यांतील शब्दांचा अर्थ लागणे कठीण आहे. अनेक ठिकाणी पारिभाषिक शब्द वापरलेले असतात. यज्ञांचा सर्व विषय ध्यानात घेऊन बहुतेक सर्व ब्राह्मणग्रंथांवर सायणाचार्यांनी भाष्ये लिहिली आहेत. शतपथ

१. श. ब्रा. २. ५. ३—अथ ऋषभमाह्वयितवै ब्रूयात् । स यदि रूयात् स वषट्कारः । अथ इन्द्रमेवैतत् स्वेन रूपेण ह्वयति । एतद् वा इन्द्रस्य रूपं यदृषभः । स यदि रूयात् आ म इन्द्रो यज्ञमगन् सेन्द्रो मे यज्ञ इति ह विद्यात् ।

ब्राह्मणावरील हरिस्वामींचे भाष्यही प्रसिद्ध आहे. पण या भाष्यांचा सखोल अभ्यास करून आणि ब्राह्मणांतील यज्ञविषय नीट ध्यानात घेऊन ब्राह्मणग्रंथाचा अभ्यास हवा तेवढा झालेला दिसून येत नाही.

इसवी सनाच्या १९ व्या शतकात पाश्चात्य पंडितांनी वैदिक वाङमयाचा अभ्यास नव्या चिकित्सक पद्धतीने सुरू केला. पण त्यांतील बहुतेक विद्वानांनी ऋग्वेदासारख्या संहितांवर आपले लक्ष केंद्रित केले. ब्राह्मणग्रंथांच्या अभ्यासाकडे फारसे कोणी लक्ष दिले नाही. पंडितांच्या मूर्धन्यस्थानी असणाऱ्या मॅक्सम्युलरने तर ब्राह्मणग्रंथांकडे तुच्छतेने पाहिले आहे. त्यांनी आपल्या जर्मन भाषेतील एका पुस्तकात[१] यासंबंधी लिहिले आहे. त्याचा विंटरनिट्झने[२] अनुवाद केला आहे तो असा–

However interesting the Brahmanas may be to students of Indian Literature, they are of small interest to the general reader. The greater portion of them is simply twaddle, and what is worse, theological twaddle. No person who is not aequainted beforehand with the place which Brāhmaṇas fill in the history of Indian mind. could read more than ten pages without being disgusted. (अर्थ- भारतीय वाङमयाच्या अभ्यासकांना ब्राह्मणग्रंथ कितीही हृदयंगम वाटत असले, तरी सर्वसामान्यांना ते अगदी नोरस वाटतात. या ग्रंथांतील पुष्कळसा भाग म्हणजे नुसती बडबड आणि त्याहीपेक्षा वाईट म्हणजे पारमार्थिक बडबड आहे. भारतीय संस्कृतीच्या इतिहासात ब्राह्मणांचे केवढे स्थान आहे हे ज्याला प्रथमतःच समजले नाही, त्याला पुरती दहा पाने वाचून झाली नाहीत तोच पुस्तक मिटवून ठेवावे असे वाटू लागते).

परंतु ब्राह्मणांतील विषय समजावून घेऊन त्यांचा अभ्यास केला, तर तो एक मोठा ज्ञानकोशच आहे, असे आढळून येईल. वैज्ञानिक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक विचार सांगणारा एक महान् विश्वकोश असेच ब्राह्मणांचे वर्णन करावे लागेल. त्यांचे अध्ययन भारतीय संस्कृतीची श्रेष्ठता, समाजजीवन, यज्ञसंस्था, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, इत्यादी अनेक विषयांचे यथार्थ ज्ञान होण्यास उपयोगी पडणारे आहे. वरवर ब्राह्मणग्रंथ कठीण वाटले, तरी एकदा त्यांत प्रवेश झाला म्हणजे ते अत्यंत रमणीय असे ग्रंथ आहेत, असे समजून येते. मल्लीनाथाच्या भाषेत बोलावयाचे, तर ब्राह्मणग्रंथ हे नारळाच्या फळाप्रमाणे आहेत––

नारिकेलफलसंमितं वचो भारवेःसपदि तद्विभज्यते ।
स्वादयन्तु रसगर्भनिर्भरं सारमस्य रसिका यथेप्सितम् ।।

अर्थ—भारवीच्या शब्दसृष्टीला नारळाच्या फळाचीच उपमा द्यायला हवी. ते वाङमय एकदम वेगळेच दिसते. गोड रसाने भरलेल्या नारळाचे सार रसिक लोक यथेच्छ चाखोत.

---

१. *Chips from a German Workshop*–Vol. I.

२. *History of Indian Literature* by M. WINTERNITZ, Vol. I, 1927, P. 187.

काही ब्राह्मणग्रंथांची भाषांतरेही झाली आहेत. त्यामध्ये ऐतरेय ब्राह्मणाचे हॉगने केलेले भाषांतर आणि शतपथ ब्राह्मणाचे एगेलिंगने केलेले भाषान्तर हे जुने आहे. प्रो. कीथने ऐतरेय व कौषीतकी यांची इंग्रजी भाषांतरे केली आहेत. कलान्दचे तांड्यमहाब्राह्मणाचे इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध आहे. या सर्व भाषांतरकारांनी ब्राह्मणांचा विषय समजण्याच्या दृष्टीने अनेक ठिकाणी उपयुक्त टीपाही लिहिल्या आहेत. तथापि ती भाषांतरे बरीचशी शब्दशःच वाटतात. या भाषांतरात काही त्रुटीही आढळतात. तैत्तिरीय ब्राह्मणातील काही भागाचे भाषांतर डूमाँ या पंडिताने केले आहे. याशिवाय ऐतरेय ब्राह्मणाचे मराठी भाषांतर धुंडिराजशास्त्री बापट यांनी केले आहे. अलिकडेच अनेक अभ्यासकांनी ब्राह्मणग्रंथांचा वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून अभ्यास करून प्रबंध लिहिले आहेत. तरीही परंपरागत श्रौतप्रक्रियेचे ज्ञान हळूहळू लुप्त होत चालल्यामुळे ब्राह्मण-ग्रंथांचा अभ्यास कठीणच होत जाणार आहे. श्रौतयज्ञांचे अनुष्ठान ही या अभ्यासास उपयोगी पडणारी एक प्रयोगशाळाच आहे. म्हणून श्रौतपरंपरा टिकवून धरण्याचे महत्त्वाचे कामही समाजाने व शासनाने अंगीकारिले पाहिजे.

ब्राह्मणग्रंथांचा काल

ब्राह्मणग्रंथ हा वेदाचा एक भाग आहे. त्यामुळे ब्राह्मणांचा कालनिर्णय म्हणजे वेदांचाच कालनिर्णय होय. आजपर्यंत अनेक पाश्चात्य व भारतीय पंडितांनी वेदांचा कालनिर्णय करण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्यामध्ये अनेक प्रकारचे मतभेद असल्याचे आढळून येतात.

प्राचीन सूत्रकारांनी "मंत्र व ब्राह्मण यांना वेद म्हणतात" असे वेदाचे लक्षण सांगितले आहे. त्यांनी वेदांचे अपौरुषयत्व मानले आहे. मीमांसाशास्त्रकारांनी तर अनेकप्रकारे अर्थाची छाननी करून वेदांचे अपौरुषयत्व सिद्ध केले आहे. वेदांचे अपौरुषेयत्व मानले, की त्यांचे अनादित्वही मानले पाहिजे. वेद हे परमेश्वराच्या हुंकारापासून निर्माण झाले आहेत, असे उपनिषदातही म्हटले आहे[1]. म्हणून प्राचीन आचार्यांनी वेदांचा कालनिर्णय करण्याचा फारसा प्रयत्न केला नसावा. सायणाचार्यांनीही आपल्या भाष्याच्या सुरुवातीस परमेश्वरास वंदन करताना म्हटले आहे, की–

यस्य निश्वसितं वेदा यो वेदेभ्योऽखिलं जगत् ।
निर्ममे तमहं वन्दे विद्यातीर्थमहेश्वरम् ।।

अर्थ–वेद ज्याचे निश्वास आहेत, वेदांपासून ज्याने हे सर्व जगत् निर्माण केले, त्या विद्यास्वरूपी परमेश्वरास मी वंदन करतो.

इसवी सनाच्या एकोणीसाव्या शतकापासून वेदांचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास सुरू झाल्यानंतर पाश्चात्य पंडितांनी वेदांच्या कालनिर्णयाकडेही आपले लक्ष वेधले.

१. बृहदारण्यकोपनिषद् २·४·११–तदस्य महतो भूतस्य निश्वसितमेतत् ।

परंतु खिस्ताच्या पूर्वी कित्येक शतके आणि सहस्रके भारतात उच्चतम संस्कृती नांदली, त्यावेळच्या लोकांच्यात दृढ अशी समाजव्यवस्था होती, त्यांचे वाङमय होते ही गोष्ट मान्य करताना पाश्चात्य पंडितांची दृष्टी पूर्वग्रहदूषित असावी असे वाटते. म्हणूनच वेदांचा काळ शक्यतो अलिकडे आणण्याचा त्यांचा प्रयत्न दिसून येतो. वेदांचा काल-निर्णय करण्याचा पहिला प्रयत्न प्रसिद्ध पंडितमॅक्सम्यूलर याने केला आहे. त्यांनी 'हिस्टरी ऑफ संस्कृत लिटरेचर' हे आपले पुस्तक इ. स. १८५९ साली प्रसिद्ध केले आणि प्रथमतःच त्यांत त्यांनी वेदकालनिर्णयासंबंधी आपले विचार मांडले. वैदिक वाङमय बुद्धपूर्वकालीन आहे, असे म्हणून भाषाशास्त्राच्या आधारे वैदिक वाङमयाच्या निर्मितीचे त्यांनी चार कालखंड कल्पिले आहेत–(१) छंदकाल किंवा मंत्रकाल—सनपूर्व १२०० ते १००० (२) संहिताकाल–सनपूर्व १००० ते ८०० (३) ब्राह्मणकाल–सनपूर्व ८०० ते ६०० (४) सूत्रकाल–सनपूर्व ६०० ते २००. मॅक्सम्यूलरचे हे मत तत्कालीन असलेल्या बऱ्याच पाश्चात्य अभ्यासकांनी मानले. कोलब्रूक, मॅक्डोनेल, विल्सन इत्यादींनी त्याच्या या मताचा पाठपुरावा केला आहे.

पण ही मते भाषाशास्त्राच्या आधारे मांडली असल्यामुळे ती स्वीकारार्ह नाहीत, असे मत श्री. के. टी. तेलंग यांनी मांडले आहे. भाषाशास्त्राच्या आधारावर काल-निर्णय करणे योग्य नाही, असे मत मांडताना श्री. बाळशास्त्री हरदास लिहितात– 'मंत्रांची भाषा ही रोजच्या व्यवहारात बोलली जाणारी आणि स्थित्यंतरांना बळी पडणारी लौकिक व्यवहाराची भाषा आहे असे जे समजले जाते तेच वस्तुतः चुकीचे आहे. ठराविक कालखंडाने भाषेत परिवर्तन घडते हा सिद्धांत व्यवहाराच्या भाषेपुरता खरा असला, तरी ग्रांथिक व शास्त्रीय भाषेच्या बाबतीत तो पूर्णपणे चुकीचा आहे. भाषेवरून कालनिर्णय करावयास धजले, तर विलक्षण विसंगती निर्माण होते. म्हणून भाषेचे प्रमाण हे कालनिर्णय ठरविण्यास सदोष व अनिश्चित म्हणून त्याज्य मानले पाहिजे[१].

वेदांचा कालनिर्णय ज्योतिषशास्त्राच्या आधारे करण्याचा प्रयत्न जर्मन पंडित याकोबी याने व भारतीय विद्वान लोकमान्य टिळक यांनी एकाच वेळी केला. ध्रुवाच्या व नक्षत्रांच्या गतींचे वेध घेऊन आणि ताऱ्यांच्या स्थितींचा अभ्यास करून इ. स. १८९३ साली लेख लिहून याकोबीने वेदकाल सनपूर्व ३००० वर्षे इतका मागे नेला, तेव्हा भारतीय वाङमयाच्या अभ्यासकांत खळबळ माजली. आपल्या सिद्धांताच्या पुष्ट्यर्थ याकोबीने ज्योतिर्गणिताचे अनेक पुरावे दिले आहेत. लोकमान्य टिळकांनी वेदांचा सखोल अभ्यास करून अनेक वेदवाक्यांच्या आधारे वेदांचा कालनिर्णय करण्याचा प्रयत्न केला. 'ओरायन' हे पुस्तक लिहून त्यांनी जगापुढे आपले सिद्धांत मांडले. त्यात त्यांनी ऋग्वेदाचा काळ सनपूर्व ४००० इतका मानला आहे. वेदांगज्योतिषाचाही त्यांनी सूक्ष्म अभ्यास केला. त्यांनी आपल्या मताला आधार म्हणून अनेक वेदवाक्ये

१. वेदातील राष्ट्रदर्शन, १९५५, पृ. ३२.

उद्धृत केली आहेत. त्यामध्ये शतपथ ब्राह्मणातील (२·१·२) पुढील वाक्य महत्त्वाचे आहे. "तस्मात् कृत्तिका स्वादधीत' एता ह वै प्राच्यै दिशो न च्यवन्ते । सर्वाणि ह वा अन्यानि नक्षत्राणि प्राच्यै दिशश्च्यवन्ते" (म्हणून कृत्तिकानक्षात्रवर आधान करावे कारण हे नक्षत्र पूर्वदिशेकडून केव्हाही विचलित होत नाही. इतर सर्व नक्षत्रे विचलित होतात.)

कृत्तिकानक्षत्राची स्थिती, कृत्तिकानक्षत्रापासून नक्षत्रगणना, वसंतसंपात पूर्वी मृगनक्षत्रात होता, ध्रुवाची स्थिती, सूर्याची गती, वर्षारंभ, हिमप्रलय, इत्यादी अनेक पुराव्यांच्या आधारे ब्राह्मणांचा काळ सनपूर्व २००० असा ठरविला गेला आहे. शं. बा. दीक्षित यांनीही ब्राह्मणग्रंथांत येणाऱ्या ज्योतिषविषयक वाक्यांच्या आधारे ब्राह्मणांचा काळ सनपूर्व २५०० असल्याचे आपले मत मांडले आहे. प्रो. हॉग यांनी ब्राह्मणांचा काळ सनपूर्व १२०० ते १४०० इतका मानला आहे. तात्पर्य वेदांच्या कालनिर्णयासंबंधी अनेक मते आहेत व त्यांचा परामर्श येथे घेता येणे शक्य नाही.

महाभारतात उल्लेखिलेल्या कुरु, पांचाल, विदेह, जनक, परिक्षिती इत्यादी अनेक राजांचे उल्लेख ब्राह्मणग्रंथांत आढळून येतात. त्यांच्या कथा या महाभारतातील कथांशी मिळत्या जुळत्या आहेत. त्यावरून ब्राह्मणग्रंथांतील ज्या भागात या कथा समाविष्ट झालेल्या आहेत, ते ते भाग महाभारताच्या समकालीन असावे. परंतु शतपथ ब्राह्मणासारखे मोठे ब्राह्मणग्रंथ एकाच काळात तयार झाले असे मानण्यापेक्षा काही भाग हा प्राचीन असावा आणि काही भाग मागून जोडला गेला असावा, असे म्हणणे सयुक्तिक वाटते. ब्राह्मणग्रंथांत बौद्धवाङमयाचा उल्लेख नाही, पण बौद्धवाङमयात मात्र ब्राह्मण वाङमयाचा उल्लेख सापडतो. यावरूण ब्राह्मण वाङमय बुद्धपूर्वकालीन आहे ही गोष्ट निर्विवाद. यासंबंधी संस्कृतिकोशात म्हटले आहे की, 'वैदिककाळ अधिकाधिक मागे नेण्याची प्रवृत्ती ही इतिहासाची साखळी जुळविण्यास बाधक आहे ब्राह्मणग्रंथांतील भाषा सनपूर्व तिसऱ्या शतकातील अशोकाच्या लेखांशी व त्रिपिटकातील भाषेशी जुळणारी आहे. म्हणजेच ब्राह्मणग्रंथांचा काळ बुद्धपूर्व चारशे ते पाचशे वर्षांच्या मागे नेता येत नाही'[१]. बुद्धधर्माचा उदय सनपूर्व ५०० च्या सुमारास झाला ही गोष्ट सर्वांनी मानली असल्यामुळे ब्राह्मणांचा काळ सनपूर्व १००० असा ठरतो. पण हे मतही भाषाशास्त्राच्या आधारावर मांडलेले. असल्यामुळे ते ग्राह्य वाटत नाही. ब्राह्मणांचा काळ सनपूर्व २००० हा मानणे हेच सयुक्तिक आहे असे वाटते.

सूत्रवाङमयाचा काळ सनपूर्व ६०० ते २०० आहे असे मॅक्सम्यूलरने मानले आहे. यावरून अथर्ववेदाचे कौशिकसूत्र याच कालात निर्माण झाले आहे असे म्हणता येईल. अथर्ववेदाचे हे कौशिकसूत्र व अथर्ववेदाचे गोपथ ब्राह्मण यांचा तुलनात्मक अभ्यास करून प्रो. ब्लूमफील्डने गोपथ ब्राह्मण हे कौशिकसूत्रानंतरचे आहे, असे मत

१. भारतीय संस्कृतिकोश खंड १ पृ. ७१८.

मांडले आहे. यावरून गोपथ ब्राह्मण हे बरेचसे अर्वाचीन असावे असे दिसते. असो. ब्राह्मणग्रंथांचा कालनिर्णय हा एक स्वतंत्र विषय आहे. त्याचा येथे थोडक्यात परामर्श घेतला आहे.

संहिताकाळ व ब्राह्मणकाळ

संहिता आणि ब्राह्मणे यांचा संबंध लक्षात घेता संहिता या प्राचीन आहेत व ब्राह्मणग्रंथ हे त्यानंतर झाले काहेत ही गोष्ट निर्विवाद आहे. म्हणूनच संहितेमधे असलेल्या अनेक मंत्रांचा अर्थ ब्राह्मणग्रंथांत सांगितलेला आहे. प्राचीन आर्य समाजाच्या स्थत्यंतरांचा अभ्यास करताना अभ्यासकांनी काही कालविभाग केले आहेत.

देवतांना उद्देशून ऋषींनी जे मंत्र गायले, त्या मंत्रांचे एकत्रीकरण होऊन संहिताग्रंथ तयार झाले. याला मंत्रांचे संहितीकरण असे म्हणतात. काही मंत्रांच्या समुदायास सूक्ते म्हणतात व अशा सूक्तांचा समूह म्हणजेच संहिता होय. मंत्रांचा संग्रह करण्याची ही प्रक्रिया ज्या काळात घडली, त्याला संहिताकाल असे म्हटले आहे. आर्यलोक सप्तसिंधु प्रदेशात राहू लागल्यानंतरच हे संहितीकरण झाले असावे असे दिसून येते. या काळात ऋग्वेदाची संहिता व अथर्ववेदाची संहिता तयार झाली. हा काळ कोणता हे नक्की सांगता येत नाही. परंतु या कालानंतर आर्यांची सप्तसिंधु प्रदेशातूनही निर्गमने झाली आणि आर्यलोक गंगायमुनांचा प्रदेश आणि त्याच्या दक्षिणेला असलेला मध्यदेश या ठिकाणी आले व त्यांनी तेथे वसाहती केल्या. आर्यसमाजात असलेल्या विद्वान लोकांनी या काळातच नव्या ग्रंथांची निर्मिती केली आणि ते ग्रंथ म्हणजेच यज्ञकर्मकांड सांगणारे ब्राह्मणग्रंथ होत. म्हणून या कालाला ब्राह्मणकाळ असे म्हणतात.

या काळात यज्ञ हा समाजाचा धर्म बनला. अश्वमेध, राजसूय यांसारख्या नव्या यज्ञांचा तपशील ब्राह्मणग्रंथांत सांगितला गेला. त्यामुळे यज्ञसंस्थेचे महत्त्व वाढू लागले. यज्ञकर्मकांडात अनेक प्रकारची जटिलता निर्माण झाली. त्यामुळे यज्ञविषयामध्ये ज्ञाते असलेल्या अशा एका विशिष्ट वर्गाचे महत्त्व वाढले. संपूर्ण समाज हा धर्म कल्पनेशी जोडला गला आणि यज्ञ हेच त्या धर्माचे केंद्र बनले. यज्ञकाळाचे वर्णन करताना विंटरनिट्झ म्हणतो—Religion was the centre of society and the sacrifice was the centre of Religion. (धर्म हा समाजाच्या केन्द्रस्थानी होता, तर यज्ञ हा धर्माच्या केंद्रस्थानी होता.) यज्ञाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या ब्राह्मणग्रंथांबरोबरच काही संहिताही याच काळात तयार झाल्या असाव्या, असे दिसते. यजुर्वेदाच्या आणि सामवेदाच्या संहिता याच काळात तयार झाल्या असे बहुतेक विद्वानांनी मानले आहे. ब्राह्मणकाळानंतर वैदिक वाङमयात उपनिषदांची भर पडली. म्हणून या काळास उपनिषद्काल असे म्हणतात. तात्पर्य संहितांनंतर ब्राह्मणग्रंथ निर्माण झाले आहेत व त्यांच्यात परस्पर जवळचा संबंध आहे हे दिसून येते.

ब्राह्मणग्रंथांच्या निर्मितीचे स्थान

ऋग्वेदात अनेक ठिकाणी पुरू, अनु, यदु, द्रुह्यु, तुर्वंश या पंचजनांचा उल्लेख सापडतो. म्हणजे ऋग्वेदकाली मुख्यतः हे पाच जनसमूह अस्तित्वात होते. यांना उद्देशून पंचकृष्टी असाही शब्द उपयोजलेला आढळून येतो. या पाच जनसमूहांचे भरत नावाच्या लोकांशी वैर होते. भरतांचा राजा सुदास नावाचा होता व पुरोहित वसिष्ठ होता. या भरतांनी तृत्सु नावाच्या लोकांना आपल्याजवळ केले, त्यामुळे तृत्सूंनीही वसिष्ठालाच आपला पुरोहित नेमले. यामुळे तृत्सूंचा पुरोहित विश्वामित्र रागावून पंचजनांना जाऊन मिळाला व त्याने आणखी पाच जनसमूहांचे साहाय्य घेऊन भरतां-विरुद्ध युद्ध पुकारले. हेच दाशराज्ञ युद्ध होय. इतिहासास ज्ञात असलेले पहिले युद्ध म्हणूनच याचा उल्लेख केला जातो. या युद्धात भरतांचा जय झाला. आणि सप्त-सिंधु प्रदेशात भरतांचे राज्य निर्माण झाले. पाच जनांपैकी काही समूह भरत व तृत्सु यांच्यात मिसळले.

या युद्धाचा महत्त्वाचा परिणाम असा झाला, की अनेक आर्यलोक सप्तसिंधु प्रदेश सोडून पूर्वेकडे निघून आले व मध्यदेशात राहू लागले. याच ठिकाणी कुरु, पांचाल अशा दोन जनसमूहांत मुख्यतः समाजाची विभागणी झाली असावी, असे दिसून येते. याशिवाय वश, उशीनर, कोसल, विदेह इत्यादी नावाचेही जनसमूह निर्माण झालेले दिसून येतात. ऋग्वेदातील पाच जनांमधे विभागलेला समाज मध्यदेशातील वेगवेगळ्या जनसमूहांत सामावला गेला. या सर्व जनसमूहांचा उल्लेख ब्राह्मणग्रंथांत आढळून येतो. शतपथ ब्राह्मणाने (२.४.४.५) कुरु व तृत्सु हे एकच असल्याचे म्हटले आहे; तर वशी व उशीनर यांचा उल्लेख गोपथ ब्राह्मणात (१.२.९) असून ते काशी व विदेह यांचे वंशज असावे, असे म्हटले आहे. मत्स्य व शाल्व (श. ब्रा. १०.४.१.१०) तसेच कोसल व विदेह (श. ब्रा. १.४.१.१०) हेही जनसमूह असल्याचे शतपथात म्हटले आहे. वश, उशीनर, उत्तरकुरु, उत्तरमद्र या जनसमूहांचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मणात (८.१४); तसेच गंधार देशाचा राजा निघ्नजित, तसेच जनक, अश्वपती इत्यादींचा उल्लेख ऐतरेय ब्राह्मणात (७.३४) आला आहे. वर उल्लेखिलेल्या वेगवेगळ्या जनसमूहांची या मध्यदेशात राज्ये निर्माण झाली. येथील राजांच्या पदरी पुरोहित म्हणून प्रसिद्ध विद्वान लोक असत.

विदेह देशाचा राजा जनक याचा पुरोहित याज्ञवल्क्य हा प्रकांड पंडित होता. त्याने शतपथ ब्राह्मण हा ग्रंथ निर्माण केला असे म्हणतात. यासाठी त्याने आदित्याची उपासना केली होती. वाजसनेयी शाखेच्या याज्ञवल्क्य ऋषीने शुक्लयजुर्वेदातील यजुर्मंत्र आदित्याकडून मिळवून सांगितले आहेत, असे बृहदारण्यकोपनिषदात शेवटी म्हटले आहे.[1]

---

१. बृहदारण्यकोपनिषद् ६.५.३—आदित्यानीमानि शुक्लानि यजूंषि वाजसनेयेन याज्ञवल्क्येनाख्यायन्ते ।

याज्ञवल्क्य हा यज्ञातील कर्मकांडात निष्णात असल्यामुळे त्याच्या नेतृत्वाने अनेक यज्ञ निरनिराळ्या राजांनी केले. या वेगवेगळ्या यज्ञांचे विधान सांगण्यासाठीच शतपथासारखे ब्राह्मणग्रंथ निर्माण झाले.

या मध्यदेशाच्या भौगोलिक स्थितीचेही वर्णन शतपथ ब्राह्मणांत अनेक ठिकाणी आढळून येते. वृत्रकथेच्या अनुषंगाने पूर्व व पश्चिम समुद्राचा उल्लेख करताना म्हटले आहे, की त्या वृत्राने पश्चिमेकडील व पूर्वेकडील समुद्र व्यापला आहे ("स अव एव अवरं समुद्रं दधौ अव पूर्वम्" श. ब्रा. १.६.३.११). परिचक्रा, काम्पील, सदानीरा, इत्यादी नगरांचा आणि गंगा, रेवा, सरस्वती, इत्यादी नद्यांचा उल्लेख ब्राह्मणग्रंथांत आढळून येतो. ऐतरेय ब्राह्मणांतही (८.१४) कुरु, पांचाल, सव, उशीनर, इत्यादी राजे मध्यदेशातच होते, असे म्हटले आहे.

या सर्व इतिहासावरून आणि भौगलिक पार्श्वभूमीवरून ही गोष्ट सिद्ध होते, की ब्राह्मणग्रंथांची रचना मध्यदेशातच झाली आहे. या संबंधी असे म्हटले आहे, की—The territory comprised within the sphere of Aryan influence down to the period of the Upaniṣads may thus be roughly described as the whole of India to the north of the Narmada.[1] (उपनिषत्काळापर्यंत आर्यांच्या वर्चस्वाखाली असलेला प्रदेश म्हणजेच नर्मदेच्या उत्तरेकडील संपूर्ण भारतवर्ष असे त्याचे वर्णन करता येईल.) तात्पर्य मध्यदेश हेच ब्राह्मणग्रंथांच्या निर्मितीचे स्थान होय.

ब्राह्मणकालीन धर्म

ब्राह्मणग्रंथांत आलेल्या विषयांची माहिती लक्षात घेता ब्राह्मणांचा मुख्य विषय म्हणजे यज्ञ हाच आहे, असे ध्यानात येते. या यज्ञांचे तंत्र ज्यांनी सांगितले व ज्यांना केवळ यज्ञांचे संपूर्ण ज्ञान होते अशा लोकांचा एक वर्गच या काळात निर्माण झाला होता. सप्तसिंधु प्रदेशाकडून मध्यदेशाकडे येत असताना तत्कालीन आर्यांना विरोधही पुष्कळच झाला असला पाहिजे. या विरोधास टक्कर देऊन भरत, कुरु, पांचाल, इत्यादी जनसमूहांनी आपापली राज्ये मध्यदेशात निर्माण केली. यावरून युद्धशास्त्रात तज्ज्ञ असणारा असाही एक वर्ग त्या कालात निर्माण झाला होता. या दोन वर्गांना उद्देशूनच ब्राह्मण व क्षत्रिय हे शब्द वापरले आहेत. संस्कृतीचा प्रसार करणे, नवी राज्ये निर्माण करणे, समाजास मानवधर्म शिकविणे इत्यादी उद्दिष्टे समोर ठेवून ब्राह्मण व क्षत्रिय या दोन्ही वर्गांनी परस्परांच्या सहकार्याने सुस्थिर असा समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. हे करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे यज्ञच होता. यज्ञ मानणारे ते आर्य आणि यज्ञ न मानणारे ते अनार्य असे समजले जाई. म्हणूनच

---

1. *The Vedic Age*, P. 262.

अनार्यांचा उल्लेख 'अयज्वन्' असा केलेला आढळून येतो. यज्ञ हाच त्या काळातील धर्म बनल्यामुळे वैयक्तिक, सामाजिक, राष्ट्रीय अशा अनेक प्रकारचे यज्ञ ब्राह्मणग्रंथांत सांगितले गेले व्यक्ती आणि समाज यांच्या स्वास्थ्याबरोबरच संपूर्ण मानवांना मानवधर्म म्हणजे यज्ञधर्म शिकवण्याची आकांक्षा ब्राह्मण व क्षत्रिय यांनी बाळगली होती.

यासाठी अश्वमेध यज्ञ हा ब्राह्मणग्रंथांत नव्याने सांगितला गेला. हा यज्ञ करणारा सार्वभौम राजा हा एकटा यजमान असला, तरी संपूर्ण समाजाचे त्याला साहाय्य लागे. अश्वमेध यज्ञ हा एक राष्ट्रीय महोत्सव म्हणूनच समजला जाई. अश्वमेध यज्ञाच्या निमित्ताने आर्य कोण व अनार्य कोण हे समजून घेण्याची युक्ती तत्कालीन ब्राह्मण पुरोहितांनी शोधून काढली. ती अशी, की अश्वमेध यज्ञाचा घोडा संपूर्ण पृथ्वीवर पर्यटन करण्यासाठी सोडायचा. त्याला मुक्तपणे संचार करण्याची मोकळीक असे. या घोड्याचे स्वागत करणारा म्हणजेच यज्ञधर्म मानणारा तो आर्य व घोड्यास विरोध करणारा तो अनार्य. घोड्याला विरोध केला, तर त्याला मुक्त करण्यासाठी अशा लोकांशी युद्ध करून त्यांना आर्यधर्म म्हणजे यज्ञधर्म हा मानायला लागत असे. म्हणूनच 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' हीच घोषणा त्यावेळच्या नेत्यांची असे. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्याशिवाय असलेल्या सर्व प्रजेचा उल्लेख 'विश्' या शब्दाने केलेला आढळतो. म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय आणि सर्व जनता यांच्यामधे एकता असे. आणि ही एकता निर्माण करणारे सूत्र म्हणजेच यज्ञ होय. या सूत्रांत संपूर्ण समाजाचे जीवन गुंफले होते. सर्वांचा रक्षणकर्ता, यज्ञकर्ता म्हणून राजाला 'विशांपति' असे म्हटले आहे. पण सार्वभौम राजापेक्षा धर्म श्रेष्ठ समजला जाई. अश्वमेधाच्या शेवटी 'तू धर्म-दंड्य आहेस' असा राजाला इशारा दिला जात असे. आणि या राष्ट्राच्या कल्याणाचे राष्ट्रगीत सर्वांनी मिळून गायले जात असे. प्रजा आणि राजा, ब्राह्मण आणि क्षत्रिय, यजमान आणि पुरोहित यांचा संबंध असा अतूट असे, असो.

ब्राह्मणकाळातील राजकीय स्थिती व सामाजिक जीवन यांचा विचार दुसऱ्या व्याख्यानात करू.

[व्याख्यान दुसरे]

ब्राह्मणकाळातील राजकीय व सामाजिक स्थिती

ब्राह्मणकाळांत मध्यदेशांत समाजाचे मुख्य अधिष्ठान निर्माण झाले आणि कोसल, विदेह, काशी, इत्यादी राज्ये निर्माण झाली. त्यामुळे या काळातील सामाजिक आणि राजकीय इतिहास ऋग्वेदाहून अतिशय वेगळा असल्याचे दिसून येते. या ठिकाणी जे राजे होते त्यांचे एक विशिष्ट प्रकारचे असे स्थान असे. समाजांतील पराक्रमी क्षत्रिय पुरुष म्हणजे राजा ही कल्पना मागे पडून राजा हा इन्द्र, वरुण, इत्यादी देवतांचे गुण घेऊनच जन्माला येतो ही कल्पना निश्चित होऊन राजा हा दैवी अंश समजला जाऊ लागला. राजांच्या मुलांनाही गुरुगृही जाऊन अध्ययन करावे लागे. त्यांना युद्धशास्त्र, शस्त्रविद्या, अर्थशास्त्र, इत्यादी विषय शिकवले जात. राजा हा सर्वगुणसंपन्न असला पाहिजे, असा प्रयत्नही केला जात असे. राजाकडे देशाचे संरक्षण करणे, समाजव्यवस्था सांभाळणे, यज्ञयाग करणे, विद्वानांना आश्रय देणे इत्यादी कामे नेमून दिली गेली. विद्वानांच्या सभा भरवून शास्त्रचर्चा ऐकण्याचा शौकही राजांना होता, असे दिसते. कित्येक राजे हे स्वतः विद्वान असत व अशा चर्चांमध्ये भाग घेत असत. शतपथ ब्राह्मणांतील बृहदारण्यकोपनिषदांत (३·१·६) जनक राजाने भरविलेल्या एका विद्वत् सभेचे फारच मार्मिक वर्णन आले आहे. येथे जमलेल्या विद्वानांत ब्रह्मिष्ठ कोण हे जाणून घेण्याची जनकराजाला इच्छा झाली व त्यातून याज्ञवल्क्य आणि इतर विद्वान यांच्यांत प्रश्नोत्तरे सुरू झाली. या काळातील राजकीय परिस्थितीचे वर्णन करताना श्री. महाजन लिहितात— The old customs went into the back-ground and new states emerged. The Kuru-Panchalas were the most prominent in the new age. They were considered to be the best representatives of Vedic culture, speakers of best Sanskrit, performers of sacrifices with perfection, having the best of the king and the patrons of learning[1]. (अर्थ– जुन्या चालीरीती मागे पडल्या आणि नवी राज्ये उदयास आली. या नव्या युगांत कुरु-पांचालांना महत्त्व आले. वैदिक संस्कृतीचे प्रतिनिधी म्हणूनच त्यांचा उल्लेख होऊ लागला. ते संस्कृत भाषा बोलणारे आणि सफल असे यज्ञ करणारे होते. उत्तम राजे आणि विद्वानांचे आश्रयदाते होते).

राजा हा जरी अशाप्रकारे शासक असला, तरी आपल्या प्रजेशी तो एकनिष्ठ असे. एखाद्या राजाला राज्याभिषेक करणे हा एक राष्ट्रीय महोत्सव समजला जाई. त्यासाठी वेगवेगळ्या प्रदेशांतील राजांना बोलावले जाई. सर्व तीर्थांचे पाणी आणले जाई. त्याचप्रमाणे राजसूय, अश्वमेध यांसारख्या मोठ्या यज्ञांचे अनुष्ठान म्हणजे सामाजिक दृष्ट्या एक महान् पर्वणीच समजली जाई.

---

1. *Ancient India*, by V. D. MAHAJAN.

राजसूय यज्ञाचा संकल्प करायचा म्हणजे त्यासाठी सर्व जनतेचे सहाय्य मिळाले पाहिजे. यासाठी सांग्रहणी नांवाची इष्टी करावी लागे. या इष्टीचे विधान करताना तैत्तिरीय ब्राह्मणांत (१·७·१) म्हटले आहे, की सांग्रहणी नावाची इष्टी करावी, म्हणजे जनतेतील सर्वांचे साहाय्य मिळते. याप्रमाणे समाजाच्या सहकार्याने राजाने जसे यज्ञयागादींचे अनुष्ठान करायचे; त्याचप्रमाणे त्यांच्याच साहाय्याने राज्यकारभारही केला पाहिजे असे दिसून येते. राष्ट्राच्या समृद्धीसाठी आणि राष्ट्रातील लोक सुखी व्हावेत यासाठी तैत्तिरीय संहितेत (३·४·८) राष्ट्रभृद्धोम नावाचे होम करावयास सांगितले आहेत. राजाने करावयाच्या आणखीही काही यज्ञांचा उल्लेख ब्राह्मणग्रंथांत आला आहे. उदाहरणार्थ, राजा आणि प्रजा यांच्यांतील भांडण मिटण्यासाठी (तै. सं. २·२·११), शत्रूने घेरले असता (तै. सं. २·२·७), युद्धास निघण्यापूर्वी, तसेच युद्धाहून परत आल्यानंतर इत्यादी अनेक गोष्टींसाठी राजाने वेगवेगळे यज्ञ करावे, असे सांगितले आहे. दोन्ही बाजूंनी राष्ट्राचे रक्षण होण्यासाठी यज्ञ करावा, असे तैत्तिरीय ब्राह्मणांत (१·७·६) म्हटले आहे. राजसूयात जे रत्नी हवी सांगितले आहेत, त्यांचे अनुष्ठान केले असता राष्ट्र समृद्ध होते, असे म्हटले आहे (तै. ब्रा. १·७·३). ब्राह्मण, राजन्य, महिषी, वावाता, परिवृक्ती, सेनान्य, सूत, ग्रामण्य, क्षत्ता, संग्रहीता, भागदुघ आणि अक्षावाप यांना रत्नी अशी संज्ञा असून त्यांच्या घरी जाऊन राजाने यज्ञ करावयाचा असतो. समाजातील वेगवेगळ्या थरांतील लोकांच्या घरी यज्ञकर्ता सार्वभौम राजा जातो आहे, तेथे ब्राह्मण, क्षत्रिय इत्यादी भिन्नभिन्न लोकांच्या सहकार्याने यज्ञ होतो आहे, हे सामाजिक समतेचे दृश्य आपणास ब्राह्मणग्रंथांत पहावयास मिळते. राजसूय यज्ञामध्ये राजाला जो अभिषेक करावयाचा त्याचे वर्णन ऐतरेय ब्राह्मणांत (८·१२–१४) आले आहे. देवांनी इंद्राला जो अभिषेक केला त्याचा उल्लेख करून राजा हा सम्राट्, स्वराट्, विराट् इत्यादी पदवीने युक्त व्हावा, म्हणून वेगवेगळ्या जनसमूहांनी निरनिराळ्या बाजूंनी राजाला अभिषेक करावा, असे म्हटले आहे. या अभिषेकासाठी सात्वत राजे, नीच्य राजे, उत्तरकुरु, उत्तरमद्र, कुरुपांचाल, सव, उशीनर, इत्यादी राजे आले होते, असे ऐतरेय ब्राह्मणांत (८·१४) म्हटले आहे. यज्ञात केल्या जाणाऱ्या अभिषेकाच्या विधीने ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यांत सामअस्य व एकता निर्माण होते, असे तैत्तिरीय ब्राह्मणांत (१·७·६) म्हटले आहे.

राजांनी करावयाच्या या यज्ञांत पुरोहिताचे काम महत्त्वाचे असे. पुरोहिताच्या सल्ल्याने राजाने न्यायदान, दंड, युद्ध, इत्यादी गोष्टीही करावयाच्या असत. म्हणूनच राष्ट्राचा विचार करताना या पुरोहितांनी मोठ्या आत्मविश्वासाने असे म्हटले आहे, की 'आम्ही पुरोहित या राष्ट्रात जागे राहू!'[१] राजसूय यज्ञासंबंधी विधान करताना तैत्तिरीय ब्राह्मणांत म्हटले आहे, की 'हे भरतांनो, हा तुमचा राजा आहे आणि सोम हा आमचा राजा आहे.'[२]

१. तै. सं. १·७·१०; श. ब्रा. ५·२·२·५–वयं राष्ट्रे जागृयाम पुरोहिताः ।

२. तै. ब्रा. १·७·६–एष वो भरता राजा सोमोऽस्माकं ब्राह्मणानां राजा ।

या काळच्या सामाजिक स्थितीचा विचार करताना ब्राह्मण आणि क्षत्रिय यांमध्ये आढळून येणारी एकात्मता फारच महत्त्वाची आहे. परंतु एकटचा पुरोहिताचाच सल्ला मानून राजाने वागणे इष्ट नव्हे. राजा हा केव्हाही अनियंत्रित असता कामा नये. त्याच्यावर ज्याप्रमाणे धार्मिक बंधने असत, त्याचप्रमाणे सामाजिक बंधनेही असत. समाजांतील अनेक लोकांची मदत घेणे त्याला आवश्यक असे. यांतून सभा आणि समिती अशा स्वरूपाची दोन मंडळे निर्माण झाली असावी, असे दिसते.

प्राचीनकाळी राजांना द्यूत खेळण्याचा शौक असे. इतकेच नव्हे, तर द्यूत खेळणे हा एक यज्ञातीलही महत्त्वाचा विधी समजला जाई. अग्न्याधानाच्या संबंधात मैत्रायणी संहितेत (१·६·११) म्हटले आहे—"मध्याधिदेवने राजन्यस्य जुहुयात्। शतमस्मा अक्षान् प्रयछेत्। तान् विचिनुयात्। सभायां दीव्येयुः" (क्षत्रियाच्या आधानाच्या वेळी द्यूताच्या पटावर आहुती द्यावी. राजाला शंभर फासे द्यावे. ते त्याने टाकावे, अशा प्रकारे सभेमध्ये द्यूत खेळावे.) वाजपेय, राजसूय या सारख्या यज्ञप्रसंगीही द्यूत खेळले जाई. द्यूत खेळण्याच्या जागेसच 'सभा' असे म्हणत. यांत भाग घेणाऱ्यास 'सभिक' व येथे असणाऱ्या अग्नीस 'सभ्याग्नी' असे नाव आहे. सभेमध्ये स्थापन करावयाचा तो सभ्याग्नी होय, असे बौधायन श्रौतसूत्रांत (२०·१७–१८) म्हटले आहे. या द्यूतात भाग घेण्यासाठी गावांतील ब्राह्मण, पुढारी, वैश्य वगैरे भिन्न भिन्न लोक येत. पण प्रथमतः यज्ञाचा भाग म्हणून असलेले द्यूत वारंवार खेळले जाऊ लागले. आणि खेळानंतर राजाची या इतर लोकांबरोबर जी बोलणी होत, त्यांमध्ये राज्यकारभारासंबंधीही निर्णय होत. राजाला अशा सभांतून मार्गदर्शन होऊ लागले म्हणून कालांतराने सभा हा राज्यव्यवस्थेचाच एक घटक मानला जाऊ लागला.

परंतु संपूर्ण राष्ट्रावर एखादे संकट आले, की राष्ट्रातील अनुभवी, वयोवृद्ध आणि ज्ञानसंपन्न अशा लोकांना राजा मुद्दाम पाचारण करी आणि त्यांच्याबरोबर विचार-विनिमय करी. यास समिती असे म्हटले आहे. या समितीमध्ये एकमताने निर्णय घेतले जात आणि त्यानुसार राजाला वागावे लागे. या समितीचे उल्लेख अथर्ववेद आणि तैत्तिरीय ब्राह्मण (२·४·४) यांसारख्या ग्रंथांत आढळून येतात. या समितीचे स्वरूप स्पष्ट करताना श्री. महाजन लिहितात—

Conferences of learned persons were summoned from time to time and all the learned men and women of the age were assembled on that occasion to discuss the important questions[1].

(अर्थ —वेळोवेळी विद्वानांची समिती बोलावली जाई आणि त्याप्रसंगी वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध स्त्री-पुरुष एकत्र जमत आणि महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधी चर्चा करत.) तात्पर्य समितीमध्ये अगदी वेगळ्या प्रकारचे लोक असत. आणि हेच खऱ्या अर्थाने राजाला योग्य सल्ला देत.

1. *Ancient India*, by V. D. MAHAJAN.

त्यामुळेच राष्ट्राचा आणि राज्याचा गाडा पुरोहित, सभा व समिती यांच्या सहकार्याने चालत असावा, असे दिसते. म्हणजे राजा हा अनियंत्रित नव्हता. अर्थात त्याकाळी लोकतंत्र राज्यच असले पाहिजे असे दिसते.

वर्णव्यवस्था

ऋग्वेदकाळी समाजात वेगवेगळे वर्ण नव्हते. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचे उल्लेख असले, तरी देवांची स्तुती करणारे ते ब्राह्मण आणि शत्रूशी युद्ध करून राज्य मिळवणारे ते क्षत्रिय. ऋग्वेदांत वर्ण हा शब्द रंग या अर्थाने आला आहे. जे गौरवर्णी लोक होते, त्यांचा उल्लेख आर्य या शब्दाने आला आहे. काळे असलेले दास किंवा दस्यू. यांचे उल्लेख ऋग्वेदांत 'दासं वर्णं' या शब्दाने केला आहे. त्यामुळे ब्राह्मण आणि क्षत्रिय यांचा उल्लेख ऋग्वेदांत असला, तरी त्याकाळी वर्णव्यवस्था होती, असे म्हणता येत नाही. पुरुषसूक्तांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ही नावे आली असली, तरी ती नावे वर्णवाचक नसावी, असे अनेक विद्वानांनी म्हटले आहे.

ब्राह्मणकाळांत मात्र राजे आणि पुरोहितवर्ग यांचे महत्त्व वाढल्यामुळे ब्राह्मण आणि क्षत्रिय या नावाचे दोन वर्ण समाजात निर्माण झाले. ब्राह्मणांच्या सहकार्याने मोठमोठाले यज्ञ त्या काळात होऊ लागले. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्याशिवाय उरलेल्या समाजाचा उल्लेख 'विश्' या शब्दाने होऊ लागला. यज्ञासारख्या मोठ्या प्रसंगी ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्याबरोबर समाजातील सर्वांनाच भाग घ्यावा लागे. या वेळी राजा आणि प्रजा यांचा संबंध कसा असे, याबद्दल ब्राह्मणांत पुष्कळ माहिती आढळते. वरुण हा राजा आणि मरुत् ही त्याची प्रजा, असे शतपथ ब्राह्मणांत (२·५·२·६) म्हटले आहे. मरुत् हे इंद्राचेही प्रजाजन आहेत, असे निराळ्या संदर्भात शतपथ ब्राह्मणांत (२·५·२) म्हटले आहे. प्रजेला राजाबद्दल किती आदर वाटत असे यासंबंधी शतपथांत म्हटले आहे. की उच्च सिंहासनावर बसलेल्या राजाची लोक सेवा करतात[1]. लोक नेहमी राजाचेच अनुकरण करतात, असेही शतपथांत (२·५·२·३४) म्हटले आहे. त्यावरूनच 'यथा राजा तथा प्रजा' असा संकेत रूढ झाला असावा. विश् या शब्दाचा अर्थ वैश्यवर्ण असे नंतरच्या काळात समजले गेले असावे.

ब्राह्मणकाळांत अशा प्रकारे समाजात जी वर्णव्यवस्था निर्माण झाली, त्यामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य असे तीन वर्ण निर्माण झाले. पण त्या तिघांनाही यज्ञ करण्याचा अधिकार दिला गेला. ब्राह्मणाने वसंतऋतूत, क्षत्रियाने ग्रीष्म ऋतूत आणि वैश्याने शरदऋतूत अग्न्याधान करावे, असे तैत्तिरीय ब्राह्मणांत (१·१·२) म्हटले आहे. ब्राह्मणग्रंथांत जे अनेक प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत, ते सर्व या तीनही वर्णांच्या लोकांना करता येत. वेगवेगळ्या क्षत्रिय राजांनी केलेल्या यज्ञांचे उल्लेख मुख्यतः

१. श. ब्रा. २·५·२·६—तस्मादुपर्यासीनं क्षत्रियमधस्तादिमाः प्रजा उपासते।

शतपथ ब्राह्मणांत केले आहेत. श्वैक्ण, प्रतीदर्श, सांजर्य, सुल्पा, श्रौतर्ष, देवभाग, दक्षपार्वती या राजांनी दाक्षायण नावाचा यज्ञ करून आपले राज्य परत मिळविले, असे शतपथ ब्राह्मणांत (२·४·४) म्हटले आहे. दैवाप शौनक याने परीक्षितीचा मुलगा जनमेजय याच्याकडून अश्वमेध यज्ञ करविला. भीमसेन वगैरे परीक्षितीचे भाऊ होते. या यज्ञाचे वर्णन शतपथ ब्राह्मणांत (१३·५·१) आले आहे. त्या संबंधीच्या दोन गाथा ब्राह्मणांत आढळतात, त्या अशा—

> **आसंदीवति धान्यादं रुक्मिणं हरितस्रजम् ।**
> **आबध्नादश्वं सारङ्गं देवेभ्यो जनमेजयः ॥**
> **अष्टासप्ततिं भरतो दौःष्यंतिर्यमुनामनु ।**
> **गङ्गायां वृत्रघ्नेऽबध्नात् पञ्चपञ्चाशतं हयान् ॥**

अर्थ —आसंदीवत् नावाच्या नगरांत जनमेजय राजाने देवांकरिता धान्य खाणारा, रुक्मालंकार धारण करणारा, हिरवी माळ घातलेला व चित्रविचित्र रंगाचा अश्व बांधला (त्याचा याग केला). त्यानंतर अठ्ठयाहत्तर वर्षांनी दुष्यंताचा मुलगा भरत याने यमुनेच्या जवळ गंगेच्या काठी पंचावन्न घोडयांना इंद्रासाठी बांधले (त्यांचा याग केला. म्हणजे पंचावन्न अश्वमेघ यज्ञ केले.)

अत्यंत विद्वान आणि चारित्र्यसंपन्न अशा ब्राह्मणांना शतपथ ब्राह्मणांत (२·२·२·६) मनुष्यदेव म्हटले आहे. सर्व देवता ज्ञानी अशा ब्राह्मणांच्या ठिकाणी एकाकार झाल्या आहेत, असेही वचन आहे[१]. विद्वान ब्राह्मणांच्या ठिकाणी सर्व देवता वास करीत असतात, असे तैत्तिरीय आरण्यकांत म्हटले आहे[२]. पण हे सर्व उल्लेख ब्राह्मणांच्या ठिकाणी असलेल्या ज्ञानाचा मान राखण्यासाठी केलेले दिसतात. यात ब्राह्मण वर्णाचे श्रेष्ठत्व दाखविण्याचा ब्राह्मणकारांचा उद्देश असावा, असे वाटत नाही. कारण ब्राह्मणकाळांत ब्राह्मण, क्षत्रिय, आणि वैश्य यांना समान अधिकार असल्यामुळ यांच्यांत केव्हाही वादविवाद उत्पन्न झाले नाहीत. प्रत्येकाच्या कामावरून आणि उद्योगधंद्यावरून वर्ण ओळखू जाऊ लागले. या तीन वर्णांच्या शिवाय समाजात जे लोक उरले त्यांनाही यज्ञ करण्याचा अधिकार दिलेला आहे, असे दिसते. उदाहरणार्थ, रथकार म्हणजे सुतार यालाही अग्निहोत्र घेता येते, असे तैत्तिरीय ब्राह्मणांत (१·१·४) म्हटले आहे. निषाद आणि स्थपती यांच्याकडून यज्ञ करवावा, असे विधान मैत्रायणी संहितेत (२·२·४) आढळते. निषादासंबंधी 'वेदिक एज' या ग्रंथांत म्हटले आहे –Niṣāda was a general term used for a non-Aryan tribe. (अर्थ–निषाद हा शब्द सामान्य अर्थाने अनार्य जातींना उद्देशून वापरला आहे.) म्हणजे ज्यांना ज्यांना यज्ञ करावयाचा असेल, त्यांना त्यांना तो करण्याची संधी त्या काळात दिली आहे, असे दिसते. तात्पर्य संपूर्ण समाजाला एका सूत्रांत गुंफण्याचे महत्त्वाचे कार्य यज्ञरूपी

---

१. श. ब्रा. १२·४·४.

२. तै. आ. २·१५– यावतीर्वै देवतास्ताः सर्वा वेदविदि ब्राह्मणे वसन्ति ।

साधनाने त्यावेळच्या समाजधुरीणांनी केले आहे. प्रत्येकाने आपापले व्यक्तिगत कर्तव्य-कर्म करावे आणि समाजात एकता मानावी, यासाठी वर्णव्यवस्था ब्राह्मणकाळांत निर्माण झाली. हे वर्ण एकाच समाजपुरुषाचे घटकावयव आहेत, ही कल्पना निश्चित असल्यामुळे त्यांच्यांत केव्हाही उच्चनीचता, अस्पृश्यता, जातिभेद इत्यादी गोष्टी निर्माण होऊन मतभिन्नता उत्पन्न झाली नाही. वर्ण तीन, चार, का किती हा प्रश्न निर्माणच झाला नाही. तत्कालीन समाजातील या व्यवस्थेचे वर्णन करताना श्री. महाजन लिहितात–At this time it was midway between the laxity of the Rigveda and the rigidity of the Sutras[1]. (अर्थ–या काळात वर्णव्यवस्था ही ऋग्वेद काळातील उच्छृंखल जीवन आणि सूत्रकालातील नियमबद्ध जीवन यांचा उत्कृष्ट समन्वय साधणारी होती).

प्रत्येक वर्णातील लोकांची व्यक्तिगत कर्तव्ये भिन्नभिन्न असली, तरी सामाजिक एकता कधी भंग पावली नाही; की त्यात कधीही आग्रही भूमिका निर्माण झाली नाही. वर्णव्यवस्था ही समाजाच्या स्थिरतेसाठी, उत्कर्षासाठी आणि स्वास्थ्यासाठी असलेली एक व्यवस्था होती. त्यामुळेच अनेक वर्षे हा समाज टिकून राहिला. मनुस्मृतीत (१·३१) म्हटले आहे, की ही वर्णव्यवस्था परमेश्वराने लोकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी निर्माण केली आहे. ब्राह्मणकाळांत संपूर्ण आर्यसमाज हा मुख्यत: तीनच वर्णांत विभागला गेला होता. समाजधर्म म्हणून यज्ञधर्मच समजला जात होता. यज्ञास विरोध करणारे ते अनार्य. यांचा उल्लेख 'अयज्वन्' म्हणजे यज्ञ न करणारे असा केला जात असे. पण अशाही लोकांना आत्मसात करून त्यांना आर्यधर्माची म्हणजे यज्ञधर्माची दीक्षा दिली जात असे आणि एकाच समाजजीवनात त्यांना सामावून घेतले जात असे. ब्राह्मणकाली शूद्र असा चौथा वर्ण आढळून येत नाही. ब्राह्मणकाळानंतर समाजावरील यज्ञसंस्थेचा प्रभाव हळूहळू कमी झाला आणि काही विशिष्ट लोकांनाच तो यज्ञ करता येऊ लागला. त्यामुळेच यज्ञ करण्याचा अधिकार नाही असा एक स्वतंत्र वर्ण निर्माण झाला. परंतु उपनिषदांमध्ये यज्ञसंस्थेच्या आधारावर जे तत्त्वज्ञान उदयास आले त्याचा अधिकार मात्र सर्वांनाच सारखा होता, असे आढळून येते. तात्पर्य ब्राह्मणकाळांत समाजात असलेली ही वर्णव्यवस्था समाजाच्या सर्वांगीण उत्कर्षासच कारणीभूत झाली, असे म्हणावे लागेल.

स्त्रियांचे स्थान

ब्राह्मणग्रंथांत मुख्यत: अनेक प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत. हे सर्व यज्ञ एकट्याने करावयाचे नसून विवाहपूर्वक अग्नींची स्थापना करून पत्नीसमवेत करावयाचे असतात. श्रौतयज्ञ करण्यासाठी प्रथम अग्न्याधान करून तीन अग्नी स्थापित करावे लागतात. म्हण-जेच अग्निहोत्र घ्यावे लागते. अर्थात यज्ञकर्त्या यजमानाइतकेच पत्नीचे स्थानही श्रेष्ठ

1. *Ancient India.*, P. 110

असे. तैत्तिरीय ब्राह्मणांत (३·३·३·१) म्हटले आहे, की 'अयज्ञो वा एष योऽपत्नीकः' (पत्नीशिवाय केलेला यज्ञ हा यज्ञच नव्हे). यज्ञामध्येच पत्नीचे स्थान श्रेष्ठ समजले जात नसून सर्वच बाबतीत पत्नी ही पुरुषाची अर्धांगी समजली जाई[1]. याचाच अनुवाद करताना महाभारतातही म्हटले आहे की, 'अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा' (पत्नी हे मनुष्याचे अर्धे अंग असून ती त्याचा सर्वश्रेष्ठ मित्र आहे)[2].

पती आणि पत्नी हे कसे उत्पन्न झाले हे सांगताना बृहदारण्यकांत (१·४·३) म्हटले आहे, की त्या श्रेष्ठ प्रजापतीला एकटयाने करमेना. दुसरे कोणीतरी असावे, असे त्याला वाटू लागले. त्याने आपल्या स्वतःचेच दोन भाग केले. एका भागापासून पती बनला व दुसऱ्या भागापासून पत्नी निर्माण झाली. म्हणजेच पती आणि पत्नी यांचे सहजीवन म्हणजे संपूर्ण जीवन होय. पत्नी या शब्दाचाच अर्थ 'यज्ञाशी संबंधित असलेली भार्या' असा पाणिनीने सांगितला आहे[3]. यज्ञकर्मात अनेक ठिकाणी पत्नीला काही विधी करावे लागतात व त्यासाठी मंत्रही म्हणावे लागतात. दर्शपूर्णमासयागांत पत्नीला योक्त्र म्हणजे मुंज गवताची दोरी कमरेला बांधावी लागते. त्यावेळी ती म्हणते, की मी इंद्राणीप्रमाणे नित्य सौभाग्यवती होईन. अदितीप्रमाणे चांगल्या संततीने युक्त होईन. माझे पुत्र हे शत्रूंवर विजय मिळवणारे असावे व माझी मुलगी ही सम्राज्ञी व्हावी[4].

घरामध्ये असलेल्या संपत्तीची पत्नीच मालकीण असते, असे तैत्तिरीय संहितेत (६·२·१) म्हटले आहे. सोमयागांत हवनासाठी लागणारा सोम विकत घेतल्यानंतर त्याला राजा समजून मोठ्या सन्मानाने यज्ञमंडपात आणले जाते आणि त्याचा सत्कार केला जातो. राजाबरोबर ज्याप्रमाणे परिवार असतो, त्याप्रमाणे या सोमराजाबरोबर छंदोरूपी परिवार आला आहे, असे म्हटले आहे. या सोमराजाचे परिवारासह स्वागत करण्याचे काम हे पत्नीकडे दिलेले असते. म्हणून आतिथ्येष्टीमध्ये बरीचशी कामे पत्नीने करावयाची असतात. योगक्षेम या शब्दातील क्षेम शब्दाच्या अर्थाचा विचार केल्यास पत्नीच्या कर्तव्यासंबंधी माहिती मिळते. 'प्राप्तस्य रक्षणं क्षेमः' म्हणजे 'जे मिळालेले आहे त्याचे रक्षण करणे' हे पत्नीचे काम होय.

यज्ञाच्या संबंधात पत्नीचा अधिकार मोठा असला, तरी ब्राह्मणकाळी विवाहासंबंधी फारशी कडक बंधने नव्हती, असे दिसून येते. क्षत्रियांना अनेक बायका करता येत. मैत्रायणी संहितेत मनूला दहा बायका असल्याचा उल्लेख आहे. राजाला समाजातील अनेकांचे सहकार्य संपादन करण्याचे साधन म्हणूनही त्याला अनेक विवाह

---

१. तै. ब्रा. ३·३·३·५–अर्धो वा एष आत्मनः यत् पत्नी ।

२. म. भा. आदिपर्व ७४·४१.

३. अष्टा. ४·१·३३–पत्युर्नो यज्ञसंयोगे ।

४. हि. श्रौ. सू. १·७.

करण्याची परवानगी असावी. अशा अनेक बायका असलेल्या राजाने यज्ञामध्ये कोणते विधी अधिक करावे, याचाही निर्देश काही ठिकाणी केलेला आढळून येतो. दीक्षा, योक्त्रबंधन इत्यादी विधी कोणत्या क्रमाने करावे याचा विचार काही ब्राह्मणग्रंथांत केला आहे. राजाला चार बायका असत (१) महिषी (पट्टराणी) (२) वावाता (आवडती) (३) परिवृक्ती (बहिष्कृत) व (४) पालागली (अमात्याची मुलगी किंवा प्रेयसी). च्यवनाला भेट म्हणून एका राजाने आपली मुलगी दिली, असा उल्लेख जैमिनी ब्राह्मणांत आहे. आन्तरवर्णीय विवाह ब्राह्मणकाळी रूढ असावे. उर्वशी–पुरुरवस (श. ब्रा. ११·५·१), शकुंतला–दुष्यंत (श. ब्रा. १३·५·४), च्यवन–सुकन्या, इत्यादींच्या कथांवरून ही गोष्ट स्पष्ट होते. जानश्रुती पौत्रायणाने आपली मुलगी रैक्वाला दिली, असा उल्लेख छांदोग्य उपनिषदांत (४·२·४) आहे.

ब्राह्मणकाळी सगोत्र विवाह हा ज्याप्रमाणे निषिद्ध नव्हता (श. ब्रा. (१·८·३·६), त्याचप्रमाणे काही अंशी स्वैराचारही लोकमान्य असावा, असे दिसून येते. यासंबंधी चातुर्मास्य यागांत असलेल्या एका चमत्कारिक विधीचा उल्लेख येथे ध्यानात घेण्यासारखा आहे. पत्नी ही पतीची विकत घेतलेली वस्तू आहे. म्हणून तिने दुसऱ्या कोणा पुरुषाबरोबर संबंध ठेवणे योग्य नव्हे, असे मैत्रायणी संहितेत (१·२·११) म्हटले आहे. चातुर्मास्य यागातील या विधीमध्ये पत्नीला असे स्पष्टपणे विचारावे, की 'तुला किती जार आहेत ?' जार असूनही तिने त्यांची नावे सांगितली नाहीत, तर ज्ञातिबांधवाचा नाश होतो, असे तैत्तिरीय ब्राह्मणांत (१·६·५) म्हटले आहे. तिने जारांची नावे सांगितल्यास 'त्या जारांना वरुणाने शिक्षा करावी' असे म्हणावे. जार असल्यामुळे तिच्या हातून जे पाप घडले ते त्या जारांची नावे स्पष्टपणे सांगितल्यामुळे नाहीसे होते, असे शतपथांत म्हटले आहे.[1]

परंतु ब्राह्मणग्रंथांतील यज्ञाच्या संबंधात मात्र पत्नीला समान अधिकार दिलेला आहे, असे दिसून येते. अनेक यज्ञांची विधाने करताना स्वर्गकामः, स्वाराज्यकामः, पशुकामः यासारखे शब्द येतात. मीमांसाशास्त्रकारांनी या सारख्या शब्दांचा विचार करून स्त्री आणि पुरुष ह्या दोघांनाही यज्ञाचा समान अधिकार आहे, असे प्रतिपादन केले आहे.[2]

शिक्षण

ब्राह्मणग्रंथांत वेदाध्ययनासंबंधीं फारसे उल्लेख आढळत नसले, तरी ज्यांना ज्यांना यज्ञ करण्याचा अधिकार दिलेला होता त्यांना वेदाध्ययनाचाही अधिकार होता, असे दिसते. गुरूंच्याकडे जाऊन हे अध्ययन होत होते. गुरूंच्या घरी विद्यार्थ्यास नेऊन पोहोचवणे यासाठी जो विधी होत असे, त्यास उपनयन असे म्हटले आहे. शतपथ ब्राह्मणांत (११·३·३) उपनयनाचा बराचसा विधी सांगितला आहे. यज्ञकर्मात

---

१. श. ब्रा. २·५·२–निरुक्तं वा एनः कनीयो भवति ।

२. जै. सू. ६·१·६–१५.

स्त्रियांनाही काही मंत्र म्हणावे लागत. त्यामुळे त्यांचेही उपनयन करून त्यांना वेदाध्ययन करण्यास परवानगी होती, असे म्हणावे लागते. शिक्षणाची अशा प्रकारे सर्वांनाच समान संधी मिळत असली पाहिजे. प्रत्येक वर्णातील त्या त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील आयुष्यात उपयोगी पडेल, असे शिक्षण देण्याची व्यवस्था ब्राह्मणकाळांत असली पाहिजे. परंतु ह्या संबंधी फारसे उल्लेख आढळून येत नाहीत. स्त्रियांना नृत्य शिकविले जात असे, असे काही ब्राह्मणग्रंथांत म्हटले आहे. आपल्यापेक्षा वयस्क असलेल्या लोकांना अङ्गिरस शिकवतो, असे तांड्य ब्राह्मणात (१३·३·२३) म्हटले आहे. अङ्गिरसाची ही कथा मनूनेही (२·१५६) सांगितली असून त्यात शेवटी असे म्हटले आहे, की "यो वै युवाऽप्यधीयानस्तं देवाः स्थविरं विदुः" (अर्थ—जो कोणी तरुण असून विद्वान असेल, त्याला देव, म्हातारा म्हणजे परिपक्व बुद्धीचा समजतात). विद्यार्थी गुरूच्याकडे जाताना हातात समिधा घेऊन जाई आणि गुरु त्याचे कुल गोत्र विचारून स्वीकार करी, असे उल्लेख अनेक उपनिषदांत आढळून येतात. छांदोग्य उपनिषदांत (८·७) इन्द्र–विरोचनांची कथा आली आहे. ते दोघेही प्रजापतीकडे समित्पाणी गेले असे म्हटले आहे. कोणत्याही मोठ्या माणसाकडे रिक्तहस्ते जाऊ नये, तर हातात काही तरी घेऊन जावे, असा संकेत नंतरच्या काळी रूढ झाला. तैत्तिरीय आरण्यकांत अंतर्भूत असलेल्या शिक्षावल्लीमध्ये आचार्याने विद्यार्थ्यांना 'सत्यं वद धर्मं चर' वगैरे जो उपदेश करायचा असतो, त्यांचा उल्लेख आला आहे.

आहार व करमणूक

यज्ञाच्या अनुषंगाने पुरोडाश, चरु, पायस, आमिक्षा इत्यादी अनेक हवी तयार करण्यास सांगितले आहेत. हे हवी तयार करण्याचे तपशीलवार विधान वेगवेगळ्या ब्राह्मणांत सांगितले आहे. चातुर्मास्य यज्ञात गृहमेधीय कर्मामध्ये दुधात शिजविलेला भात तयार करण्यास सांगितले आहे.[1] यवागू, पिठाचा चरू, करंभ, आमिक्षा, लाजा, धाना, इत्यादी अनेक हवी सांगितले आहेत, त्यावरून तत्कालीन लोकांना निरनिराळे पदार्थ तयार करण्याची माहिती होती, असे दिसते. प्राचीन काळी मांसाहार चालत होता. पशुयाग रूढ होते. या पशुयागांत सर्व लोक हविःशेष भक्षण करीत. सौत्रामणी व वाजपेय यज्ञांचे विधान करताना सुरा तयार करण्याचा संपूर्ण विधी आला आहे. त्यावरून सुरापान रूढ असावे, असे दिसते.

ब्राह्मणकाळांतील लोक अत्यंत रसिक होते. वाजपेय यज्ञात रथांच्या शर्यतीचा एक मोठा समारंभ होत असतो. त्यामध्ये यजमानाबरोबर देशातील ग्रामणी, सेनापती वगैरे अनेक लोक सहभागी होत. राजसूय यज्ञातही अनेक गमतीचे विधी आहेत. राजसूय यज्ञात होत्याने राजाला शौनःशेपाख्यान ऐकवावे, असे ऐतरेय ब्राह्मणांत (७·१८) म्हटले आहे. सोन्याच्या कवड्यांनी व फाशांनी द्यूत खेळावे, असे सांगितले आहे. महाव्रत नावाच्या यज्ञांत झोपाळ्यावर बसून होता शस्त्र म्हणतो.

---

१. तै. सं. १·८·४–सर्वासां दुग्धे सायं चरुम् ।

सुवर्णाच्या आसनावर असून अध्वर्यू उत्तरे देतो. स्त्रिया शंभर तारा लावलेले तंतुवाद्य वाजवितात. घागरी डोक्यावर घेऊन काही स्त्रिया नृत्य करतात. सारस्वत सत्रात सर्व मंडपांना चाके असतात. एक सोमयाग झाल्यावर सर्वजण जयघोष करीत पुढे जातात. अश्वमेधात ब्रह्मोद्य (कोडी) घालण्याचा विधी असतो. अश्वमेधात घोडा सोडल्यावर राजाने गायन–वादन करावावयाचे असते. अशा-प्रकारे ब्राह्मणग्रंथांत अनेक प्रकारच्या करमणुकींचा व वेगवेगळ्या गंमतीदार गोष्टींचा उल्लेख आढळून येतो.

उद्योगधंदे व आर्थिक स्थिती

ब्राह्मणग्रंथांत आलेल्या यज्ञसंस्थेचा सूक्ष्मतेने अभ्यास केल्यास ती सामाजिक जीवनाचे केन्द्र कशा प्रकारे बनली होती, हे कळून येईल. वैयक्तिक स्वरूपाचे ज्या-प्रमाणे यज्ञ होते, त्याचप्रमाणे संपूर्ण समाजाचा संबंध ज्यांमध्ये आहे, असेही यज्ञ ब्राह्मणग्रंथांत आढळून येतात. मोठमोठ्या यज्ञप्रसंगी अनेक विद्वान एकत्र येत आणि निरनिराळ्या सामाजिक गोष्टींवर चर्चा करीत. या चर्चांतून अनेक गोष्टींचे निर्णय लागत. जनमेजयाने केलेल्या सर्पसत्राच्या वेळी तेथे जमलेल्या लोकांना व्यासांनी महा-भारत सांगितले, असे महाभारतातच म्हटले आहे. समाजातील सर्व थरांचा एक यज्ञकल्पनेशी संबंध जोडला गेला आहे. म्हणूनच उद्योगांवरून पडलेल्या अनेक वर्णांचा उल्लेख ब्राह्मणग्रंथांत आढळून येतो.

यज्ञासाठी अनेक प्रकारची धान्ये लागत. त्यांमध्ये नीवार, इत्यादी अरण्यांतील धान्यांबरोबरच शेतांतून पिकलेल्या धान्याचाही निर्देश आहे. लाङ्गल, फाला, वरत्र, इत्यादी अवजारांचा उल्लेख तैत्तिरीय संहितेत (४·२·५) आला आहे. शेत नांगरण्याचा-ही उल्लेख अनेक ठिकाणी आढळतो. तांदूळ, तीळ, यव, गोधूम, प्रियङ्गु, गार्मुत, इत्यादी धान्यापासून तयार केलेले हवी यज्ञांत सांगितले आहेत. दूध व तूप या तर नेहेमीच लागणाऱ्या गोष्टी. याशिवाय अनेक पशुयाग सांगितले असून त्या संदर्भात गाय, बैल, शेळी, बोकड, मेंढी इत्यादी पशूंचे निर्देश आढळतात. तात्पर्य, त्याकाळीं शेती आणि पशुपालन हा मुख्य व्यवसाय चालत असला पाहिजे.

यज्ञांत ज्या अनेक वस्तू लागत, त्या तयार करून देणारे लोकही वेगवेगळे व्यवसाय करणारे असावेत, असे आढळून येते. लाकडाची वेगवेगळी पात्रे तयार करून देणारे म्हणून रथकारांचा उल्लेख आहे; तर महावीर, चयनातील विटा, उखापात्र, स्थाली, इत्यादी मातीची भांडी तयार करून देणाऱ्या कुंभारांचाही कुशल असा वर्ग त्याकाळी होता, असे दिसते. महाव्रत आणि राजसूय या यज्ञांच्या निमित्ताने वाघ, बैल, वराह यांच्या कातड्यांचा उल्लेख आहे (तै. ब्रा. १.७.८). ओले कातडे ओढण्याचा उल्लेखही तैत्तिरीय ब्राह्मणांत (१·२·६) आहे. कृष्णाजिन सर्वच यज्ञांत लागते. सौत्रामणी नावाच्या यज्ञात सुरा तयार करण्यासाठी कातड्याने मढवलेले बांबूचे

एक पात्र (कारोतर नावाचे) लागते. यावरून वेगवेगळ्या जनावरांची कातडी तयार करून देणारे चर्मकार नावाचे लोक असले पाहिजेत. यांचा उल्लेख तैत्तिरीय ब्राह्मणात (१·२·६) आला आहे. सुवर्णकुंडले, वाजपेयात कंठी, प्रवर्ग्यांत रुक्म, अष्टाप्रुड् म्हणजे आठ कोपरे असलेला अलंकार, सोन्याची साखळी (तै. सं. २·४·१३) इत्यादी दागिन्यांचा उल्लेख येतो. त्यावरून सुवर्णकारांचाही एक स्वतंत्र वर्ग असावा, असे दिसते. चातुर्मास्य यज्ञाच्या संदर्भात नापिताचा उल्लेख ब्राह्मणात आला आहे (श. ब्रा. ३·१·२; तै. ब्रा. १.५.६). वपनासंबंधी अनेक बारीकसारीक गोष्टींचा निर्देश ब्राह्मणांत आढळतो. देवांच्या नापितास देवश्र असे म्हणतात. अशाप्रकारे यज्ञसामग्रीचा विचार करताना समाजात असलेल्या सर्व प्रकारच्या लोकांमध्ये सामाजिक एकता निर्माण करण्याचे साधन म्हणजे यज्ञ होते, असे दिसून येते.

याशिवाय सूत, ग्रामणी, निषाद, भिषक्, कर्मार, इत्यादी अनेक लोकांचा उल्लेख यज्ञाच्या संबंधात आला आहे. तत्कालीन समाजात बहिष्कृत समजल्या जाणाऱ्या काही जनसमूहांचा उल्लेखही ब्राह्मणग्रंथांत आढळतो. उदाहरणार्थ, चांडाळ (श. ब्रा. १४·७·१; तै. ब्रा. ३·४·१७), पुलिन्द (ऐ. ब्रा. ७.१८), शबर (ऐ. ब्रा. ७.१८), नपुंसक (तै. ब्रा. १.८.५). परंतु या लोकांचा देखील या ना त्या रूपाने यज्ञाशी संबंध जोडून त्यांना आर्यसमाजात सामावून घेतलेले दिसून येते. अशा प्रकारे समाजातील भिन्न भिन्न वर्णांचा आणि वर्गांचा उल्लेख आढळत असला, तरी त्यामध्ये उच्चनीचता नव्हती. सर्व समाज हा एकरूप असाच होता.

पुरुषमेधाच्या संदर्भात तैत्तिरीय ब्राह्मणात (३·४·१·१९) अनेक लोकांचा उल्लेख केला आहे. प्रत्यक्ष नरमेध त्याही काळात रूढ असावा, असे म्हणता येत नाही. समाजातील अनेकांचा यज्ञाशी संबंध होता, येवढेच यावरून म्हणता येईल. रथकार, हस्तिप, अश्वप, वित्तप, दावप, वनप, किरात, वीणावादी, कोशकार, इत्यादी अनेकांचा उल्लेख या ठिकाणी केला आहे. हे सर्व वर्ण आणि वर्ग उद्योगधंद्यावरूनच समजले जात असत; जन्मावरून नव्हे.

ब्राह्मणकाळांत गाई हेच मुख्य धन समजले जाई. ज्याच्याजवळ अधिक गाई तो श्रीमंत. परंतु अशा मनुष्यानेही संपत्तीचा संचय न करता ती इतरांना वाटली पाहिजे, असे सांगितले आहे. प्राचीन काळी देशाचे संरक्षण करणारे जे राजे होते, ते श्रीमंत असत. परंतु त्यांनाही आपल्या श्रीमंतीचा गर्व वाटू नये, म्हणून सहस्रदक्षिण आणि सर्वस्वदक्षिण असाही यज्ञ त्यांना करण्यास सांगितला आहे. या यज्ञांत मिळणारी दक्षिणा हेच ब्राह्मणांचे उपजीविकेचे साधन असे. समाजाचे आणि राष्ट्राचे नैतिक व आत्मिक सामर्थ्य वाढविण्याचे व त्यासाठी ज्ञानाची उपासना करण्याचे महत्त्वाचे काम ब्राह्मणांचे असे. ब्राह्मण, क्षत्रिय आणि समाजातील अन्य सर्व वर्ण व वर्ग यांच्यांत नेहमी एकोपा राहिलेला आढळून येतो. काही अंशी आर्थिक विषमता आढळली, तरी ती बोचक नव्हती. संपूर्ण समाज हा खाऊन पिऊन सुखी होता. आणि

यज्ञधर्माने तो एकत्र सांधला, बांधला गेला होता. अशा प्रकारे व्यक्तिगत आचारभिन्नता आणि उद्योगांमध्ये वेगळेपणा दिसत असला, तरी समाज हा एकरूप असाच होता, एका सूत्रात गुंफलेला होता. कोणत्याही राष्ट्रीय आणि दैवी संकटाच्या वेळी समाज हा एकत्वाने उभा राहिलेला आढळून येतो.

ब्राह्मणग्रंथ व अन्य शास्त्रे

वेदांग ज्योतिषात म्हटले आहे, की 'वेद हे यज्ञासाठी निर्माण झालेले आहेत. हे यज्ञ वेळच्या वेळी केले पाहिजेत म्हणून योग्य काळ समजण्यासाठी कालविधानशास्त्राची म्हणजे ज्योतिषाची अत्यंत आवश्यकता आहे.' तात्पर्य यज्ञ आणि ज्योतिष यांचा निकटचा संबंध आहे. ब्राह्मणग्रंथांत जे अनेक प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत, त्यांवरून ज्योतिषविषयक पुष्कळ माहिती आढळून येते. शतपथ ब्राह्मणामध्ये (२·१·२·३) आलेल्या 'एता ह वै प्राच्यै दिशो न च्यवन्ते' (म्हणजे कृत्तिकानक्षत्र पूर्वदिशेकडून केव्हाही ढळत नाही) या उल्लेखावरून अनेक प्रकारे संशोधन करून ब्राह्मणांचा कालनिर्णय करण्याचा प्रयत्न अनेक विद्वानांनी केला आहे. अग्न्याधानासंबंधी विधान सांगताना तैत्तिरीय ब्राह्मणांत (१·१·२) म्हटले आहे, की 'पूर्वा फल्गुनी नक्षत्र ज्या पौर्णिमेला असेल, ती वर्षाची शेवटची रात्र होय.' यावरून वर्षारंभ केव्हा समजावा, हेही ध्यानात येते. अश्वमेघाचा प्रारंभ चित्रा नक्षत्रावर करावा (तै. ब्रा. ३·८·१); तसेच ओदनसवाची सुरुवात रोहिणी नक्षत्रावर करावी (तै. ब्रा. २·७·९) असे तैत्तिरीय ब्राह्मणांत म्हटले आहे. अग्न्याधान कोणकोणत्या नक्षत्रावर करावे, यासंबंधी ब्राह्मणग्रंथांत वेगवेगळ्या कालाचा निर्देश केलेला आढळून येतो. अधिकमासासंबंधीही ब्राह्मणग्रंथांत विचार केलेला आढळून येतो. चातुर्मास्य यज्ञाचे अनेक प्रकार सांगताना त्यांत पंचसंवत्सर चातुर्मास्य सांगितला आहे. म्हणजे पाच वर्षांमध्ये या यज्ञाचे अनुष्ठान करायचे. या संबंधीचे विधान करताना मैत्रायणी संहितेत (१·१०·८) या पाच वर्षांत दोन महिने सोडण्यास सांगितले आहेत. म्हणजे ऋतुचक्राचा विचार करता पाच वर्षांत दोन महिने अधिक धरावे लागतात. म्हणजे पाच वर्षांत दोन अधिक महिने धरून सौरमास व चांद्रमास यांचा मेळ घातला आहे. या पाच वर्षांच्या काळास वेदांग ज्योतिषात युग असे म्हटले आहे. तात्पर्य ज्योतिष आणि यज्ञ यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे, ही गोष्ट स्पष्ट होते.

आयुर्वेदाचा यज्ञकर्माशी जवळचा संबंध आहे. चातुर्मास्य यज्ञास भैषज्ययज्ञ म्हणावे, असे गोपथ ब्राह्मणांत (२·१·१०) म्हटले आहे. रोग बरे व्हावेत, मनुष्याचे आरोग्य टिकावे यासाठीही अनेक प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत. यज्ञामध्ये पशूची अंगे काढणे, वपा काढणे इत्यादी संबंधी ब्राह्मणग्रंथांत बारकाईने माहिती सांगितली आहे. त्याच्या सर्व तंत्राचा नीट विचार केल्यास आयुर्वेदातील शल्यचिकित्सा त्यातूनच प्रगत झालेली आहे, असे दिसून येते. क्षय, पाप व दारिद्र्य यांतून माझी सुटका होऊ दे, असे तैत्तिरीय ब्राह्मणांत (२·५·६) म्हटले आहे. यज्ञाच्या संदर्भात अनेक प्रकारच्या

वनस्पतींचा उल्लेख आढळून येतो. या वनस्पतींचा औषधी उपयोग लक्षात घेणे हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे.

यज्ञांच्या संबंधात वेगवेगळ्या प्रकारची मोजमापे घेण्याचे उल्लेख ब्राह्मणग्रंथांत आढळतात. वेदिमान, मंडपनिर्माण, अग्नींची आयतने इत्यादी तयार करण्याचे शास्त्र ब्राह्मणकाळातच तयार होत होते. चयनासंबंधी विधान करताना जमीन नांगरणे, ती मोजणे, मातीच्या विटा तयार करणे, त्या योग्य ठिकाणी मांडणे आणि एक सुंदर आकृती निर्माण करणे यांसंबंधीचे जे निर्देश आढळून येतात, त्यातूनच स्थापत्यशास्त्र आणि भूमिती यांचा विकास झालेला आहे, हे आढळून येईल.

विज्ञान, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, गणित, शेती इत्यादी अनेक शास्त्रांची माहिती ब्राह्मणग्रंथांत विखुरलेली आहे. त्याचप्रमाणे समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थ-व्यवस्था इत्यादी शास्त्रांचीही माहिती यज्ञांच्या अनुषंगाने ब्राह्मणग्रंथात आली आहे. या सर्व गोष्टींचा सखोल अभ्यास केल्यास त्यांतून अनेक प्रकारचे संशोधन होण्यासारखे आहे.

ब्राह्मणग्रंथ व तत्त्वज्ञान

ब्राह्मणग्रंथांमध्ये आलेल्या यज्ञयागाचा विचार करता त्यातूनच तत्त्वज्ञानाचा उगम व विकास झालेला आहे, हे दाखवून देता येते. वेगवेगळ्या यज्ञांचे विधान सांगत असताना 'य एवं वेद' (म्हणजे 'जो हे जाणतो') असे वाक्य अनेक ठिकाणी आढळते. म्हणजे प्रत्यक्ष यज्ञ न करता त्याचे सम्यग् ज्ञान झाले, तरीही ते महत्त्वाचे आहे. नुसत्या कर्मापेक्षा ज्ञान हे केव्हाही श्रेष्ठ. पण ते ज्ञान कर्मातूनच मिळालेले असले पाहिजे. उपनिषदांमध्ये तत्त्वज्ञानाचा जो विचार मांडलेला आहे, तो ब्राह्मणग्रंथांतील यज्ञकर्माच्या आधारावरच. ब्राह्मणांतील यज्ञसंस्थेतूनच उपनिषदांचे तत्त्वज्ञान साकार झाले आहे. यज्ञप्रक्रियेचे संपूर्ण ज्ञान असेल, तरच तत्त्वज्ञानाची उकल होऊ शकेल. छान्दोग्य उपनिषदांत (३·१६) यज्ञाच्या परिभाषेतूनच मनुष्याच्या संपूर्ण जीवनाचा विचार मांडलेला आढळून येतो. मानवी आयुष्याचे तीन भाग कल्पून त्यांना प्रातःसवन, माध्यंदिनसवन आणि तृतीयसवन असे म्हटले आहे. या भागावर भाष्य करताना शंकराचार्यांनी या जीवनयज्ञाला 'यज्ञदर्शन' असेच म्हटले आहे. तैत्तिरीय आरण्यकात (१०·६४) एका व्यक्तीचे दैनिक जीवन कसे असावे याचा विचार मांडताना जीवन हे 'जरामर्य' नावाचे अग्निहोत्र आहे, असे म्हटले आहे.

ब्राह्मणग्रंथांत 'यज्ञो वै प्रजापतिः,' 'यजमानः प्रस्तरः,' 'पृथिवी ध्रुवा,' 'प्रजा वै बर्हिः,' 'प्राणो वै पृषदाज्यं,' 'विष्णुर्यज्ञः' अशासारखी शेकडो वाक्ये आढळतात. यावरून यजमान, ऋत्विज, देवता, यज्ञपात्रे, हविर्द्रव्य या सर्वांमध्ये एकता दाखवावयाची आहे. यास बन्धुता असे म्हटले आहे. 'तस्य असौ बन्धुः' असे वाक्य शतपथ ब्राह्मणांत अनेक ठिकाणी आढळून येते. या एकत्वाच्या कल्पनेतूनच

अद्वैताचे तत्त्वज्ञान उत्पन्न झाले आहे, असे म्हणता येईल. ब्राह्मणग्रंथांत आध्यात्मिक विचारांना प्राधान्य दिलेले असून त्यासाठी जी गुणसंपदा आवश्यक आहे, त्याचा उल्लेख करून हे गुण मिळविण्याचा मार्ग सांगितला आहे. ब्राह्मणग्रंथांत आलेल्या यज्ञ शब्दाचा अर्थ त्याग असाच होतो. कारण देवतांना उद्देशून आपल्याजवळ असलेली वस्तू त्यांना समर्पण करणे म्हणजेच आपल्या मालकीच्या असलेल्या वस्तूंचा त्याग करणे होय. त्याग या तत्त्वाचेच यथार्थ पालन करून काही जणांनी मोक्ष मिळविला, असे तैत्तिरीय आरण्यकांत (१०·१०) म्हटले आहे. ईशावास्योपनिषदातही त्यागाचा विचार सांगितला आहे.

सहकार्य, शिस्त, आत्मशुद्धी, उपासना, समाधी, एकरूपता, इत्यादी विविध गुणांचा विचार ब्राह्मणग्रंथांत सांगितला आहे. नित्य सूर्याची म्हणजे तेजाची उपासना करण्याचा विचार मांडत असताना सूर्य आणि अग्नी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, अशी कल्पना तैत्तिरीय ब्राह्मणांत (२·१·२) सांगितली आहे.

चातुर्मास्यातील वरुणप्रघास पर्वात पापांचा नाश होण्यासाठी एक आहुती देण्यास सांगितली आहे. गाव, अरण्य, सभा, स्वतःची इन्द्रिये आणि इतर कोणीही लोक यांच्या संबंधात आपल्या हातून पाप घडले असेल, तर त्याचा नाश होतो, असे त्यावेळी म्हटल्या जाणाऱ्या मंत्रांत (तै. सं. १·८·३) सांगितले आहे. एकरूपतेचा विचार सांगताना एखादा यजमान आपल्या उपास्य देवतेशी एकरूप होत असतो, ही कल्पना तैत्तिरीय संहितेत (१·५·१०) सांगितली आहे. प्रवासास जाताना यजमानाने अग्नीस म्हणावयाचे असते, की "माझे नाव तू धारण कर आणि मी तुझे नाव बरोबर घेऊन प्रवासास जातो;" प्रवासाहून परत आल्यावर नावांची अदलाबदल करण्यासंबंधीचा मंत्रही सांगितला आहे.

अशा प्रकारे ब्राह्मणग्रंथांच्या अभ्यासावरून असे ध्यानात येते, की ब्राह्मणांत केवळ यज्ञकर्मकांडाचाच विचार मांडलेला नसून त्यामध्ये तत्त्वज्ञानाची बीजे आढळून येतात. परंतु कर्म सोडून मनुष्याने ज्ञानाची उपासना करणे योग्य नव्हे, तर ज्ञानमूलक कर्म केले पाहिजे हा कर्मयोगाचा संदेश ब्राह्मणग्रंथांनी दिला आहे. ब्राह्मणांत सांगितलेले प्रत्येक कर्म करीत असताना त्याचे सम्यग् ज्ञान होण्यासाठीच ते मंत्रपूर्वक करावयाचे असते. वेद हे कर्माशीच संबंधित आहेत असे ब्राह्मणग्रंथांच्या अभ्यासावरून स्पष्ट दिसते. ज्ञानपूर्वक कर्म करीत शंभर वर्षे जगा असा संदेश ब्राह्मणांनी आपणास दिला आहे.

समारोप

भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचा कालखंड, व समाजाच्या एकरूपतेचा परमोत्कर्ष, विविधतेमध्ये एकता दाखविणारे वाङ्मय म्हणून ब्राह्मणग्रंथांचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. Unity in diversity (अनेकतेमध्ये एकता) हे तत्त्व ब्राह्मणांत ठिकठिकाणी दिसते. व्यक्तिगत आचारभिन्नता पण सामाजिक एकता हे सूत्र ब्राह्मण-

काळांत होते. सूर्याचे सात रंग वेगळे, पण प्रत्येक दिसणारा रंग मात्र एक. गुलाबाच्या फुलांचे रंग वेगळे, पण सुगंध मात्र एक. हारातील मण्यांचे रंग वेगळे, पण त्यातील सूत्र एकच. त्याप्रमाणे उद्योगावरून पडलेले वर्ण व वर्ग अनेक पण सामाजिकदृष्ट्या समाज एकरस. अस्पृश्यता नाही, भेद नाहीत, उच्चनीचता नाही, आर्थिक विवंचना नाही, शत्रूचे भय नाही आणि कोणत्याही प्रसंगी एक होऊन उभा राहणारा समाज ब्राह्मण-काळात आढळतो. ब्राह्मणकाळानंतर धर्मशास्त्र, स्मृती, निबंध इत्यादींच्या कठोरतेमुळे छिन्न–भिन्न झालेला समाज पुन्हा एकत्वाने आपणास उभा करावयाचा असेल, तर ब्राह्मणग्रंथांत वर्णन केलेल्या समाजाचे सम्यग्दर्शन घेऊनच त्या आधारे आपणास नवसमाज निर्माण केला पाहिजे आणि सामाजिक एकता निर्माण करून एकरूपत्वाने समाजास उभे केले पाहिजे. एकमेकांतील भेदाभेद नाहीसे होऊन खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित होण्यासाठी तैत्तिरीय संहितेत (२·२·११) संज्ञानी नावाची इष्टि सांगितली आहे. त्यात म्हणावयाची प्रार्थना करून मी माझे विवेचन पुरे करतो.

समानो मन्त्रः समितिः समानी । समानं मनः सह चित्तमेषाम् ।
समानं केतो अभि सँरभध्वम् । संज्ञानेन वो हविषा यजामः ।
समानी व आकूतिः । समाना हृदयानि वः ।
समानमस्तु वो मनः । यथा वः सुसहासति ॥

(अर्थ—ह्या सर्वांचे विचार एक, संघटण एक व मने एकरूप असावी. अन्तःकरण एक असावे. एका ध्वजाखाली तुम्ही पुढे चला. संज्ञान नावाच्या हवीने आम्ही तुमचा यज्ञ करू. तुमचा अभिप्राय एक असावा. तुमची हृदये एक असावी. तुमचे मन एक असावे, की जेणेकरून तुमची संघशक्ती बळकट होईल–तै. ब्रा. २·४·४·५).

असो. भारत इतिहास संशोधक मंडळ व इचलकरंजीकर ट्रस्ट यांच्या प्रमुखांनी मला व्याख्याने देण्याची जी संधी दिली, त्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

सकळकळेकृत शिवकाव्य

लेखक : रा. पां. गोस्वामी

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनचरित्र ज्या अनेक संस्कृत काव्यांचे विषय झालेले आहे त्यात शिवभारत, पर्णालपर्वतग्रहणाख्यान, पुरुषोत्तमपंडितकृत शिवकाव्य हे प्रामुख्याने होत. आज असेच आणखी एक शिवकाव्य प्रथमच प्रकाशित करण्याचा सुयोग येत आहे. याचा कर्ता संकर्षण सकळकळे हा असून ग्रंथाचे नाव शिवकाव्य असे आहे.

या ग्रंथाच्या हस्तलिखिताची एक प्रत भारत इतिहास संशोधक मंडळाच्या समृद्ध हस्तलिखित-संग्रहात उपलब्ध असून हे हस्तलिखित मंडळात जवळ जवळ साडेतीन तपे संशोधन व सेवा करणारे प्रा. ग. ह. खरे यांच्या प्रयत्नाने नाशिक येथील श्री. पंचाक्षरी यांच्या संग्रहातून आलेले आहे. हा सर्व संग्रह सौ. पंचाक्षरी यांच्या माहेरकडील पैंगे घराण्यातून त्यांचेकडे आला होता.

या पोथीचा आकार २४ × १० सें. मी. असून पाने १ ते ५६ व ५९ ते ११७ आहेत. प्रत्येक पृष्ठावर आठ ओळी असून प्रत्येक ओळीत सरासरी ३० अक्षरे आहेत. र ट प व च या व इतरहि अनेक अक्षरांची लेखकाच्या अनवधानाने अथवा मूळ पोथीतील अक्षरे न समजल्याने अदलाबदल झालेली आहे व काही ठिकाणी दोन-चार अक्षरे मावतील एवढ्या रिकाम्या जागा सोडल्या आहेत. यावरून ही पोथी अन्य हस्तलिखिताची नक्कल असल्याचे सिद्ध होते.

पोथीची सुरुवात दुसऱ्या सर्गापासून झालेली असून शेवटचा सर्ग सतरावा आहे. एकूण श्लोकसंख्या सुमारे ११६० आहे. उपेंद्रवज्रा वृत्त व अनुष्टुभ् छंद याचा मुख्य वापर असून इतरही अनेक वृत्ते उपयोजिली आहेत.

या काव्यात शिवचरित्रातील तीन महत्त्वाचे प्रसंग आलेले आहेत. ते म्हणजे चंद्रराव मोऱ्याचे पारिपत्य, कोकण-दिग्विजय (कल्याण-भिवंडी मोहीम) व अफझलवध हे होत. यांसाठी प्रत्येकी एक सर्ग लिहिला आहे. या शिवाय देवगिरीच्या कर्ण नामक रजपूत राजाकडे दोनदा राजदूत-प्रेषण असून त्यासाठी जवळ जवळ दोन सर्ग खर्चिले आहेत. उरलेल्या ग्रंथांत फारच थोडी ऐतिहासिक माहिती आलेली असून त्या त्या प्रसंगास अनुसरून उद्यान-विहार, ऋतुवर्णन, प्रदेशवर्णन, सैन्यवर्णन, उत्सव, दान-यज्ञ, पंडित-सभा, रत्न-वधू-परीक्षा, मानसपूजा, शिवस्तुती, राजनीती हे विषय आले आहेत. अशा रीतीने प्रसंगानुरूप विषयवैविध्य आणून तेथे त्या त्या शास्त्रातील ज्ञान मांडून एक प्रकारे ज्ञानकोशच तयार करावा अशा उद्देशाने हा ग्रंथ लिहिला असून

त्यासाठी शिवचरित्र हे केवळ आधार म्हणून घेतले आहे. अशा प्रकारचे संस्कृत ज्ञानकोश पूर्वीहि अनेक राजदरबारात तयार झालेले आहेत. त्यांत सोमेश्वराचा अभिलषितार्थचिंतामणि, बसवभूपालकृत शिवतत्त्वरत्नाकर व भोजदेवकृत युक्तिकल्पतरु हे प्रामुख्याने होत. तथापि ते ग्रंथ केवळ शास्त्रसंग्रहात्मक असून रूक्ष आहेत प्रस्तुत शिवकाव्यात काव्यविलास, शास्त्रचर्चा व जीवनवृत्त यांस सारखेच महत्त्व दिल्याने याचे काही आगळेच वैशिष्टय निर्माण झाले आहे. तुलनाच करावयाची झाल्यास पुराणे अथवा महाकाव्ये यांच्या शैलीप्रमाणे लिहिलेला हा एक दरबारी काव्याचा (Court poetry) नमुना आहे असे म्हणावे लागेल.

इतिहासाचे साधन म्हणन या ग्रंथाची योग्यता बखरीप्रमाणे ठरेल. चन्द्रराव प्रकरण, उत्तरकोकण मोहीम या प्रसंगांत व इतरत्रही अनेक प्रकारची नवीन माहिती आलेली आहे. त्यांतून शिवाजीच्या अज्ञात चरित्रातील काही दुवे सांधले जातात काय हे पहाणे अगत्याचे असल्याने शिवचरित्राच्या अभ्यासकांना हे काव्य उपेक्षणीय वाटणार नाही.

या काव्याचा कवी स्वतःसंबंधी फार माहिती देत नाही. प्रत्येक सर्गाच्या शेवटी तो बहुधा मातापित्यांसह स्वतःचे नाव देतो. यांत मातेच्या 'भवानी' या नावाचा उल्लेख सर्ग ३, ४, ९, १०, ११, व १२ यांचे शेवटी आहे. पित्याचे नामोल्लेख शिव, शिवबुध, शिवसूरि असे ३, ४, ५, ७, १०, ११, १२ व १६ या सर्गोन्ती आहेत. शिवदास, शिवदाससूरी, शिवदासपंडित असे २, ९, १० व १५ या सर्गान्ती, सदाशिव असा १३ व्या सर्गाचे अन्ती, शिवकोविद असा ६ व ८ चे अन्ती व शिवदास-कोविद असा १७ व्या सर्गान्ती असे एकूण पित्याच्या नावांचे उल्लेख आहेत. स्वतःचे नाव बहुतेक सर्वत्र संकर्षण असे दिले असून सर्ग १४, १५ व १६ यांचे अंती मात्र स्वतःचे नाव शंकर असे दिले आहे.

कवीचा पिता शिवदास हाहि पंडित होता असे सर्गान्तीच्या उल्लेखांवरून वाटते. त्याच्या काही रचना असल्यास त्या अजून उजेडात आल्या नसाव्यात. याचे सदाशिव असे नाव १४ व्या सर्गान्ती कसे दिले आहे हे समजत नाही. प्रतिलिपी करणाऱ्याच्या हस्तदोषाने शिवदासाचे सदाशिव झाले असावे असे वाटत नाही. शहाजीच्या दरबारी असलेल्या ज्या अनेक पंडितांचा उल्लेख राधामाधवविलासचंपूतील भाषासमस्य प्रकरणात आलेला आहे त्यात एक 'ठाकूर शिवदास कविकोविद' आहे. (तब ठाकुर शिवदास तयौं कहत समस्या हेत। वह कविकोविद दरबरकागजपर लिखि लेत ॥ राधामाधवविलासचंपू, पृष्ठ २४८). केवळ शिवदास या नावावरून व कविकोविद या पदवीवरून या कवीचा पिता व शहाजीचा दरबारी हे एकच असे निश्चित ठरविता येत नसले तरी या बाबतीत आणखीहि एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. ती म्हणजे प्रस्तुत काव्यात बहुतेक ठिकाणी शिवाजीचा शाहपुत्र या अर्थी शब्द वापरून उल्लेख केला आहे. अशा रीतीने शहाजीचे नाव काव्यात बळेच वारंवार आणण्याचा

उद्देश कवीच्या पित्याने अथवा कवीने त्याच्या खाल्लेल्या अन्नाला जागण्याचा तर नसावा ? तृतीय सर्गांत वनपालबालकाने आपल्या कवित्वसामर्थ्याविषयी काढलेले उद्‍गार (शिवभक्तनृपालशाहदत्तप्रयतान्नैः परिपोषिताच्चिरेण । जनकाज्जनिरस्ति गद्यपद्यात्मकरूपा शिवभूप मेऽनवद्या ॥ २।१०५) हे कदाचित याच कवीच्या बाबतीत खरे असावेत.

शिवविवाहाचे वेळी कोणा एका सदाशिव नामक ब्राह्मणाचा उल्लेख आलेला आहे (संकेतितेषन्नयनांचलेन श्रुतिप्रियेणैव सदाशिवेन । उपस्तृतेनाञ्जलिना वधूः सा शिवेन लाजानजुहोद्धुताशे ॥ ११।२६). एरवी महत्त्वाचे नामोल्लेख टाळणाऱ्या या कवीने येथे सदाशिव नामक ब्राह्मणाचा उल्लेख करण्याचे प्रयोजन काय ? यावरून पाचव्या व सहाव्या सर्गांतील यज्ञाचे पौरोहित्य करणाऱ्या सकळकळ नामक व्यक्ती प्रमाणेच अकराव्या सर्गातील लग्नाचे पौरोहित्य करणारा सदाशिव हाहि सकळकळे असावा काय अशी शंका येते. सदाशिव व शिवदास एकच होत हे सर्ग १३ व १४ च्या अंतावरून स्पष्ट झाले आहे.

सर्गान्तींचे उल्लेख सोडून दिल्यास प्रत्यक्ष ग्रंथात दोन तीन ठिकाणी सकळकळ नामक व्यक्तीचा उल्लेख आला आहे. ही व्यक्ती कोणी वैदिक, विद्वान् अथवा तपस्वी असावी. कारण शिवाजीने मोरे-मोहिमेवर निघण्यापूर्वी स्वतःच्या ठिकाणाहून निघून दोन कोसावर जेथे मुक्काम केला होता तेथून पुढे निघताना सकळकळ ब्राह्मणाची पूजा केली व आशीर्वाद घेतला (५।१२–१३). सहाव्या सर्गांतहि सकळकळ ब्राह्मण शिवाजीच्या आज्ञेवरून दान-यज्ञाची तयारी यज्ञमंडपासह पूर्ण करतो (६।१७–१८). यानेच त्या यज्ञाचे पौरोहित्यही केले आहे (६।३६). यावरून हा शिवाजीचे निकटवर्ती होता असेहि समजण्यास हरकत नाही. त्या सकळकळचाचे प्रस्तुत काव्याच्या कर्त्याचे नाते स्पष्ट होऊ शकेल असे स्पष्ट प्रमाण या काव्यात कोठेहि मिळत नाही.

प्रस्तुत काव्याचा कर्ता संकर्षण सकळकळे याने आणखी दोन काव्ये लिहिल्याचे आढळून आले आहे. या पैकी एक 'नृसिंहचम्पू' असून याचीं नोंद तंजावर येथील सरस्वती-महाल ग्रंथालयातील संस्कृत हस्तलिखितांचे सूचीत आहे (भाग ७, ३०७६). या सूचीत दिलेला त्याचा अंतिम अंश असा—

इह सकलकलोद्यत्स्फारवाग्ब्रह्मविद्या-
दुरधिगमसमुद्रोत्तुंगपारंगतेन ।
जगदखिलविपश्चिद्भक्तसंकर्षणेन
व्यरचि नृहरिचम्पूकाव्यमेतत्क्षणेन ॥

इति सकलकलाकुलतिलकशिवदाससूरिसूनुसंकर्षणविरचिते
नृसिंहचम्पूकाव्ये चतुर्थोल्लासः । श्रीनृसिंहार्पणमस्तु ।

दुसरे 'रागरत्नकाव्य' बीकानेर दरबारचे संग्रही आहे. (Catalogue of Anup Sanskrit Library by C. Kunhan Raja, Vol. III, No. 3440). या ग्रंथाच्या कालासंबंधी सूचीतील नोंद 'written at आदुणि' अशी आहे. ही स्थानदर्शक नोंद फार महत्त्वाची आहे.

प्रस्तुत काव्यात सर्ग ८ व १५ मध्ये वर्णन केलेल्या कर्णराजाचा मुलगा अनूपसिंह हा इ. १६८९ साली अदोनी येथील किल्ल्याचा अधिकारी नेमला गेला होता. इ. १६९८ साली अदोनी येथेच त्याचा मृत्यू झाला. (गौरीशंकर ओझा : बीकानेर राज्य का इतिहास, प्रथम खंड, पृ. २७२–७३). यावरून तो तेथे नऊ वर्षे असला पाहिजे. अनेक पंडित त्याचे आश्रित होते. संकर्षणाने जेव्हा तेथे रागरत्नकाव्याची रचना केली तेव्हा तो अनूपसिंहाचा आश्रितहि असेल. संकर्षणाने अदोनी येथे ग्रंथरचना करणे व तो ग्रंथ बीकानेरच्या राजसंग्रही उपलब्ध असणे या दोनहि गोष्टींवरून प्रस्तुत कवी या काव्यात वर्णिलेल्या कर्णसिंहांचा व त्याचा मुलगा अनूपसिंह याचा निकटवर्ती होता असे अनुमान काढण्यास हरकत नाही. रागरत्नकाव्याच्या रचनेवरून या ग्रंथकर्त्याचा काळ उशिरात उशिरा इ. १६९८ समजण्यास हरकत नाही. इतकेच काय पण या शिवकाव्यात वारंवार दिलेल्या बारीक सारीक तपशिलावरून तो शिव-समकालीन व शिवाजीचे निकटवर्तीहि असावा असे अनुमान काढल्यास फारसे चुकीचे होणार नाही. शिववनाजवळ रहाणारा सकळकळ ब्राह्मण, वनाचे पश्चिमेस रहाणारा धरणीधरमुनी इत्यादींचे उल्लेख व शिववनातील प्रसंगांचा दिलेला बारीक तपशील यामुळे कवीस शिववनाचा विशेष परिचय असावा असे वाटते. यावरूनही तो शिवाजीचा निकटवर्ती असला पाहिजे असे विशेषेकरून वाटते.

आणखी एक सकळकळ व्यक्ती महाराष्ट्रास परिचित आहे. ती म्हणजे सोमनाथ ऊर्फ सोमाजी सकळकळचा. याचा रागविबोध हा स्वोपज्ञ विवेक टीकेसह लिहिलेला संगीतशास्त्रावरील ग्रंथ प्रसिद्ध असून त्यासंबंधी प. कृ. गोडे यांनी एक लेख लिहिला आहे. (Journal of the University of Gauhati, Vol. 4., 1953, p. 365–68). त्या लेखात सोमनाथाविषयी संपूर्ण माहिती आली नसली तरी त्याच्या काही काव्यांचा परिचयात्मक उल्लेख आहे. त्याचा काळ मात्र त्यांनी 'इ. १७५० पूर्वी' असा ठरविला आहे. भारत इतिहास संशोधक मंडळातील रागविबोधाचे एक हस्तलिखित शक १५९० (इ. १६६८) मध्ये नकललेले आहे. त्यावरून याचा काळ आणखी शंभर वर्षे मागे जातो. तसेच याने रागविबोध हा ग्रंथ इ. १६०९ मध्ये लिहिला असे एम्. कृष्णमाचार्य लिहितात (History of Classical Sanskrit Literature, p. 866). यावरून सोमनाथ हा शहाजीचे समकालीन ठरतो.

'सोमाजी सकळकळचा' हा शब्द हरहुन्नरी माणूस या अर्थी प्रचारात होता असे मोल्स्वर्थ आणि कँडी यांच्या मराठी इंग्रजी कोशावरून दिसते. म्हणजे हा मराठेशाहीत प्रसिद्ध असलेला व शिवकालीन किंवा शिवपूर्वकालीन पंडित होता हे

सिद्ध होते. याचे ठिकाण यमलग्राम होते असे त्याच्या वैराग्यशतक या ग्रंथाच्या अखेरीवरून समजते (गोडे यांचा उपरिनिर्दिष्ट लेख पहावा). वऱ्हाडातील जळगाव जामोद येथे सकळकळ घराणे अजूनहि असून या घराण्यात होऊन गेलेल्या रुद्रनाथ या एका संतपुरुषाचे चरित्र अनन्तकविकृत भक्तरहस्य या ग्रंथात आहे असे हा ग्रंथ संपादन करण्याचा संकल्प केलेले यवतमाळ येथील श्री. द. बा. महाजन, ॲडव्होकेट, यांचेकडून समजते. भक्तरहस्य ग्रंथाचे हस्तलिखित यवतमाळ येथील शारदाश्रम संस्थेतच असल्याचेही समजते. त्यावरून या घराण्याविषयी अधिकही माहिती समजू शकेल, पण प्रस्तुत संकर्षण सकळकळचाच्या संदर्भात तिची उपयुक्तता किती हे या वेळीच सांगता येत नाही. या प्रमाणे हा कवी व त्याचा वंश या संबंधी अधिक संशोधन होणे जरूर आहे येवढे नोंदवून प्रस्तुत विषयाकडे वळतो.

हे एक 'महाकाव्य' रचावे असे प्रथम कवीच्या मनात असावे. सर्ग १२ व्या पर्यन्त बहुतेक सर्गान्ती या काव्यास महत् हे विशेषण त्याने लावले आहे. एका महापुरुषाचे जीवन काव्यास आधार म्हणून घेतले असले तरी त्या निमित्ताने वेळोवेळी अनेक विषय आणले आहेत व मुख्य विषय काही ठिकाणी बाजूस राहिला आहे हे शिववनऋतुलीला, रत्नवधूपरीक्षा, राजनीती इ. सर्गांवरून दिसते. म्हणजे याची रचना पुराणे व महाकाव्ये यांसारखी ज्ञानकोशात्मक करण्याचा कवीचा विचार असावा. हे काव्य वाचणाऱ्यास काव्य–शास्त्र–विनोदाच्या निमित्ताने बहुश्रुतता यावी हा हे काव्य लिहिण्यामागील प्रमुख हेतू दिसतो. (–काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे ......' मम्मट). या काव्याच्या उपलब्ध भागात आलेले विविध विषय व शास्त्रे याविषयीचे कवीचे सखोल ज्ञान पाहिले असता त्याचे सकळकळे हे आडनाव सार्थ वाटते.

परमानन्दकृत शिवभारतात कवित्वाचे अवडंबर व विषयान्तर कमी व घडलेल्या घटनांचा सविस्तर तपशील नावनिशीवार देण्याची प्रवृत्ती अधिक आहे. प्रस्तुत शिवकाव्यात या उलट प्रकार आहे. काही प्रसंगांच्या दिलेल्या सूक्ष्म वर्णनावरून कवीस संबंधित व्यक्तींची नावे व घटनांचे काल निश्चित माहीत असले पाहिजेत परंतु ते काव्यात देण्याचे त्याने हेतुपुरस्सर टाळले असावे असे त्याच्या एकूण शैलीवरून वाटते. अन्यथा जावळीचे युद्ध आठ दिवस चालले, माहुलीचे युद्ध पाच दिवस चालले, चाकण पडल्याचे ऐकून शिवाजी एक दिवसात आपल्या नगरात परत आला हे माहीत असताना वर्ष व महिने देण्यास कोणती हरकत होती ?–'संक्रान्तीच्या प्रथम दिवशी यज्ञ-दानास सुरुवात केली–' असा एकच अर्धवट कालोल्लेख या ग्रंथात आहे (६।३२). काही घटना दिवसाच्या अमुक भागात अथवा अमुक ऋतूत झाल्याचे उल्लेखही आहेत. मात्र वर्षाचे उल्लेख कोठेही नाहीत. व्यक्तींचेही नामोल्लेख टाळलेले असून काही ठिकाणी त्यांची नावे ध्वन्यर्थाने सूचित केली असावीत असे वाटते (त्याची चर्चा त्या त्या प्रसंगी पुढील विवेचनात केली आहे). नामोल्लेख टाळल्यामुळे काही काल्पनिक व्यक्ती काव्यासाठी उभ्या केल्या असाव्यात असे सकृद्दर्शनी वाटले तरी वस्तुत: तसे नसावे.

जावली व माहुली येथील युद्धात शिवाजीचे प्रथम झालेले पराभव, तसेच चाकणचा पराभवही कवी वस्तुनिष्ठ वर्णन करून देत असल्याने हा कवी शिवाजीचा केवळ स्तुतिपाठक नसून ऐतिहासिकाची निःपक्षपाती दृष्टी याचेकडे आहे असे म्हणावे लागते. काही प्रसंगातील सूक्ष्म तपशील देण्याच्या त्याच्या पद्धतीनेही या काव्यास इतिहास साधनात स्थान देणे आवश्यक झाले आहे.

बहुतेक सर्गांतील शेवटचे श्लोक पहाता त्यात पुढील सर्गातील विषयाचा प्रस्ताव सूचित केल्याचे दिसते. मात्र सतराव्या सर्गाचे शेवटी कूर्मसुताच्या सेनेचा शिवसैन्याने रात्री गनिमी काव्याने पराभव केला असे अर्ध्या श्लोकात सांगून एकाएकी सर्गसमाप्ती केली आहे. यावरून हे काव्य येथेच संपले असावे असाही तर्क करण्यास जागा आहे. त्यापुढील कथाभाग म्हणजे जयसिंहाची दक्षिण मोहीम व पुरंदरचा तह या गोष्टी शिवाजीस अपमानास्पद असल्याने कवीने पुढे काव्य रचनेचा बेत सोडून दिला असेल. कदाचित् या वेळीच कवी शिवाजीचा आश्रय सोडून बिकानेरकरांकडे (देवगिरीस) गेला असेल. कसेही असले तरी हेही शिवकाव्य कथादृष्टचा अपूर्णच आहे.

या काव्याचा कथासारांश सानुक्रम खालीलप्रमाणे आहे.

सर्ग २. शिववनऋतुलीला. श्लोक १२१.

शिवाजी शिववन पाहण्याच्या उद्देशाने नगरातून ससैन्य बाहेर पडून केवळ काही मित्रांसमवेतच उद्यानात प्रवेश करतो (—१४). त्यास वनपालबालक सामोरा जाऊन शिववनातील निसर्गसौंदर्य व अनेक ऋतूंतील व दिवसाच्या अनेक भागांत प्रत्ययास येणाऱ्या निसर्गाचे काव्यमय वर्णन सांगतो (—१००). त्याच्या काव्यसामर्थ्याविषयी शिवाजीचा प्रश्न. शहाजीराजाचे अन्नसेवन केलेल्या माझ्या वडिलांपासून ही कवित्व शक्ती आपल्याला प्राप्त झाली असे सांगून वनपालबालक वनातील आपल्या पर्णशाळेत जातो. शिवाजी शिबिरात झोपण्यासाठी जातो (—१०५). प्रातःकाळी गायकांनी केलेली स्तुती ऐकून शिवाजी जागा होतो (—१२०).

सर्ग ३. नग–नगर–ऋषीणां वर्णनम्, श्लोक ५९.

वनपालबालकाचे शिवाजीकडे आगमन, त्याची विनय-वाक्ये व पुढील वर्णनास आरंभ (—८). पश्चिमेकडील कौंडिण्य पर्वताचे वर्णन (—२०). नैर्ऋत्येकडील राजगड व शिवपत्तनाचे वर्णन (—३६). येवढ्यात मध्यान्ह झाल्यामुळे शिवाजी अतिथीपूजन करून जवळच रहात असलेल्या धरणीधर नावाच्या तपस्व्याचे दर्शन घेऊन नंतर भोजन करतो. सायंकाळी शिवपूजनाची तयारी करतो (—५८).

सर्ग ४. शिवगिरिजोत्सव. श्लोक ४३.

प्रदोष–कालात शंकराची पूजा करून रात्री शिवाजी उद्यानात परप्रांतातून आलेल्या ब्राह्मणांनी केलेली रासक्रीडा पहातो तिचे वर्णन (—३६). वनपालबालक शिवाजीस राजगडाच्या दक्षिणेस असलेल्या चंद्रपुरीचे वर्णन सांगतो. तिचे पश्चिमेस

समुद्रतीरावर रामाश्रम असल्याचे सांगतो. शिवाजीचा चंद्रनगर घेण्याचा निश्चय. रात्री वाड्यात निद्रा व सकाळी उत्थापन. (—४२)

सर्ग ५. चंद्रराजक्षितिपतिवधलीला. श्लोक ६५.

वनपालबालकाने महाबळेश्वराजवळील समृद्ध चन्द्रपुरीचे वर्णन केल्यावर शिवाजीने ते ठिकाण घेण्याचा निश्चय केला. दुसऱ्या दिवशी शिकारीसाठी निघण्याची वार्ता सैन्यात प्रसृत करून आपल्या पुरापासून दोन कोसांवर सैन्य एकत्रित करण्यासाठी त्याने मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी सकाळकळ ब्राह्मणाचे पूजन करून व त्याचा आशीर्वाद घेऊन शत्रूच्या विराटस्थानाजवळ (वाईजवळ) आला. आपल्या सैन्यास रडतोंडीचे (अश्रुमुखी) घाटावरून जाण्यास सांगून रात्री त्याने शंकराची पूजा केली व शिवालयात जमिनीवर झोपला. त्याला शंकराने दृष्टान्त देऊन चन्द्रपुराचा मार्ग स्वत: हातास धरून दाखविला (—२४). तो मार्ग लक्षात ठेवून शिवाजी ससैन्य निघाला. दूतांकडून शिवाजीचे ससैन्य आगमन समजल्यावर चन्द्ररावाचे सैन्य रडतोंडीचे घाटाकडे गेले. विषपर्वतावरून अडखळत उतरताना विस्कळित झालेले शिवाजीचे सैन्य पाहून चंद्रसैन्यास आनंद झाला व त्यांनी त्या खिंडीतील मार्गावर शिवाजीचे सैन्याचा धुव्वा उडविला. माचीवर (उपत्यकाभूमि) आल्यावर शिवाजीचे सैन्य सावध झाले. काही काल दोघांचेही जयपराजय झाल्यानंतर सूर्य डोक्यावर आला असता शिवसैन्याने चन्द्रसैन्याचा पराभव केला. तेव्हा आनंदित होऊन शिवाजीने सह्याद्रीच्या पायथ्याशी दहा योजने विस्तीर्ण असलेल्या चन्द्रवनात दहा सहस्र पायदळासहित प्रवेश केला. तेथे शिवाजीने गुप्तपणे (रह:) व घाईने (सपदि) तरुणीचे (जयश्री नावाच्या ?) पाणिग्रहण केले. शिवाजीने नगरात प्रवेश केल्यावर भयभीत होऊन चन्द्ररावाच्या लोकांनी जाळ्या व खोबणींचा (निकुंजविवर) आश्रय घेतला व शिवाजीच्या सैन्यास सर्व बाजूंनी वेढा घालून चोऱ्या व लूटमाऱ्यांनी आठ दिवस त्रस्त केले. शिवाजीनेही लवकरच रसद मिळवून (अवाप्तधान्य:) नगराबाहेरील अर्धा कोस झाडी तोडून टाकली व ठकास महाठक या न्यायाने कपट मार्गाचा अवलंब करून चन्द्ररावाचे सैन्य एके ठिकाणी थकून विश्रांती घेत असता अश्वत्थाम्याने पांडवपुत्रांना मारले त्याप्रमाणे त्यांना शस्त्रहीन अवस्थेत कापून काढले. नंतर तो सैन्यासह आपल्या नगराकडे जाण्यास निघाला. (—६५)

सर्ग ६. वितरणवर्णन. श्लोक ४६.

जयश्रीसहित शिवाजी स्वस्त्ययन करून मंगलवाद्यघोषात स्वत:चे नगराकडे प्रस्थान ठेवतो. त्याचे सैन्ययात्रेचे वर्णन (—१६), गजदानाची इच्छा, सकलकल ब्राह्मण चंद्रमाला नदीच्या किनारी यज्ञमंडप उभारतो (– २०), मंडपवर्णन (—३०), संक्रांति–प्रथम दिवशी पुण्याहवाचन. दुसरे दिवशी धनदान, यज्ञसमाप्तीचे वेळी राजाभिषेक व दान (—४५).

सर्ग ७. कौंकणदिग्जय. श्लोक ४३.

शिवाजी व मावळे (पार्वतीय) तेलवैल्याचा घाट (तैलघट्ट) उतरून त्यांनी चौल घेतले (चंपां विचकर्ष). तेथून कर घेऊन तो उत्तरेकडे निघाला. यवनांच्या त्रासाने पीडिलेले हिंदूंचे अनेक वीर समुदाय (व्यूहा:) वाटेत त्याला आश्रयार्थ येऊन मिळाले. नंतर शिवाजी सर्व बाजूंनी समुद्राचे पाण्याने वेढलेल्या यवनपत्तनास आला व तेथे तोडलेल्या सुवर्णाप्रमाणे कान्तिमान् असलेल्या पारसीक सेनेशी (तत्पारसीकपृतनाभि:) युद्ध करून त्याने त्यांची डोकी तोडली. तेव्हा काही लोक समुद्रातून नावातून पळाले व काहींनी जवळच्याच अतुलारण्यातील शिवाजीचे शत्रुसैन्य असलेल्या पर्वताचा आश्रय घेतला. त्या पारसीकस्थलीतील भुई खणून शिवाजीने अनेक रत्ने मिळवली. तेव्हा सार्वभौम राजाचा मित्र व गुरू याने त्या पारसीक समुदायास सकुटुंब बेड्या ठोकून स्वत:चे गडाकडे पाठविले (अप्रेषयन्निजगिरिं प्रति). तीस हजार सेनेसहित शिवाजी (पुढील संदर्भाप्रमाणे माहुली अथवा प्रबळ ?) गडाकडे जाण्यास निघाला. त्याच्या सैन्याने समुद्राच्या पुळणीत (सिंधुवेलाभुवि) कमलपत्राच्या चषकांतून मधुर मधुपान (मद्यपान ?) केले व नंतर माहुलीचे गडास (मलयाचलास) वेढा घातला. गडावरील लोकांनी शिवसैन्यावर तोफगोळे, मोठे दगड (गंडशैल) टाकले, मोठ्या कढईत तापवलेला गूळ ओतला व शिड्या लावून गडावर चढलेल्यांना मारले. तेव्हा शिवाजीने (जवळच्या) भाण्डारगडावर आपले सैन्य सामग्रीसहित चढविले. अशा रीतीने पांच दिवस युद्ध झाल्यावर मलयाचलावरील लोक घाबरून शिरस्त्राणे गळ्यात बांधून व दाती तृण घेऊन शिवाजीस शरण आले. तेव्हा शिवाजीने त्यांना अभय दिले व त्यांचे बरोबरच तो गडावर गेला. नंतर शिवाजीने तो गड सामग्रीसंपन्न केला. शिवाजी समुद्रास अभिवंदन करून सैन्यासह स्वत:चे नगरीकडे आला.

सर्ग ८. क्षितिपतिदौत्यविचार. श्लोक ५८.

मुलाच्या जातकर्माचे वेळी राजा स्वगृही परत येतो व मुलाचे भविष्य श्रवण करतो (--१५). देवगिरीच्या औत्तरीय राजाकडे दूतप्रेषण, त्याचे राजसभेचे वर्णन, (--२३).परस्पर कुशल प्रश्न, दूत शिवाजीची स्तुती करतो (--३७) व पुढे सांगतो--तुझ्या वडिलांनी तुमच्यासाठी आखून ठेवलेली सीमा आमचा राजा ओलांडत नाही. रागावलेल्या दिल्लीपतीची सीमा तो भ्याल्यामुळे ओलांडत नाही असा लोकापवाद दूर करण्यासाठी त्याने जुन्नर शहर लुटले. तो शिवाजी तुझ्या मैत्रीचा स्वीकार करीत आहे. तूही त्याचे मैत्रीचा स्वीकार केल्यास थोरल्या चुलत्याच्या मुलाप्रमाणे असलेल्या तुला स्वत:च्या थोरल्या भावाप्रमाणे पुढे करून तो स्वत: दूताप्रमाणे राहील (--४६). कर्णराजा शिवाजीस निरोप सांगावयास सांगतो की वडिलांच्या सिंहासनासाठी आम्हा भावांचे युद्ध चालू असता तू मला मदत करावीस (--५५). त्याचा निरोप घेऊन शिवदूत परत येतो.

सर्ग ९. पंडित–कवि–श्रवण. श्लोक ३३.

कूर्मसुताकडून (कर्णराजाकडून) निरोप घेऊन आलेल्या आपल्या दूताला शिवाजी पायउतारा होऊन सामोरा जातो. ते पत्र आदरपूर्वक मस्तकास लावून शिवाजी आनंदाने परत येतो (––५). कवींनी केलेली शिवाजीची स्तुती (––३०), कवींची संभावना, शिवाजीच्या विवाहासंबंधी बोलणी करण्यास आलेल्या चार राजांकडील लोकांना थांबवून घेऊन शिवाजीचे निद्रेसाठी गमन.

सर्ग १०. रत्न–वधू–पुरुष–परीक्षा. श्लोक ९१.

इतर राजांकडून लग्नासंबंधी बोलणी करण्यास आलेल्या ब्राह्मणांशी संभाषण (–४) (पुढे श्लोक ५––२३ गहाळ). रत्नपरीक्षा (––४८) वधूपरीक्षा अथवा स्त्रीलक्षण (––९०).

सर्ग ११. शिवविवाह–वर्णन. श्लोक ३१.

शिवाजीच्या विवाहाचे स्वस्त्ययनापासून सप्तपदीपर्यंत वर्णन. याप्रमाणे शिवाजीने तीन विवाह केले असे शेवटी कथन.

सर्ग १२. अब्जलाख्य–प्रतिनृपतिवध. श्लोक ८८.

अब्जल नावाचा यवन प्रकटपणे शिवाजीच्या मैत्रीचा बहाणा करून अनेक ठिकाणी देवमंदिरे व ब्राह्मणांना पीडा देऊन, तुळजा फोडून, पाण्डुरंगास नाहीसे करून व ते देऊळ पाडून, जेजुरीहून कर घेण्याची इच्छा करून वाईस आला. तसेच त्याने कोंडाणा व राजगडास वेढा घातला. शिवाजीपुढे तुळजा प्रकट होऊन या युद्धरूपी यज्ञात त्या (अफझलरूपी) पशूचा बळी दे असे सांगते. जावळीच्या (चंद्रपुर) अरण्यात अफजलाचे सैन्याचा प्रवेश होतो. अफजल रथात थांबून शिवाजीची प्रतीक्षा करतो. शिवाजीस येण्यास विलंब झाल्याने दूताकडून त्यास युद्धासाठी येण्याचा निरोप पाठवितो. शिवाजीने ब्राह्मण मुखातून प्रात:स्मरण श्रवण केले, त्या दिवशी शिवाचे विशेष ध्यान केले, स्नान करून पार्थिव लिंगपूजा व अपराधस्तवनाचे पठण केले, लक्ष ब्राह्मण भोजनासाठी तीर्थांकडे सुवर्णमुद्रा पाठविल्या, स्वत:चे गया श्राद्ध करण्यासाठी ब्राह्मणांस चार हजार (?) दिले; अनाथ–पंगू–अंध यांचेसाठी व शिवतुष्टयर्थ सुवर्ण दान दिले, आईवडिलांचे व गुरूंचे पादवंदन करून युद्धासाठी वेष धारण केला व कवच धारण करून बिचवा व पट्टा घेऊन मत्त हत्तीप्रमाणे धीराने चालू लागला. तेव्हा आजानुबाहू अशा त्याच्या शरीरात भवानीचा संचार होऊन 'भडकलेल्या जाळाचे टोकावरील पतंगाप्रमाणे हा नीच यवन माझे पुढे आहे' असे उद्‌गार त्याचे तोंडून निघाले. सुवर्णकवच धारण करणारा व स्मितमुखी तो शिशू-प्रमाणे उड्या मारीत निघाला. ते दोघेही पायथ्याशी संकेतस्थळी आले. परस्परांवर वाक्प्रहार झाल्यानंतर अफजलाने शिवाजीवर प्रथम तीक्ष्ण शस्त्राने प्रहार केला. तेथे दोघांचे युद्ध झाले. अफजलखानाचे शस्त्राने शिवाजीचे शिरस्त्राण किंचित् फुटले. तेव्हा

त्यास चुकवून शिवाजीने विचवा (वृश्चिकास्त्र) खुपसून त्यास पाडिले. यवन मेल्या-बरोबर त्याचे सर्व सैन्याचा नाश करून शिवाजी दिग्विजयार्थ बाहेर पडला.

सर्ग १३. जगदंबिकाया: शिवस्य वरदानम्. श्लोक ३७.

यवनव्याप्त वाई लुटून शिवाजी कोल्हापुरास जातो. तेथे जगदंबेची पूजा करतो (–३४). शिवाजीकृत जगदंबेचे मानसपूजन (५–३३). पूजनोत्तर शिवाजीची समाधी लागते. जगदंबा त्यास वैरीविनाशार्थ 'तीर्थाधिकपर्वतावर' एक वर्ष तप करण्याचा आदेश देते.

सर्ग १४. शिवाख्य–क्षितिप–तप. श्लोक ४७.

तीर्थराजपर्वतावर शिवाजी जातो. तेथील मुसलमान गडकऱ्यांना मारून किल्ल्या-वर साधनसामग्री भरतो. तेथे परोपकारी लोकांना राहण्यासाठी प्राकार बांधतो (––५).गडाचे वर्णन (––१७). आज्ञेशिवाय कोणालाहि किल्ल्यावर येण्यास शिवाजीची बंदी. शिवपंचाक्षरीचा जप करीत शिवाजीचे एक वर्षभर तप (––२०). पूर्व, पश्चिम व दक्षिणेकडील राजांचा गडास वेढा. त्यांनी केलेल्या शस्त्रांच्या माऱ्याने धान्य व गवतांनी पेट घेतला. ती आग डोंगरावरून पडणाऱ्या पाण्याच्या सहाय्याने विझविण्यात आली. कोणा एका विनोदी माणसाने हजारो बैल रात्री शिंगांना पोत बांधून गडावरून खाली पाठविले. शिवाजी पळाला असे समजून शत्रूंचा गडावर प्रवेश व त्याची शिव-सैन्याकडून कत्तल (––३६). उत्तरेकडील यवनांचा सर्पाकृती चक्रदुर्गास साडे चार महिने वेढा. अनेक ठिकाणांहून लाकडे आणून त्याच्या आडोश्याने शस्त्रांचा मारा, दुर्गाचे भिंतीपर्यंत विवर खणून त्यात दारू भरून तट उडवून देणे व त्यामुळे तटा-खालील सैन्याची बरीच हानी. किल्ल्यातील तीनशे लोक लढत बाहेर पडून राजगडावर येतात (––४४). उत्तरेकडील यवनराजाने किल्ला घेतल्याचे ऐकून शिवाजी एका दिवसात स्वतःचे नगरास परत येतो (––४५).

सर्ग १५. दूतकर्मव्याख्यान. श्लोक ५२.

उत्तरेकडील कूर्मराजाच्या मुलाकडे शिवाजी दूत पाठवितो (––४). कुशल प्रश्न, शिवदूत शिवाजीचे कुशल सांगून (––१२) पुढे आपले येण्याचे कारण सांगतो– " तू पाठविलेल्या अथवा यवनांनी पाठविलेल्या सैन्यामुळे शिवाजीचे सुखी जनपदास उपद्रव होत आहे. चक्रदुर्गाचे वेढ्याची हकीकत, दोन वर्षे तुझा यवन सेनापती तळ देऊन राहिला आहे पण युद्ध करीत नाही, प्रथम कोकणातून घाटावर आलेल्या तुझ्या अनाथ सेनेची उपेक्षा काय करतोस? यवनसेनापतीच्या आधिपत्याखालील तुझे सैन्य अकारण मारले जात आहे, तुझ्या बंधु–युद्धात शिवाजीने देवगिरीचे रक्षण केले आहे. माझे म्हणणे आता ऐकले नाहीस तर युद्धांतच तुला माझे बोल आठवतील" (––३९). राजाचे प्रत्युत्तर– "शिवाजीचे श्रेष्ठत्व मी जाणतो. त्या माझ्या मित्राला एकान्तात तू असे सांग की माझे वडील वारल्यावर बंधूंशी भांडण चालू असताना व येथे

मोऱ्यांशी सोइरीक हा या मोहिमेतील आधीच गूढ असलेला भाग या काव्यातील एका उल्लेखाने अधिकच गूढ बनला आहे. ती पंक्ती अशी— 'संपत्तितिः सपदि तत्र रहस्तरुण्याः पाणिग्रहं किल चकार जयश्रियश्च।' (५।५३). यातील 'संपत्तितिः व 'जयश्रियः च' ही पदे वगळता बाकी पंक्तीचा अर्थ स्पष्ट आहे. तो म्हणजे 'त्वरेने तेथे गुप्तपणे (अथवा एकान्तात) त्याने तरुणीचे पाणिग्रहण केले.' आता विवाद्य पदांचा विचार करू. 'संपत्तितिः' हा शब्द लेखनिकाच्या चुकीने संपत्तिभिः याचे ऐवजी लिहिला गेला असावा. तसे असल्यास हा शब्द शिवाजीस जावळी येथे सापडलेल्या द्रव्याचा सूचक असावा. कारण ही पंक्ती शिवाजीच्या चंद्रवन व नगर–(जावली) प्रवेशाचे दरम्यान आहे. शेवटचे '–च' हे पद पादपूरणार्थ नसेल म्हणजेच 'आणि' या अर्थी असेल तर जयश्री म्हणजे विजय असा अर्थ होईल. 'च' हे पद पादपूरणार्थ असेल तर जयश्री हे त्या तरुणीचे नाव ठरेल. पुढल्या म्हणजेच सहाव्या सर्गातील प्रथम श्लोकातहि जयश्री हा शब्द सूचकतेने वापरला आहे. (अथो जयश्रीसहितः शिवोऽसौ....). '–नंतर आनंदित झालेल्या ब्राह्मणांनी स्वस्त्ययन केलेला तो शिवाजी वाद्यघोषात जयश्रीसह ससैन्य निघाला.' यांतील ब्राह्मणांचे स्वस्त्ययन काय सुचविते ?

हे पाणिग्रहण म्हणजे विवाह झाला असे मानले तरी उपलब्ध ऐतिहासिक साधनांत त्यास दुजोरा मिळत नाही. याच मोरे प्रकरणात गोळेवाडीतील गोळे याची सुंदर सून एका ब्राह्मण अधिकाऱ्याचे हाती लागून ती त्याने शिवाजीकडे पाठविली होती परंतु शिवाजीने तिचा आदर करून परत पाठविली व त्या ब्राह्मणास नोकरीतून काढून हद्दपार केले असा उल्लेख शेडगावकर बखरीत आहे. आणखी एक संभव म्हणजे हणमंतराव मोऱ्याच्या ज्या सुंदर मुलीच्या सोइरीकीसाठी शिवाजीने बोलणी सुरू केली होती तिच्याशी हणमंतरावाचे मृत्यूनंतर त्याने विवाह करणे शक्य आहे. परन्तु या बाबतीत मराठी साम्राज्याची छोटी बखर स्पष्ट नकारात्मक सांगते— 'मोऱ्याच्या स्त्रिया व कन्या होत्या. त्यांची सोयरीक न करता सोडून सर्वत्रांस दिल्हे.' चिटणीशी बखरीप्रमाणे मोऱ्यांच्या स्त्रियांना पुरंधर येथे काही दिवस कैद करून ठेवले होते व नंतर सोडून देण्यात आले, 'पाणिग्रह' या शब्दातील श्लेषाने तसेच संपत्तिभिः तरुण्याः व जयश्रियः या तीन पदांच्या भिन्न प्रकारे विशेष्य विशेषण संबंधांनी वरील पंक्तीचे तीन चार प्रकारे भिन्न अर्थ होऊ शकतील त्याचा अधिक विचार सुज्ञांनी करावा.

या युद्धाचे कविकृत वर्णन वर दिले आहे. मोरे मोहिमेतील प्रत्यक्ष युद्धाचे वर्णन प्रस्तुत काव्याशिवाय अन्य कोणत्याहि साधनात उपलब्ध नाही. 'महाराज महाबळेश्वरी होते तेथे देवाचे दर्शन होऊन सूचना येताच निसणीचे घाटे जावलीस गेले. जावली दोन प्रहर पर्यन्त भांडली नंतर ठाणें घेतले..' असे चिटणीस म्हणतो. शिवदिग्विजयात सैन्य रडतोंडीचे घाटाने व शिवाजी महाबळेश्वराहून जावळीस गल्याचे

सांगितले आहे. या काव्यात सैन्यास रडतोंडीचे घाटाने जाण्यास सांगून स्वतः शिवाजी महाबळेश्वरावरून खिंडीने (संकटा) चंद्रवनात उतरतो असे म्हटले आहे. महाबळेश्वरावरून जावलीस जाण्याचा जवळचा मार्ग म्हणजे निसणीचा घाटच होय. म्हणजे या काव्यात सुचविलेली खिंड म्हणजे निसणीचा घाटच होय. 'संकटा' शब्दाचा अर्थ खिंड अथवा दुर्गम मार्ग असा आहे. शिवदिग्विजयांत पाच सात हजार मावळे व पाच चारशे स्वार रडतोंडीचे घाटाने ण्याचे सुचविले आहे. स्वतः शिवाजी बरोबरचे २–२॥ हजार सैन्य जमेस धरल्यास प्रस्तुत काव्यातील सैन्याचा दहा हजार हा आकडा जुळतो. 'पत्तीनामपि दशभिर्युतः सहस्रैः –' (४।३८).

'जावली दोन प्रहर पर्यंत भांडली' या चिटणिशी उल्लेखाशी 'साश्चर्यं प्रधनं बभूव भयदं मध्यं गते भास्करे' (५।३६) हा उल्लेख जुळणारा आहे. शिवाजीचे सैन्य विषपर्वतावरून खाली उतरले असा उल्लेख आहे. म्हणजे रडतोंडीचे घाटाअलीकडील सध्याची मालकमपेठ वसलेला डोंगर हाच विषपर्वत असावा. घाटाखालील दहा योजने विस्तीर्ण चंद्रवन म्हणजे जावली भोवतीचे जंगल हे इतर संदर्भावरून लक्षात येते. चंद्रनगर किंवा चांद्रीपुरी म्हणजे अर्थातच जावली होय. हे युद्ध जावळी घेतल्यानंतरहि आठ दिवस चालू होते असे प्रस्तुत कवी म्हणतो. श्री. दि. वि. काळे यांचे मते 'तेथे सहज महिना पंधरा दिवस झुंज चालली' (काळे : शिवाजी पृ. ५१). चंद्ररावाचे सैन्याची बेसावध स्थितीत कत्तल मात्र या काव्यामुळे नवीनच समजते आहे.

श्लोक ४।३९ व ५।३६ यांमध्ये चंद्ररावास पुलिंद म्हटले आहे. पुलिंद म्हणजे रानटी, जंगलात राहणारा असा अर्थ घ्यावा. 'राजन्य–पुलिंदयोः' (शिवाजी व चंद्ररावाचे....युद्ध) या शब्दावरून चंद्ररावाचे हीनकुलत्वहि सुचवावयाचे असेल (५।३६). किंवा रानटी लोकांवर राज्य करणारा म्हणूनहि त्यास 'पुलिंदपति' म्हटले असेल (४।३९). येथे पुलिंद हा विशिष्ट जातिविषयक उल्लेख असेल असे वाटत नाही.

वितरणवर्णन नावाच्या सहाव्या सर्गातील कथाभागात सुरुवातीस 'जयश्री' सह शिवाजी ससैन्य उद्यानसीमेपर्यंत (आरामसीमाम्) सायंकाळी येतो. पुढे त्याला हत्ती दान देण्याची इच्छा होते तेव्हा 'आज्ञा केलेल्या त्या सकळकळ ब्राह्मणाने यज्ञाची सर्व सामग्री पूर्ण केली व चंद्रमालेच्या पलीकडील तीरावर पुण्यदेशात अर्धाकोस जमीन मोठ्या नांगरांनी नांगरून शुद्ध करून तेथे त्याने पूर्वेकडे दार असलेला यज्ञमंडप तयार केला–' (प्राचीपूर्वम् यज्ञवाटं चकार ६।१८–२०). यज्ञाचे वेळी इन्द्रादि देवतांना या 'सकळकळ' ब्राह्मणाने आवाहन केलेले आहे (६।३६). या काव्याचा कर्ताहि सकळकळ उपनामकच आहे हे येथे लक्षात घ्यावे.

जिच्या काठावर शिवाजीने यज्ञ केला ती चंद्रमाला नदी कोणती ते समजत नाही. यज्ञ समाप्तीचे वेळी ब्राह्मणांनी राजास सुवर्णकुंभांनी गंगोदकांने 'राजाभिषेक'

केल्याचे व शिवाजीने 'सुवर्णाच्या उंच आसनावर' अभ्यंग केल्याचे सांगितले आहे (६।४०-४१). हा 'राजाभिषेक' यज्ञांगभूतच असावा. पुढे चांदीच्या मूर्तित्रयाचे दान केल्याचे सांगितले आहे (६।४४). हा विशिष्ट विधी म्हणजे अवभृथस्नान असावे. तसेच त्या तीन मूर्ती कोणाच्या होत्या तेहि सांगितलेले नाही. हा यज्ञ झाल्यावर राजा कोंकण दिग्विजयासाठी निघाल्याचे सांगितले आहे.

सातव्या सर्गात सांगितल्याप्रमाणे कोंकण दिग्विजयासाठी शिवाजी तैलघट्टाने कोंकणात उतरला व समुद्रकिनारी चंपानगरीस (चौलास) गेला. हा तैलघट्ट म्हणजे मावळातून सुधागडचे बाजूने कोकणात उतरण्यासाठी आजहि अस्तित्वात असलेला तेलबैल्याचा घाट होय. या कोंकण मोहिमेचा तपशीलहि या काव्यात विशेष सांगितला आहे.

शिवाजी महाराजांची ही उत्तर कोंकण मोहीम सामान्यतः कल्याण-भिवंडी मोहीम म्हणून ज्ञात आहे. बहुतेक इतिहासकारांनी या सर्व मोहिमेतील कल्याण-भिवंडी भागास महत्त्व दिले आहे तर या कवीने कल्याण-भिवंडीचा नाम निर्देश गाळून आरंभीचे चौल ग्रहण व शेवटचे माहुलीचे युद्ध यास महत्त्व दिले आहे. म्हणजे या मोहिमेतील ज्ञात भागास प्रस्तुत काव्यातील माहिती पूरक ठरत आहे. विशेषतः या मोहिमेत चौल नक्की केव्हा घेतले याचा उल्लेख अन्यत्र नाही. शिवाजी सुरुवातीस चौल घेऊन उत्तरेकडे गेला; मधील भागात पारसीकस्थलीजवळ यवनांशी युद्ध करून उत्तरभागात माहुलीचा किल्ला घेऊन परत आला; या उल्लेखांमुळे या मोहिमेचा सुसंगत कालक्रम लावणे शक्य झाले आहे.

चंपानगरीच्या म्हणजे चौलच्या वर्णनासाठी कवीने अकरा श्लोक लिहिले आहेत. त्यांत रामेश्वर, च्यवन, भार्गव (राम) व केशवनारायण यांचे मंदिरांचे उल्लेख आहेत. 'शिवप्रताप : पुरतोऽपि गत्वा तामात्तकंपां विचकर्ष चम्पाम्' (७।५) यातील विचकर्ष (ओढली) या पदावरून शिवाजीने चौल घेतले असे अनुमान काढावे लागते. या अनुमानास पुष्टी देणारे प्रमाण म्हणजे गोवे दप्तरातील शिवाजीसंबंधीचे जुन्यात जुने पत्र होय. त्यात 'शहाजीच्या मुलाने वरच्या चौलचा ताबा घेतला' असे सांगितले आहे. हे पत्र २८ नोव्हेंबर १६५७ ला लिहिले आहे. (पिसुर्लेकर : पोर्तुगीज मराठे संबंध, पृ. २१). कल्याण-भिवंडी घेतल्यावर शिवाजी चौलकडे वळला असे श्री. ब. मो. पुरंदरे समजतात (पुरंदरे : राजा शिवछत्रपती, पूर्वार्ध पृ. २४५).

चौलहून शिवाजी उत्तरेकडे निघाल्याचे सोळाव्या श्लोकात सांगितले आहे. येथून पुढे श्लोक १७ ते २९ मध्ये वर्णन केलेल्या भागाचा पूर्ण अर्थ मी लावू शकलो नाही. कल्याण-भिवंडीची मोहीम याच कालातील असल्याने तिचेच येथे वर्णन असावे असा तर्क आहे. तपशील मात्र पूर्णतया नवीन आहे. त्याचे विवरण केवळ प्रश्न-चिन्हांनीच करणे प्राप्त आहे.

चौलच्या उत्तरेस सर्व बाजूंनी समुद्राने वेष्टिलेले यवनपत्तन कोणते? कदाचित् हा उल्लेख जंजिऱ्यासंबधी असेल. तसे असल्यास कवीची 'दिशाभूल' झाली असे म्हणावे लागेल. तोडलेल्या सोन्याप्रमाणे कान्ती असलेल्या ज्या पारसीक सैन्याशी शिवाजीने युद्ध करून त्यांचा पराभव केला ते पारसीक कोण? त्यातील काही लोक अतुलारण्यातील किल्ल्यावर गेले. हे अतुलारण्य कोणते व किल्ला कोणता? त्याचे नाव येथे का दिले नाही? युद्धोत्तर शिवाजीने जमीन खणून जडजवाहीर मिळविले. या मोहिमेत कल्याण येथे दुर्गाडीचा किल्ला बांधताना शिवाजीस धन सापडले हे अन्य साधनांवरून समजते.

शिवाजीस भिवंडीला द्रव्य सापडल्याचा उल्लेख कॉस्मा दा गार्दाने केला आहे (वेंद्रे : शिवाजी, पूर्वार्ध पृ. १३६) तो या काव्यातील वर्णनाशी जुळतो. यवन-पत्तन म्हणजे भिवंडी तर नव्हे? पण याच जागेस 'पारसीकस्थली' असेही म्हणले आहे. मुंबईस जाताना ठाणे–खाडीजवळ डोंगराचे पूर्वेस पारसीक नावाचे एक ठिकाण आहे. त्याचे जवळच कोळवा येथे शिवकाली टांकसाळ होती असे म्हणतात. ती व ही पारसीक-स्थली एकच काय? या सर्गातील श्लोक ५ व २४ मधील 'शिव-प्रताप' म्हणजे प्रतापराव गुजर तर नव्हे? पुढेही सर्ग ८ श्लोक ४२ मध्ये 'शिवाति-भक्ति-प्रचुर-प्रतापः' असा सूचक निर्देश आहेच.

पंचवीसाव्या श्लोकात 'श्रीसार्वभौमनृपतेः सुहृदो गुरुश्च' असे शिवाजीस म्हणले आहे. हा 'सार्वभौमनृप' म्हणजे देवगिरीचा कर्णराजा असावा. शिवाजीने पारसीकांना स्त्रियांसह कैद करून स्वतःचे किल्ल्याकडे (निजगिरिं प्रति) पाठविले; हा किल्ला कोणता? श्लोक २६ मधील 'प्रबल' हे कशाचे विशेषण आहे? प्रबलं महीध्रं या शब्दांनी प्रबलगड तर सुचवला नसेल? तसे असेल तर पुढे तो गड घेतल्याचा उल्लेख का नाही? याच वेळी समुद्राच्या पुळणीमध्ये कमलपत्रांच्या चषकांतून मधुपान करण्यास सैन्यास (आणि तेहि शिवाजीच्या!) वेळ सापडला काय?

चौलच्या उत्तरेस निघाल्यापासून एवढ्या कालखंडातील या प्रश्नचिन्हांकित दुर्गम्य प्रदेशातून वाटचाल केल्यानंतर आपण मलयगिरीचे म्हणजे माहुलीचे पायथ्याशी शिवाजीसह निश्चितार्थासाठी येऊन पोचतो. श्लोक २४ मध्ये 'मलयाद्रि' असा उत्प्रेक्षार्थक ज्याचा उल्लेख आलेला आहे तोच हा श्लोक ३० पासून पुढे उल्लेखिलेला मलयाचल म्हणजे माहुली होय हे श्लोक ३५–३६ मधील भांडारदुर्गाच्या उल्लेखा-वरून सिद्ध होते.

माहुली गड ठाणे जिल्ह्यात शहापूरच्या नैर्ऋत्येस चार मैलांवर असून उत्तरेकडे पलासगड (पळसगड?) व दक्षिणेकडे भाण्डारदुर्ग असे याचे दोन उपदुर्ग (पुरंदराचे

वज्रगडाप्रमाणे) मैलभराच्या अंतराने आहेत. मुख्य माहुलीगडास रायगडाप्रमाणे सुमारे ६०० फूट उंचीचा नैसर्गिक तट सर्व बाजूंनी असल्यामुळे तो दुर्जेय आहे (ठाणे गॅझेटियर). वर पुरेशी सपाटी असल्याने उत्तर कोंकणाच्या रक्षणाचे दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा किल्ला होय; आणि म्हणूनच शहाजीने निजामशाहीच्या रक्षणासाठी तो शेवटपर्यंत लढविला होता. इ. स. १६३६ मध्ये एका तहान्वये तो निजामशाहीकडून आदिलशाहीकडे आला. शिवाजीच्या उत्तर-कोंकण मोहिमेतील हा गड घेणे या अत्यंत महत्त्वाच्या घटनेचा उल्लेख शिवापूर शकावली व्यतिरिक्त अन्यत्र फार कोठे नाही. या दृष्टीनेही या काव्याचे महत्त्व आहे.

युद्धाचा तपशील वर दिलाच आहे. जावळीच्या युद्धाप्रमाणेच याही युद्धाचा बराच तपशील कवीने दिला आहे. या दुर्गाचे महत्त्व जाणून शिवाजीने तेथे साधन-सामग्रीचा साठा करणे सुरू केले हे 'मलयाचलमृद्धिभिः समेतं खलु चक्रे नृपतिः शिवस्तदैव' (७।४०) या पंक्तीने सुचविले आहे. हे कार्य बरेच दिवस चालू असावे. यास दुजोरा देणारे एक पत्र 'शिवचरित्र साहित्य खंड १२' मध्ये प्रसिद्ध झाले आहे. यात मोगली अधिकारी चौकच्या देशमुखास लिहितो—'सिवा मकहूर माल व मवेसी लोकांची तादी करून नेतो. खजाना व जिनसा जो मुलखात मौदूद आहे तो माहोली गडावरी नेऊ पहातो' इ. शिवाजीस तसे करू देऊ नये असेही यात पुढे बजावले आहे (पत्र क्र. १०८, चौक देशमुख संग्रह). शिवापूर शकावलीप्रमाणे माहुली घेतल्याची तारीख ९ जानेवारी १६५८ येते. प्रस्तुत पत्राची तारीख ११ मार्च १६५९ आहे. 'ऋद्धिभिः समेतम्' याचा अर्थ वरील पत्राचे संदर्भात अधिक स्पष्ट होतो.

माहुलीगड घेऊन ५ दिवसांनी शिवाजी राजगडावर परत आल्याचे शिवापूर शकावली व यादी यांवरून सिद्ध होते. या काव्यांतहि माहुली गड घेऊन नंतर शिवाजी स्वतःचे ठिकाणी परत आला असे म्हटले आहे (स्वपुरीमाजगाम ७।४२). येथे सातवा सर्ग संपतो.

आठव्या सर्गाचे सुरुवातीस शिवाजी माहुलीहून आपल्या मुलाच्या जातकर्माचे वेळी परत आला आहे. मुलाचे नाव चिंतामणी असे असून तो एक वर्षाचा झाला असता ('वृत्तैकवर्षस्य' ८।७) शिवाजीने ज्योतिषाकडून त्याचे भविष्य श्रवण केले. हा चिंतामणी 'सती'चा म्हणजेच सईबाईचा पुत्र असल्याचे ६ व्या श्लोकात सांगितले आहे. याचे पांच ग्रह उच्चीचे असून (८।११) त्यास 'कृष्ण–नवावतार' म्हणले आहे (८।९).

सईबाईस १४ मे १६५७ ला पुत्र झाला तो म्हणजे संभाजी. शिवाजी कोंकण मोहिमेवरून परत आला १४ जानेवारी १६५८ या दिवशी! 'अथ जातकर्मसमये नृपतिर्गृहमाययौ निजसुतस्य निजम्' ही पंक्ती शब्दशः खरी धरली तर संभाजीचे जातकर्म ८ महिन्यांनी लांबले असे म्हणावे लागेल. तेव्हा संभाजीचा जन्म व शिवाजी कोंकण मोहिमेवरून परत येणे हे पौर्वापर्य या दृष्टीने बरोबर असले तरी जातकर्मामुळे

समजणारे कालाचे अंतर वस्तुस्थितीस धरून नाही. तसेच चिंतामणी हे संभाजीचे जन्मपत्रिकेतील नाव होते काय हेही शोधून पाहिले पाहिजे.

(या पुढील आठव्या सर्गाच्या आशयावरील चर्चा देवगिरीच्या राजाकडे दूत-*प्रेषणाच्या निमित्ताने लिहिलेल्या पंधराव्या सर्गावरील चर्चेत केली आहे ती पुढे पहावी.)*

सर्ग ९, १० व ११ मधील विषय इतिहासदृष्टचा फार महत्त्वाचा नाही. नवव्या सर्गाचे सुरुवातीस शिवाजीने देवगिरीच्या राजाकडून आलेल्या प्रतिसंदेशाचे स्वागत संदेश आणणाऱ्या दूतास सामोरा जाऊन केले आहे ते फार मननीय आहे (९।१–५). यातील 'उद्यानसीमा' (९।२) हा शब्द शिववनाचा निर्देशक असावा.

पुढे नवव्या सर्गाचे अन्तापर्यंत विद्वत्सभावर्णन असून त्यात पंडितांनी केलेली शिवाजीची प्रशस्ती (श्लोक १०–३०) म्हणजे उच्च दर्जाच्या कवित्वाचा नमुना आहे. दहाव्या सर्गात शिवाजी विवाहाची इच्छा प्रकट करतो तेव्हा अनेक राजे (म्हणजेच उच्च क्षत्रिय घराणी) त्यास नजराण्यासह सोयरिकीचे बोलणे करण्यासाठी येतात. या निमित्ताने रत्नपरोक्षा, स्त्रीसामुद्रिक व स्त्रीशरीरवर्णन (आलंकारिक) हे विषय आलेले आहेत. सर्गास शेवटी 'रत्नवधूपुरुषपरीक्षा' असे नाव दिले असले तरी प्रत्यक्षात पुरुषपरीक्षा हा विषय आलेला नाही. पुढील ११ व्या सर्गाचा विषय शिवविवाह असा आहे. त्यात सामान्यतः कोणत्याही श्रेष्ठ व्यक्तीच्या विवाहास शोभेल असे विवाहवर्णन करून शेवटी 'अशा रीतीने शिवाजीने तीन विवाह करून वैरी राजांची कीर्ती स्वप्रतापाग्नीने जाळून टाकली' (११।३०) असे सांगून हा अकरावा सर्ग संपवला आहे. विद्वत्सभा व विवाह यांत कोठेही स्थलाचा व कालाचा उल्लेख नाही. तसेच शिवाजो व्यतिरिक्त कोणाही महत्त्वाच्या व्यक्तोचा नामोल्लेख नाही. त्यामुळे या सर्गांना इतिहासदृष्टचा फार महत्त्व नाही. या काळात म्हणजे इ. स. १६५७ च्या पूर्वार्धात शिवाजीने गायकवाड, इंगळे व जाधव यांचेशी सोयरीक केल्याचे उल्लेख शिवचरित्राच्या अनेक साधनग्रंथांत आलेले आहेत. येथे कालक्रमदृष्टचा हा प्रसंग कवीने योग्य ठिकाणी घातला आहे.

बाराव्या सर्गामध्ये श्लोक २ ते १६ मध्ये अफझलखानाच्या अत्याचारांचे व त्याचे वाईपर्यंतचे आगमन सांगितले आहे. त्यात इतर ठिकाणच्या उल्लेखांप्रमाणेच तुळजा फोडली, पांडुरंगास नाहीसे केले व खंडोबाकडून कर वसूल केला असे उल्लेख आहेत. 'यः पुण्डरीकप्रियपाण्डुरंगं दिगंतविश्रान्तिगतिं विधाय । प्रासादमस्यापि निपात्य सद्यः शनैर्ययौ मल्लरिपोः स्थलीं ताम् ॥ ततश्च मल्हारिमहालसाभ्यां ग्रहीतुकामः करमप्य-नल्पम् । वाद्यत्सु ढक्कानिवहेषु तूर्यैः पुरीं विराटस्य ययौ विशालाम् ॥' (२।१२–१३) या श्लोकद्वयांतील 'पाण्डुरङ्गं दिगन्तविश्रान्तिगतिं विधाय' म्हणजे 'पाण्डुरंगास देशोधडीस लावून' या वाक्यांशातून खानाचे भीतीने विठ्ठलमूर्तीचे लपविणे सुचविले असावे. तसेच 'खंडोबाकडून भारी कर वसूल करण्याची इच्छा धरून वाईस आला'

असेहि म्हणले आहे. जदुनाथ सरकारांनी दिलेल्या माहितीवरून वरील गोष्टीवर प्रकाश पडतो. ते म्हणतात ' Encamped at Malvadi, Afzalkhan ... sent out strong detachments of his cavalry to rob and desecrate the famous Hindu temples of the country round. In this way Jejuri, Tuljapur and other holy cities were viloated and their people put under forced contribution. ' (Sarkar : Shivaji, 1961, p. 67).

श्लोक १५ मधील 'दाक्षिणात्यक्षितिपस्त्री' म्हणजे विजापूरची बडी साहेबीण. या वरून पुढील सर्गात तीर्थराजपर्वतावर चाल करून आलेले दक्षिणात्य क्षितीश म्हणजे विजापूरकर समजण्यास हरकत नाही.

अफजलभेटीपूर्वी शिवाजीस झालेला भवानीचा दृष्टांत सभासदी बखरीशी जुळणारा आहे. भेटीच्या दिवसाचा शिवाजीचा दिनक्रम व त्याने दिलेल्या दानांचाही उल्लेख या काव्यात तपशीलवार दिलेला आहे. शिवाजीने विचवा व पट्टा बरोबर घेतला असून भेटीनंतर प्रथम खानाने वार करून शिवाजीचे शिरस्त्राण किंचित् फोडल्यावर शिवाजीने वृश्चिकास्त्राने म्हणजे बिचव्याने खानाचा देह विशीर्ण केला इत्यादी तपशीलही उपलब्ध माहितीशी पडताळून पहाण्यासारखा आहे.

अफजलवधानंतर यवनव्याप्त वाई लुटून शिवाजी कोल्हापुरास गेला. परमानंदांनी उल्लेखिलेले 'श्रालयं नाम नगरं' म्हणजे कोल्हापुरच. येथे शिवाजीचे मुखी घातलेली देवीची मानसपूजा हा या काव्यातील एक उत्कृष्ट स्तोत्राचा नमुना आहे. शिवाजीची तेथे भावसमाधी लागणे हे इतर चरित्रकारांनी रेखाटलेल्या शिवाजीच्या स्वभावचित्रास साजेसेच आहे.

पुढे शिवाजी ज्या तीर्थराजपर्वतावर तप करतो तो गड कोणता हे समजत नाही. त्याचे भोवती वेढा व बैलांचे शिंगावरील पलित्यांची गोष्ट यामुळे चवदाव्या सर्गातील घटना ह्या अनेक दंतकथांचे धागे एकत्र करून शिवचरित्राला दिलेले ठिगळ आहे असे वाटते. त्यातील घटनांचा सूक्ष्म अभ्यास करणे आवाक्याबाहेरचे आहे. शिवाजीने तेथे बसण्यासाठी प्राकार बांधला (१४।५). असेच एक गोपुर शिवाजीने उत्तर कालात श्रीशैल्यपर्वतावर बांधल्याचे सर्वश्रुत आहे. चवदाव्या सर्गात अशा रीतीने अनेक घटनांची सरमिसळ झालेली दिसते ती अभ्यासकांनी शोधून पहावी.

चवदाव्या सर्गातील श्लोक ३७ ते ४४ मध्ये केलेले चाकणच्या वेढ्याचे वर्णन आलमगीरनाम्यात दिलेल्या हकीकतीशी बरेच जुळते. (ग. ह. खरे : शिवचरित्र वृत्त संग्रह, खंड ३, १९४१, पृ. २४–२५). मात्र स्फोटाने किल्ल्याचा भाग अंगावर पडून शत्रुसैन्याची हानी होणे व किल्ल्यातील तीनशे लोकांचे राजगडावर येणे या घटना येथे अधिक दिल्या आहेत.

गोस्थल दुर्ग म्हणजे भुइकोट किल्ला. चाकणला चक्रदुर्ग म्हणतात हे प्रसिद्ध आहे. या दुर्गाचे 'सर्पाकृती' हें विशेषण लक्षात घेण्यासारखे आहे.

क्षितिपतिदौत्यविचार व दूतकर्मव्याख्यान नावाच्या सर्ग ८ व १५ या दोन सर्गांमुळे या काव्यास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या दोन्ही सर्गांत शिवाजीने देवगिरीच्या कर्ण राजाकडे दोनदा पाठविलेल्या दूताची हकीकत आली असून रजपूत–मराठे संबंधावर यामुळे काही नवीन प्रकाश पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषत: शिवाजीशी कर्ण राजाचे अन्तस्थ संबंध यात प्रकट केले आहेत म्हणून या दोन सर्गांचा येथे विशेष विचार करणे उचित आहे

आठव्या सर्गातील पंधराव्या श्लोकापर्यंत आपल्या पुत्राचे भविष्यश्रवण संपल्यावर शिवाजी देवगिरीच्या उत्तरीय राजाकडे (त्याचेच प्रार्थनेवरून ?) दूत पाठवितो. या राजास सर्ग ८, ९ व १५ मध्ये अनेक ठिकाणी कूर्मसूनु (८।४८), कूर्मसुत (९।१), कूर्मभूपपुत्र (९।५), सार्वभौमतनय (१५।१), कूर्मराजतनय (१५।४), सार्वभौम (१५।२७) इ. विशेषणांनी संबोधिले असून त्यावरून सकृद्दर्शनी कछवाह (कछुवा) वंशातील कोणाचा तरी हा उल्लेख असावा असे वाटले तरी सर्ग ८ मधील श्लोक ४२ मध्ये त्यास कर्णनृप असे म्हणले आहे (सौहार्दशाली नृपकर्णमैत्री शिवोऽयमङ्गीकुरुते स्म नूनम्।). यावरून हा कर्ण–नृप म्हणजे शहाजहान व औरंगजेबाचे कारकीर्दीत इ. स. १६३१ ते १६६९ चे दरम्यान बहुतेक काल बादशहाच्या इतर रजपूत सरदारांबरोबर मराठे व आदिलशाही यांचे विरुद्ध सतत लढायांत गुंतलेला प्रमुख सरदार व देवगिरीचा सुभेदार कर्ण राजाच होय असे वाटते. मात्र यास कूर्मतनय का म्हणले आहे ते समजत नाही. कारण हा कर्ण राजा कछुवा वंशातील नव्हता (याचे संबंधी विशेष माहिती खालील पुस्तकात आढळते ती जिज्ञासूंनी अवश्य पहावी—(१) Todd कृत Annals and Antiquities of Rajasthan, (२) श्यामलदास कृत वीरविनोद, (३) व्रजरत्न दास कृत 'मआसिर–उल्–उमरा'चे हिंदी भाषान्तर व (४) गौरीशंकर ओझा कृत बिकानेर राज्य का इतिहास). प्रख्यात रजपूत राजा अनूपसिंह याचा हा बाप असून यानेच औरंगाबादेत कर्णपुरा वसविला व करणी देवीचे मंदिर बांधले. याची थोडक्यात माहिती अशी :—

बिकानेरच्या भुरटिया वंशातील राव सूरसिंह याला कर्णसिंह व शत्रुसाल असे दोन मुलगे होते. राव सूरसिंहास चार हजारी जात व तीन हजारी मन्सब देऊन शहाजहानने इ. स. १६३० मध्ये दक्षिणेकडे बादशाही फौजेबरोबर पाठविले होते. तो इ. १६३१ मध्ये मरण पावल्यानंतर कर्णाने बापाची गादी मिळविण्याचे वेळी आपला मामा ठाकूर तेजमाल कृष्णावत व त्याचा मुलगा खंगार यांच्या बंडाचा बीमोड करून त्यांना ठार मारिले व दिल्लीस जाऊन बापाची मन्सब मिळविली. त्यास लगेच बादशाही फौजेबरोबर दक्षिणेकडे दौलताबादेस पाठविण्यात आले. जव्हारचे राज्य कर्णसिंहाच्या बहादुरीने हस्तगत झाले. इ. स. १६३६ मध्ये शहाजी व विजापूरकर यांच्या विरुद्ध

पाठविलेल्या दहा हजार सेनेमध्ये कर्णसिंहाचा समावेश असून विजापूरकरांविरुद्ध झालेल्या सर्व लढायांत बादशाही सेनेचा सेनापती सय्यद खानेजहाँबरोबर कर्णसिंहाचा मोठा वाटा होता.

दरम्यान त्याच्या मुलखात बिकानेर संस्थानवर नागोरचा राव अमरसिंह (हा जसवंतसिंहाचा ज्येष्ठ बंधू असून त्यास बापाची गादी मिळाली नव्हती) याने हल्ला केला. तेव्हा हा त्वरित बिकानेरला गेला व त्याने आपल्या जहागिरीचा बंदोबस्त केला. (बहुधा याच युद्धाचा ' बंधुयुद्ध 'असा उल्लेख सर्ग ८ श्लोक ५२–५८ व सर्ग १५ श्लोक ३७ मध्ये आला असावा). याच वेळी पुंगलचा भाटी राव सुंदरसेन यानेही बिकानेरवर हल्ला केला. त्याचा कर्णाने पराभव करून पुंगल संस्थानातील गावे भाटी लोकांना वाटून टाकली.

शहाजहान आजारी पडल्यावर (सप्टें. १६५७) औरंगजेब आग्र्यास गेला (मार्च-एप्रिल १६५८). तेव्हा काही रजपूत सरदार त्याचे बरोबर व काही स्वतंत्ररीत्या आग्र्यास गेले. कर्णसिंहाने आपले दोन मुलगे औरंगजेबाबरोबर पाठवून स्वतः विनापरवानगी बिकानेरला गेला व याबद्दल औरंगजेबाची त्याचेवर (काही काळ) गैरमर्जी झाली. ' बिकानेरकी तवारीख ' मध्ये लिहिले आहे की ' आलमगिराने जेव्हा सर्व हिंदू राजांना मुसलमान करण्याचे मनात आणले तेव्हा त्यांनी एक होऊन कर्णसिंहास पुढारी बनवून त्याचे मुखाने नकार कळविला.' पुढे औरंगजेबाने याचा मुलगा अनूपसिंह यास बिकानेरच्या गादीवर बसवून कर्णसिंहास दौलताबादेस पाठविले. इ. स १६६९ मध्ये याचा अदोणी येथे मृत्यू झाला.

पुढे याचा मुलगा अनूपसिंह याचीही दक्षिण मोहिमेवर इ. स. १६७० मध्ये रवानगी झाली. अशा रीतीने या वंशाच्या तीन पिढ्या (इ. स. १६३० ते १७०७) दक्षिणेत खपल्या. याचेकडे देवगिरीसारख्या अत्यंत महत्त्वाच्या किल्ल्याचे अधिकार होते. यावरून त्याचे श्रेष्ठत्व समजते. इतकी वर्षे दक्षिणेत असलेल्या या रजपूत राजाचे व शिवाजीचे संबंध या काव्याचे निमित्ताने प्रथमच प्रकाशात येत आहेत.

शिवदूताची व कर्णाची पहिली भेट कोकणदिग्जयानंतर व अफजलवधापूर्वी म्हणजे इ. स. १६५८ मध्ये झाली असावी. याच वेळी (ऑगस्ट १६५८) सोनोपंत डबीर औरंगजेबाचे भेटीस शिवाजीचा निरोप घेऊन गेले होते ते वाटेत देवगिरीस थांबल्याचा तर हा निर्देश नसेलना ? पहिल्या भेटीत (आठवा सर्ग) या दूताचे कर्णाकडून विशेष आनंदाने स्वागत झाले नाही. श्लोक १८ ते २३ मध्ये कर्णराजाची प्रशस्ती झाल्यावर ' असा तो राजा ' शिवाजीचे मैत्रीची इच्छा करून दूतास बसण्यास सांगून शिवाजीचे कुशल विचारतो. श्लोक २६ ते ४७ शिवदूताचे संभाषण आहे. पुढे श्लोक ४९ ते ५४ मध्ये कर्णाचे त्यास प्रत्युत्तर आहे.

शिवदूत आपल्या संभाषणात ' कूर्म ' (कर्णाचा पिता) शिवाजीस चुलत्याप्रमाणे (पितृव्यमान्य) असल्याचे सांगतो. कर्णास शिवाजी ज्येष्ठ बंधूप्रमाणे मानत आहे इ.

प्रस्तावना व पुढे २८ ते ३७ पर्यंत शिवगौरवपर भाषण झाल्यावर शिवाजी हा कर्णाचे वडिलांनी सीमा घालून दिलेल्या त्याचे राज्यावर आक्रमण करीत नाही असे सुचवितो. पुढे ४० व्या श्लोकात शिवाजीने जुन्नर लुटल्याचा उल्लेख केला आहे. कल्याण-भिवंडी घेतल्यावर लगेच शिवाजीने जुन्नर लुटले होते असे कॉस्मा द गार्द ह्याचे वर्णनावरून वाटते. जुन्नर लुटीचा हा उल्लेख येथे कालदृष्ट्या बरोबर जुळतो. थोडी भीती दाखवून, थोडा विनय करून दूत मैत्रीचा प्रस्ताव पुढे मांडतो. त्यातील 'यासां भवन्निखिल....' (४६) या श्लोकाने कोणते राजकारण सुचविले असावे या संबंधी अनेक अंदाज बांधता येतील.

कर्णराजाच्या प्रत्युत्तरात त्याने आपल्या गृहकलहात (स्वतःस उत्तरेकडे जावे लागत असल्यामुळे देवगिरीचे रक्षण करून ?) शिवाजीने आपल्यास मदत करावी असे सुचविलेले दिसते. यातील 'आस्ते सखे सकलदेवगिरिस्त्वदीयो....' (८।५३) हे शब्द सूचक आहेत. हे कार्य शिवाजीने अंगीकारून पार पाडले असावे असे 'भीमे यदत्रभवतामपि बंधुयुद्धे....' (१५।३७) या श्लोकावरून दिसते. यात शिवाजीने हे कार्य केल्याची शिवदूत कर्णास आठवण करून देत आहे.

आठव्या सर्गातील 'व्यासङ्गमस्मदरिसौख्यकरं विहाय....' (८।५५) यात कर्णाच्या 'शत्रूस हितकारक' अशा शिवाजीच्या कोणत्या कार्याचा निर्देश आहे हे शोधून पाहिल्यास या काळातील शिवाजीच्या हालचालींवर अधिक प्रकाश पडेल. या प्रसंगी देवगिरीचे रक्षण शिवाजीने केले असे मानल्यास तो अथवा त्याचे सैन्य इ. स. १६५८ ते १६६० च्या दरम्यान ओरंगाबादेजवळ गेले होते काय हे पहावे लागेल. आग्र्यास जाताना (इ. स. १६६६) शिवाजी औरंगाबादेवरून गेला होता, पण या प्रसंगाचा त्याचेशी संबंध नसावा. या पूर्वी शाहिस्तेखानास दक्षिणेकडे पाठविण्याची कारणे देताना चिटणीस लिहितो '....औरंगाबादेचा पुरा लुटला. रायबागीण व मोहबतखान....बुडविले....' इ. (कलम ९७७). म्हणजे शाहिस्तेखान दक्षिणेत येण्यापूर्वी शिवाजीची धडक औरंगाबादेपर्यंत गेली होती. तेथे तो केवळ लुटीनिमित्त गेला की अन्य काही कारण होते हे शोधले पाहिजे. श्री. S. G. Dawane यांनी आपल्या Ellora and Environs या पुस्तिकेत शाहिस्तेखान दक्षिणेत असताना शिवाजी औरंगाबादेजवळ आल्याचा उल्लेख केला आहे तो असा. "As Shahistakhan proved unequal to the task, Prince Muazzam was sent. In spite of all these efforts Shivaji appeared in the vicinity of Aurangabad itself" (१९७०, पृ. १७). यात मूळ माहिती कोठून मिळाली ते लिहिलेले नाही. शिवाजी तेथे येण्याचे कारण व तेथे त्याने प्रत्यक्ष काय केले तेही लिहिलेले नाही. शिवाजीच्या औरंगाबादभेटीच्या वरील दोन्ही उल्लेखांचा त्याच्या देवगिरीरक्षणाचे कार्याशी काही संबंध आहे काय हे आणखी सबळ प्रमाण मिळाल्याशिवाय निश्चित सांगता येणार नाही.

दुसऱ्या खेपेस दूत पाठविला आहे तो शाहिस्तेखानाचा पुण्यात मुक्काम असताना. हा दूत एक हजार सैन्यासह पालखीत (शिबिकासनस्थः) बसून निघाला आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. आपल्या येण्याचे प्रयोजन दूत स्वतः सांगत आहे. ' तुझ्या सैन्यातील यवनांकडून शिवाजीच्या मुलखास उपद्रव होत आहे असे दूत सांगतो (१५।१३), पुढे चाकणचे वेढ्याची हकीकत सांगतो. पुढे श्लोक २१ ते ३२ चा आशय असा ' आपला चाकणचा किल्ला पडल्याचे ऐकून शिवाजी दक्षिणेकडील किल्ल्यावरून राजगडास आला. तुझ्या प्रबळ सैन्याने (ब्राह्मणांस ?) उपद्रव दिल्याचे ऐकून व यवनाने (शाहिस्तेखान) सर्व देश बळकावला हे पाहून शिवाजी काही काळ स्वस्थ बसला. तुझ्या पूर्वीचे क्षत्रिय योद्धे शिवाजी घाबरला असे म्हणू लागले तेव्हा निंदा सहन न होऊन त्याने स्वतःचे सैन्यास युद्धाचा आदेश दिला तेव्हापासून तुझी सेना (शिवसैन्याचे भीतीने) विस्कळीत होऊन समुद्रकिनारी रेंगाळत आहे. तुझा सेनापती साठ हजार सैन्य अहोरात्र सज्ज ठेवून शिवाजीचे भीतीने पुण्यात जागरूक राहिला आहे. यवन सेनापती (शाहिस्तेखान) चाकण जिंकल्यानंतर शिवाजीचे भीतीने दोन वर्षं (तसाच) आहे. जहाजांवरील धन लुटून शिवाजीने समुद्रात हजारो यवन मारले हे त्याचे आश्चर्यकारक कृत्य तुझ्या योद्ध्यांकडूनही ऐक. तू युद्ध करत नाहीस असेही नाही व युद्ध करणेही टाळत आहेस हे दोन्ही सहन न होऊन शिवाजीने मला तुझ्याकडे पाठविले आहे. प्रभयकोकणातून घाटावर आलेल्या व नेता नसल्यामुळे विस्कळीत झालेल्या तुझ्या सेनेची उपेक्षा काय करतोस ?' (१५।२१–३२)

यात विस्कळीत होऊन समुद्र किनारी रेंगाळणाऱ्या सेनेचा उल्लेख हा उंबरखिंडीतील युद्धानंतरच्या कोकणात राहिलेल्या मोगली सैन्याचा निर्देशक आहे असे मानावयास हरकत नाही. ही सेना ' प्रभयकोकणातून ' घाटावर आल्याचा उल्लेख कवीने केला आहे. प्रभयकोकण म्हणजे कोकणाचा कोणता भाग हे समजले म्हणजे हा घाटही समजेल. शाहिस्ताखान दोन वर्षे ठाण मांडून आहे हा उल्लेखही इतिहास-संगत आहे. तसेच हा दूत या देवगिरीच्या राजास कधी भेटला हेही या अप्रत्यक्ष कालनिर्देशामुळे समजू शकते. शिवाजीने जहाजे लुटल्याचा उल्लेख नेमका कोणत्या वेळेचा आहे हे मात्र शोधले पाहिजे.

पुढील श्लोक ३३ ते ३८ विशेष चिंतनीय आहेत. यात ' तातेन तेऽतिकृपया..' या पंक्तीतून एक विशेष गोष्ट सुचविली आहे. ' तुझ्या वडिलांनी कृपाळूपणे पाहिलेल्या शिवाजीचा तू द्वेष करू नकोस ' (१५।३३) असे दूत कर्णास म्हणतो, याचा संदर्भ कसा लावायचा ? कर्णाचा पिता राव शूरसिंह भुरटिया हा ४ मार्च १६३० रोजी बादशाही सेनेबरोबर दक्षिणेकडे निघाला. तो ऑक्टोबर १६३१ चे दरम्यान कधीतरी वारला. या वेळी शिवाजी **शिशु** अवस्थेत होता. शिवजन्मकालामध्ये शहाजी धामधुमीतच होता. त्यावेळी मोगली सैन्याबरोबर आलेल्या या शूरसिहाने बाल शिवाजीच्या संरक्षणासाठी काही मदत केल्याचे वरील उद्गार सूचक तर नव्हेत ? अन्यथा ' अतिकृपया परिवीक्षतस्य ' या शब्दांचा काय अर्थ होऊ शकेल ?

पुढे यवनसेनापतीच्या आधिपत्याखाली लढणारे तुझे सूर्यवंशीय क्षत्रिय (राजपूत) निष्कारण मरत आहेत असे सांगून शिवाजीने केलेल्या देवगिरीच्या रक्षणाचे स्मरण देऊन माझे म्हणणे लक्षात घेतले नाहीस तर युद्धातच गाठ पडेल असे दूत सांगतो. तेव्हा त्या दूतास शांत करून कर्ण प्रतिसंदेश देतो. हा संदेश शिवाजीचे कर्णराजाशी संबंध अधिक स्पष्ट करणारा आहे. त्यातील महत्त्वाचा भाग असा.

'माझा मित्र जो शिवाजी त्यास एकान्तात तू असे सांग की दैवयोगाने आमचे वडील वारल्यानंतर बंधुवर्गाशी युद्ध चालू असता व या देशात दुष्काळ पडला असता माझ्या मामाने कपटाने देवगिरीच्या रक्षणाचे दुर्घट कार्य माझ्यावर सोपवून व तुझ्याशी निष्कारण कायमचे वैर निर्माण करून स्वार्थाने येथून काढता पाय घेतला. तो तुझ्याशी युद्ध करण्यास आला असेल तर त्यास लवकर स्वतःचा पराक्रम दाखव. आणि हा माझा निरोप गुप्त ठेव कारण माझ्या मित्रांना हे समजले तर ते कष्टी होतील.' (१५।४४–४७) असा निरोप शिवाजीसाठी देऊन दूतास सूचनाही महत्त्वाची दिली आहे. 'दूता तू येथून रागावल्याचा बहाणा करून नीघ. स्नेहसूचक असे हे रत्न शिवाजीस भेट देऊन रणांगणात यवनाचा खुशाल वध कर असे त्यास सांग' (१५।४८). या संदेशातील ऐतिहासिक सत्य तपासून पाहण्यास आपल्याला पुरेशी साधने उपलब्ध नाहीत. शाहिस्तेखानाबरोबर असलेला जसवंतसिंह हा या देवगिरीकराचा मामा होता काय ? तसे निष्पन्न झाल्यास वरील संदेशात काही तथ्य असण्याचा संभव आहे. तसे नसल्यास हा मामा कोण तेही शोधावे लागेल. याच सर्गात शिवाजीकडे ५६ दुर्ग व १ लक्ष सैन्य असल्याचे सांगितले आहे.

सोळाव्या सर्गाचे आरंभी दूतमुखातून संदेश श्रवण केल्यावर शिवाजीस पौराणिकाकडून राजनीती ऐकण्याची इच्छा होते. त्याप्रमाणे सर्ग १६ व १७ मध्ये केवळ राजनीती सांगितली असून सतराव्या सर्गाचे शेवटी एकाच पंक्तीत 'रात्री कूर्मसुताच्या सेनेचा शिवाजीच्या सैन्याने कूटयुद्धाने पराभव केला' असे सांगितले आहे. येथेच उपलब्ध काव्य समाप्त होते.

हे शिवकाव्य म्हणजे जसा इतिहास आहे तसेच काव्यही आहे आणि शास्त्रही आहे. यातील केवळ काव्य आणि शास्त्र वगळून फक्त ऐतिहासिक दृष्टचा महत्त्वाच्या भागाचा परिचय मात्र वर करून दिला आहे. याचा सर्वांगपरिपूर्ण अभ्यास होणे जरूर आहे व तो मी अनेक बंधनामुळे करू शकलो नाही याची मला जाणीव आहे.

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या अमोलिक हस्तलिखित संग्रहातील पोथ्या चाळत असता हा ग्रंथ सुमारे दोन वर्षांपूर्वी मी पाहिला होता. सकृद्दर्शनी हे इतिहास-दृष्ट्या निकृष्ट व विपर्यस्त काव्य असावे असे समजून व इतरही व्यवधानांमुळे

याकडे दुर्लक्ष झाले होते. मंडळाच्या शके १८९४ या वर्षीच्या संमेलनासाठी एखादा निबंध तयार करून वाचण्यासाठी प्रा. ग. ह. खरे यांनी जेव्हा मला सुचविले तेव्हा या ग्रंथाचे स्मरण होऊन त्याचे पुनश्च अवलोकन केले व केवळ ग्रंथपरिचयात्मक असा निबंध संमलनांत वाचला. त्यावेळेस उपस्थित असलेल्या विद्वानांची उत्सुकता वाढून याचा अधिक अभ्यास करण्याची सूचना त्यांनी केली. मंडळाचे कार्याध्यक्ष म. म. द. वा. पोतदार यांनी या काव्यातील फक्त इतिहासदृष्टया महत्त्वाचा भाग शक्य तितक्या लवकर प्रसिद्ध व्हावा असें सांगितले. अशा रीतीने शिवचरित्राचे हे आणखी एक साधन लोकांपुढे मूळस्वरूपात ठेवावे या हेतूने ते येथे दिले आहे. त्याबरोबरच मंडळात वाचलेला ग्रंथपरिचयात्मक निबंध आणखी थोडा अभ्यास करून किंचित् विस्तृत करून येथे वर दिला आहे. याचा अधिक अभ्यास करून त्यापासून काय निष्कर्ष काढायचे ते सुज्ञ वाचक करतीलच. या पुढे या ग्रंथाच्या अन्य प्रतींचा शोध घेतला जाऊन हे काव्य संपूर्ण प्रसिद्धीस यावे अशी अपेक्षा आहे. मूळ ग्रंथांतील काही सर्ग त्यातील विषय–वैशिष्ट्यामुळे पूर्ण छापले आहेत व इतर सर्गांतील महत्त्वाचा भागच केवळ उद्धृत केला आहे. त्यात संदर्भासाठी गाळलेल्या भागाच्या विषयाचा फक्त उल्लेख केला आहे.

मूळ ग्रंथाची अन्य प्रत शोधूनही उपलब्ध न झाल्यामुळे पाठावृत्ती तयार करताना केवळ एकाच प्रतीवर अवलंबून रहावे लागले. प्रतलेखकाच्या अनवधानाने व अज्ञानाने मूळ हस्तलिखितात अनेक त्रुटी राहून विपर्यस्त पाठ लिहिले गेले आहेत. मूळ रचनेस बाध न आणता त्यात जेवढी सुधारणा करता येणे शक्य झाले तेवढी केली आहे. कंसातील दुरुस्त्या काही ठिकाणी मागील अक्षरास प्रतिअक्षर म्हणून तर काही ठिकाणी गाळलेल्या अक्षरांचे ऐवजी दिलेल्या आहेत. त्यातील फरक वृत्तांतील मात्रांच्या संख्येवरून समजून घ्यावा. काही ठिकाणी दुरुस्ती न सुचल्याने तो पाठ तसाच सदोष दिला आहे. मूळ पोथीत काही श्लोकांचे अंक गाळले आहेत तर काहींत पुनरावृत्त झाले आहेत. ते मूळ पोथीच्या संदर्भसौकर्यास्तव तसेच दिले आहेत.

पाठशुद्धीचे अवघड काम डॉ. वि. वा. परांजपे यांनी कृपाळूपणे केलेल्या सूचनांमुळे व मदतीमुळे सुकर झाले. त्यांचा मी ऋणी आहे. प्रा. ग. ह. खरे यांनी हा ग्रंथ उपलब्ध करून दिला, वेळोवेळी मार्गदर्शन करून माझ्याकडून हे काम करवून घेतले व या निमित्ताने शिवचरित्राचे चिंतन करण्याची मला संधी दिली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. माझे इतिहासाचे व संस्कृत भाषेचे अल्पज्ञान आणि अभ्यासास मिळालेला थोडा अवधी यामुळे यात ज्या त्रुटी राहिल्या असतील त्याबद्दल विद्वानांची मी क्षमा मागतो. ३०० व्या राज्याभिषेकशकात हे काव्य प्रसिद्ध होण्याचा हा योगायोग औचित्यपूर्ण आहे.

मूळ काव्यातील निवडक उतारे

सर्ग २

अथ कदाचिदसौ नृपतिः शिवः शिववनेक्षणलालसमानसः।
जिगमिषुर्निजभूषितवाजिनं द्रुतगतिं (च) समानयदुद्धतम् ॥ १ ॥
प्रणम्य राजानमनिंद्यविग्रहं माद्यद्द्विषत्सैन्यवधे कृताग्रहम् ।
द्वाःस्थस्तदैव स्तुतिपूर्वमित्थं न्यवेदयद्वाजिवरं समाहृतम् ॥ २ ॥

सर्ग ३

धरणीधर एव शेषनागः किल साक्षात्तपतीह तपांसि ।
अतिमानय तं च पश्चिमस्यां दिशि गत्वा नृप तस्य पर्णशालाम् ॥ ४६ ॥
अयाचिताः केचन साग्निका ये कृताह्निका वेदविदो दरिद्राः।
क्षुत्पीडितस्फारकुमारदासास्तानन्नदानैरपि तोषयाशु ॥ ४७ ॥
उक्त्वेति वाक्यं वनपालबालो नृपाज्ञया धूर्जटिपूजनाय ।
ययौ समृद्धां निजपर्णशालां दुग्धाकुलौधःशुभगोसहस्राम् ॥ ४८ ॥
संतोषयित्वा तिथिवृन्दमाशु यथोचितैः पात्रधनान्नवस्त्रैः ।
वनीं ययौ तां धरणीधरस्य मुनेरथायं नृपतिः पदातिः ॥ ४९ ॥
धौतवस्त्रभरभुग्नपल्लवक्ष्मारुहां मृगकुलैरलंकृताम् ।
तन्मुनिप्रसभपूजिताध्वगैः पच्यमानमृदुशालितण्डुलाम् ॥ ५० ॥
संततप्रणवजापकद्विजाधिष्ठितातिविमलोच्चवेदिकाम् ।
व्याघ्रचर्मकलितामितस्ततो वृक्षमूलधृतकुम्भकशीलाम् ॥ ५१ ॥
श्रीशिवेन विनयेन पालितां पुष्पपल्लवफलैरलंकृताम् ।
वैदिकद्विजगणैरधिष्ठितां सन्मुनीशधरिणीधरेण च ॥ ५२ ॥
गत्वा प्रणम्य नृपतिः शुचिपर्णशालामध्यस्थितं मुनिवरं सततं प्रसन्नम्। (त्रुटित)
तस्यां शिवोऽयमतिभक्तियुतः सहस्रैःस्तं तोषयां प्रसभमास सुवर्णनिष्कैः ॥५४॥

सर्ग ४

संभाव्य गंधैरतिचित्रवस्त्रैर्नानामणिद्योतितकुंडलाद्यैः
विभूषणैस्तत्र बहून्समेतान्राजा शिवोऽयं विससर्ज लोकान् ॥ ३६ ॥
पुनः शिवोऽयं वनपालबालं समीपमानीय रहस्युवाच।
वक्तव्यमस्त्यत्र तवैव यद्यत्तद्ब्रूहि तूर्णं कुरु मा विलम्बम् ॥ ३७ ॥
श्रुत्वेति तद्वाक्यमथादरेण शिवाय राज्ञे प्रणतिं विधाय।
तिष्ठन्नतिप्रह्वतयेतिहृष्टः प्रोवाच तूर्णं वनपालबालः ॥ ३८ ॥
एवंविधा तव गिरेर्दिशि दक्षिणस्यां चान्द्री पुरी खलु महाबळतः समीपे ।
राजश्रियां सुललिता वसुपेटिकेव काचित्पुलिन्दपतिनास्ति कृताधिवासा ॥ ३९ ॥

नेयं पातालमूले निवसति नितरां नैव मर्त्येऽपि लोके
न स्वर्गे नान्तरिक्षे प्रकटितविलसत्सर्वलोकस्वभावा ।
किंतु श्रीशाहभूपात्मजशिवनृपते चारुसान्निध्यभाजो
नित्यं वाराणसीवल्लसति बळवतस्त्र्यंबकस्य त्रिशूले ॥ ३८॥
ततोऽप्यदूरे दिशि पश्चिमस्यां रामाश्रमः कोऽपि समुद्रतीरे ।
आस्तेतरां यत्र जनः समस्तो राजन्वतीमिच्छति तां स्वभूमिम् ॥ ३९ ॥
इति खलु वनपालबालवाक्यान्यचलमनाः श्रवणातिथीनि कृत्वा ।
शिवनृपतिरसौ तदैव चन्द्रोत्तमनगरग्रहणे मतिं चकार ॥ ४० ॥
तस्मै दत्वा भूरि संतोषकारि द्रव्यं वासो रत्नभूषादिकं च ।
सोऽयं राजा स्वीयशुद्धान्तसौधं स्वापं कर्तुं गच्छति समातिहृष्टः ॥ ४० ॥
अथ दध्वनुराशु कांस्यताळैः सहढक्कामि (तरै) र्विचित्रवाद्यैः ।
उषसि क्षितिपप्रबोधनाय प्रियगीतिस्तुतिपाठकैः समेताः ॥ ४१ ॥
प्रातःस्मृतिद्विजवरैः प्रतिबोधितोऽय-
मुज्झांचकार कृतजागरणोऽपि निद्राम् ।
सोऽयं शिवः श्रवणमौक्तिकदीप्तिमिश्र-
मन्दस्मितोत्तमनिभो ललिताधरोष्ठः ॥ ४२ ॥
इति सकळकळोल्लसद्भवानीशिवबुधसूनुकृते महत्युदारे
अभवदिह शिवक्षितीशकाव्ये शिवगिरिजोत्सववर्णनोपि सर्गः ॥
इति श्रीसकळकळकुळतिळक-भवानी-शिवसूरिसूनु-विरचिते शिव-महाकाव्ये सर्ग

सर्ग ५

अतिवाह्य रात्रिमितिजागरणैरथ दिश्य एव कृतनित्यविधिः ।
निजमंत्रिभिः सह विचार्य शिवो मृगयाप्रसिद्धिमकरोत्कटके ॥ १ ॥
ततः शिवस्थानुचरा गृहीतवेत्राः स्वसैन्ये गिरमित्थमूचुः ।
उच्चैर्भवन्त्वाशु भटाः समस्ताः सिद्धाः शिवोद्धा मृगयेच्छुरास्ते ॥ २ ॥
पर्याण्यन्तां तुरंगा विजितजनमनोरंहसः स्वीयमौर्व्या
प्यारोप्यन्तां समन्तात्प्रतिनृपकळितायूंषि तानाधनूंषि ।
अग्न्यस्त्रैरेव माद्यद्गजपतिनिवहास्तेऽपि सज्जीक्रियन्तां
गृह्यन्तां कृत्तखड्गाः प्रतिदिनमसकृच्छाणधौताश्च खड्गाः ॥ ३ ॥
ततश्च सेनापतयोऽपि सिद्धाः स्नेहानुविद्धा नृपतेः प्रसिद्धाः ।
समाययुर्गोपुरवीथिकास्ताः प्रतीक्षमाणाः शिवभूपयात्राम् ॥ ४ ॥
ततश्च ते डिंडिमवाद्यघोषैर्निवेदयन्ति स्म चमूसमागमम् ।
नृपाय देवार्चनतत्पराय सदा पुराणश्रवणेतराय ॥ ५ ॥
शिवं समभ्यर्च्य शिवोपि भक्त्या सत्पात्रवृंदाय निवेद्य धेनूः ।
पित्रोः पदद्वन्द्वमथाभिवन्द्य कर्तुं तदा दिग्विजयं प्रतस्थे ॥ ६ ॥

अथ मर्दलतालकाहलव्रजढक्कारवगोमुखा रवाः ।
अपि घर्घरझर्झरस्वनाः प्रतिशब्दैर्नभभुस्तदांबरे ॥ ७ ॥
श्रुत्वा प्रस्थानढक्कारवमपिविलसत्कञ्चुकः स्फारहर्षे-
णारूढश्चारुमाद्यद्‌गजपतिममलच्छत्रवेलुत्पताकम् ।
स्फूर्जद्‌गङ्गाप्रवाहद्वयसमचमरोच्छालनैर्वीज्यमानो
राजासौ गच्छति स्म प्रविजितमदनः स्मेरवक्त्रारविन्दः ॥ ८ ॥
गोपुराद् बहिरुपागते नृपे बाहुजक्षितिभृतः ससैनिकाः ।
मस्तकैरभिववन्दुरुच्चकैर्भूमिमण्डलमिलत्करैः सह ॥ ९ ॥
सर्वत्रापि तुरंगटापहतिभिः संचूर्णिता मेदिनी
प्रापोच्चैर्बळभारघूर्णिततनुः शेषोपि निःशेषताम् ।
वैरिक्षोणिभृतां मनोभिरभितः प्रापुः कुलक्ष्माभृतः
कंपं दिग्विजयाभिलाषिणि शिवे सैन्यैः सह प्रस्थिते ॥ १० ॥
रक्तोष्णीषावतंसीकृतसुरसुमनस्पर्धिपुष्पावगुच्छः
स्फूर्जत्कंजायताक्षः श्रुतियुगविलसद्‌वृत्तमुक्ताधिकश्रीः ।
राजायं शोभते स्म प्रचलितकटके पार्श्वयुग्घोटकस्थो
माद्यत्प्रोद्दामबंदीजनकृतरुचिरस्तोत्रदत्तावधानः ॥ ११ ॥
राजा शिवोऽखिलचमूमिलनाय तूर्णं क्रोशद्वयोपरि पुराद्वसतिं चकार ।
नानाकलाकुशलमाशु ततः परेद्युराशीप्रदं द्विजमपूपुजदर्हणीयम् ॥ १२ ॥
अथ सकलकलस्याशीर्भिरानंदितोऽसौ मिलितबहलसैन्यः पालितानल्पधान्यः ।
निजजनपदमारात्तं परित्यज्य बिभ्यत्प्रतिनृपतिविराटस्थानसीमामवाप ॥१३॥
तत्र कार्मुकधरैः पदातिभिः संवृतो नरपतिर्महाबलम् ।
आप यौधनवनीभिराकुलं च्छन्नभीमविषयोच्चपद्धतिम् ॥१४॥
विषमाश्रुमुखीप्रचंडघट्टस्थितमार्गेण समादिदेश गन्तुम् ।
गजवाजिसमुल्ललत्पताकाध्वजचिह्नां पृतनां शिवक्षितीशः ॥१५॥
अभिपूज्य निशि त्रिलोचनं तं परितः स्थाप्य निजं महद्‌बलं तत् ।
क्षितिपः प्रयतः शिवालयेऽस्मिन् क्षितिशायी शयने शिवं ददर्श ॥१६॥
चिरबद्धजटांतरालगंगं भसितोद्धूलितविग्रहं समंतात् ।
विषमेक्षणविस्फुरल्ललाटं किल कालीकलितं निजार्धभागे ॥१७॥
चलकुंडलिकुंडलस्फुरच्छुभगंडोल्लसितस्मिताननम् ।
त्रिपुरान्तकमंबरांबरं दशदोर्दण्डविराजितं प्रभुम् ॥१८॥
गरलाकलनाद्‌गलेऽतिनीलं शशिभूषं विलसत्कपालमालम् ।
मृदुलां गिरमित्थमुद्‌गिरंतं शितदवकरचारुहारभूषम् । कालापकम् ॥१९॥
प्रदर्श्यते चन्द्रपुरस्य मार्गो गम्यस्त्वया याहि मयैव सार्द्धम् ।
उक्त्वैवमीशः स्वकरेण धृत्वा शिवं शिवश्चंद्रपुरं निनाय ॥२०॥

अवदच्च शुचिस्मितः शिवो विकटां पश्य शिवाद्य संकटाम् ।
सरणिं पि(वि)हितां शुचिस्फुरत्तरणिं त्वं मरुतोऽप्यगोचराम् ।।२१।।
शिलामेनामुच्चां परिहर शिशो लोष्टलकुटैः
क्षुराकारैः सूचीनिवहतुलितैर्गोक्षुरशतैः ।
वृतं मार्गं मार्गं त्यज सपदि तार्णं प्रियसखे
विदीर्णं स्वौन्नत्याद् भुजगकलितार्णं समुदयैः ।।२२।।
अग्रे वनं कठिनमेव मम प्रसादादुत्तीर्णमेव भविता भवता स्वबुद्धचा ।
श्रीशाहनामनृपतेरतिभक्तियोगात्तुष्टस्तवापि शिव चंद्रपुरप्रदाने ।।२३।।
प्रदर्श्य मार्गं कठिनं शिवाय सोऽन्तर्दधे कोऽपि महानुभावः ।
सविस्मयो हृष्टमनास्तदोच्चैरुज्झांचकार क्षितिपोऽपि निद्राम् ।।२४।।
शिवः समुत्थाय निशान्त्यभागे प्रणम्य देवं सगणं महाबलम् ।
तमेव मार्गं हृदये निधाय बलैः समेतः प्रबलैः कुलीनैः ।।२५ ।।
केचित्ते गणपतयः परश्चधाढचाः प्रोन्मत्ता इव वरुणा गृहीतपाशाः ।
धानुष्काः शिवनृपतिं तदानुजग्मुरुत्कृष्टा जगति पदातयः पदातिम् ।।२६।।
अप्येकपाशा विधृतद्विपाशास्तमप्रिया अप्यखिलाः शशांकाः ।
विदीर्णखड्गा अपि चारुखड्गास्तमन्वयुः केचन युद्धशूराः ।।२७।।
अत्रांतरे शिवनृपागमनं विदित्वा दूतास्यतोपि चतुरंगबलाट्टहासैः ।
स्वीयप्रतापपरितापितवैरिसेना चांद्री चमूस्त्वरितमश्रुमुखीं जगाम ।।२८।।
शैवीं तां प्रसभभगीरथप्रयत्नैरायातां विषमहीध्रमूर्द्धभागात् ।
दृष्ट्वैवं स्खलितगतेन भंगमाप्तां ते सेनां सरितमिव प्रमोदमापुः ।।२९ ।।
तत्र युद्धमभवद्भयानकं शंकटे पथि तयोः परस्परम् ।
पूर्वदेवसुरयोरिवाद्भुतं राजचंद्रजयघोषणं महत् ।।३०।।
चांद्रास्ते पत्तिवीरा घनवनकलितध्वान्तवर्त्मन्यदृष्टे
कुंताघातैः प्रचण्डैर्मदकलकरिणां दारयन्तः कपोलान् ।
निघ्नन्तस्तीक्ष्णखड्गैः शिवकटकभटांस्तूर्णमुद्धूलयंतो
धूलीवद् हर्षमापुः क्षणविधृतजयाश्चारुचण्डप्रतापाः ।।३१।।
तेष्याशु संकटविवर्धितवृक्षजालमध्यस्थगोत्रविपथं परमुत्तरन्तः ।
तैराखुभिर्बिलमिलत्तनुभिर्विदीर्णाः सिंहा इव क्षणमधोवदना बभूवुः ।।३२।।
उपत्यकाभूमिमवाप्य सेना सा सावधानैव बभूव शैवी ।
जांबूनदप्रस्फुरदग्रकोशसहस्रनिस्सारिततीक्ष्णखड्गा ।।३३।।
कुन्तान्स्वकुन्तैर्निजतीक्ष्णखड्गैः खड्गप्रहारानपि वारयन्तः ।
अविक्षताश्चोभयसैनिकास्ते बभूवुरानन्दकृताट्टहासाः ।।३४।।
ऋंकाराणां सहस्रैर्मदसलिलमिलच्चारुमाद्यद्गजानां
हेषाभिर्घोटकानामतिशयविहितादाट्टहासैर्भटानाम् ।

प्रौढैर्निस्साणनादैरपि रणधरिणीपूरितां श्रीशिवेन
भूत्वा कूर्मादयोपि प्रसभमभिनवं ते चमत्कारमापुः ॥३५॥
वर्षाकाल इव प्रकृष्टयमुनागंगोच्छलत्पात्रयो-
रौद्धत्यादतुलौ पराजयजयावन्योन्यतः प्राप्तयोः।
तद्राजन्यपुलिंदयोरभिमुखौन्नत्योच्छलत्सैन्ययोः
साश्चर्यं प्रधनं बभूव भयदं मध्यंगते भास्करे ॥३६॥
शैवैर्भटैरलघुभिः क्षणमक्ष्मपातसंमीलने नयनयोरपि वंचितास्ते।
कुंतासिमार्गणगणैर्विहितप्रहाराः प्राणान् जहुर्झटिति चंद्रमसश्चसैन्याः ॥३७॥
एतस्मिन्नपि समयेऽतिमोदितः सस्नेहेन स्मररिपुणा शिवः क्षितीशः।
पत्तीनामपि दशभिर्युतः सहस्रैः सानंदं घनमाविवेश चान्द्रम् ॥३८॥
विस्तीर्णं दश योजनानि परितः सह्याद्रिपादोच्छलन्
नानानिर्झरपूरपूरितवहत्कोण्या स्रवन्ती स्रवत्।
वृक्षैः कण्टकितैः स्वरक्षकबहुस्नेहादिव प्रस्फुरज्
जालैरन्यसहायिनां च पिहितच्छिद्रैः सुमित्रैरिव ॥३९॥
श्रीचंद्रधन्वन्तरिदत्तवातविध्वंसनैः शाखिभिरावृतं यत्।
सद्योगिभिः पूरितकुंभकैस्तैरिवापि किंचिच्चलितुं न शक्तैः ॥४०॥
निभृतममृतवल्लीविस्फुरत्स्फारझिल्लीगणकृतबहुघोषं वस्तुपत्रास्यशेषम्
वसनरहितभिल्लीभीषणं तन्मतल्लीविटपकलितमल्लीजालमालं चकास्ति ॥४१॥

साभ्यस्तछागद्विजशाखिवृंदैः कलेरिवोच्चैरपरस्वरूपैः।
सन्मार्गविच्छेदकरैः समेतं मरुत्कुलस्पर्शपराङ्मुखैस्तैः ॥४२॥
सुयोधनसभाधिकं शकुनिलक्षपक्षाप्रियं शिलीमुखकुलोल्लसच्छतसहस्र भीमार्जुनम्।
अनेकनकुलाकुलं च सहदेववृंदः स्फुरन्महाबलसमीपगं कलितकृष्णरूपं सदा ॥४३॥
शार्दूलखड्गप्लवगद्विपानां तरक्षयोन्यर्क्षमहामृगाणाम्।
माद्यंति यूथानि बहूनि यत्र गन्तुं न यच्छन्ति सदा जनानाम् ॥४४॥
चूतप्रियालुपनसक्रमुकेक्षुजम्बूबिल्वाक्षकिंशुकविशालतमालतालैः।
खर्जूरचंदनकदंबशिरीषकुंदपुन्नागकुब्जककपित्थककोविदारैः ॥४५॥
स्वर्णाख्ययूथीशतपत्रमल्लीजपाभयाभिः कुटजेंगुदीभिः।
भल्लातकप्लक्षवटैरशोकारिष्टैर्मधूकैः सरलद्रुमैश्च ॥४०॥
सकुमुदशतपत्रोत्फुल्लकल्हारमालामिलदलिकुलगुंजारावदत्तावधानैः।
मदगजपतिवृंदैः सेवितैरप्सरोभिः कलितममलजातिप्रस्फुरच्चंपकैश्च ॥४१॥
जलकुक्कुटहंसचक्रवाकैर्बकंकारंडवकोकिलाकलापैः।
बलिभुक्-शुकलावसारिकाभिर्बहुहारीतकतित्तिरव्रजैश्च ॥ कुलकम् ॥४२॥

वृक्षाः परं कामुकतप्तरागविकीर्णदेहाः कुसुमावतंसाः ।
करैरिवोत्तुंगपयोधराग्रं वर्षांगनानां विटपैः स्पृशन्ति ।।४३।।
बदरीनिवहोपि केसरिभ्यः कलयित्वा निजकंटकैर्नखाग्रैः ।
चमरैरपि वीजितः कृतघ्नश्चमरीरेव बलिं करोति यत्र ।।४४।। युग्मं ।
शकुनिशतसहस्रजातकोलाहलकृतजागरणा युयुत्सुसिंहाः ।
प्रहितशरसमूहपूर्णतूणीकृतवदनाः शकुनं शिवाय चक्रुः ।।४५।।
दंडपाणिभिरनेकवागुरासंग्रहैर्धृतशरासनैर्भटैः ।
संवृतः शिवनृपो मृगद्विपैराकुलं वनमपीडयत् क्षणात् ।।५२।।
शार्दूलवद्वनमिति प्रविगाह्य तूर्णं चांद्रं (ततः) शिवनृपः प्रविवेश पूर्णम् ।
संपत्तितिः सपदि तत्र रहस्तरुण्याः पाणिग्रहं किल चकार जयश्रियश्च ।।५३।।
नृपतेर्नगरप्रवेशकालाहृतकल्पांतभयादिवोच्छलन् ।
स्खलति स्म तदाशुवैरिनारीधृतगर्भः प्रकटो भयंकरः ।।५४।।
कोलाहलैः शिवभयाकुलचंद्रनारीनानाविलापजनितैः प्रतिबोधितास्ते ।
चांद्राः प्रलापनपरा नगरे हताशा लीना निकुंजविवरेषु जना बभूवुः ।।५५।।
पुनस्ततोप्यष्टदिनान्यजस्रं शिवं ससैन्यं रुरुधुः समेताः ।
चौर्यादिकैर्धान्यविलुंठनाद्यैरुद्वेजितं किंचिदिव श्रमेण ।।५६।।
क्रोशार्धं नगरसमीपतः समंतात्तान्वृक्षानमितपरस्वधैर्लुलाव ।
राजापि प्रतिदिनयुद्धबद्धचेताः सन्नद्धः स्वयमचिरादवाप्तधान्यः ।।५७।।
आगत्य तं निजपुरं प्रति दृष्टपूर्वमार्गाः परे शतसहस्रमिताः समेताः ।
रात्रौ परं शिवचमूकदनं विधाय जग्मुर्वृतं नगनिकुंजवनस्थलीस्ताः ।।५८।।
अकपटकटकोऽपि शाहसूनुः सकपटवैरिचमूविनाशनाय ।
स्वयमपि कुटिलां मतिं विदध्रे भवति हि मायिनि माधवोऽपि मायी ।।५९।।
युद्धश्रमेण कलितां परकीयसेनां सुश्राव दूतमुखतः कुहचिद्विलीनाम् ।
अप्रेषयद्विगलिताधिमखर्वगर्वसेनापतिं कपटयुद्धविधानदक्षम् ।।६०।।
तूर्णं सेनाधिनाथो जितपवनजवस्तत्र गत्वारिसेनां
सुप्तां भोक्तुं निविष्टां विनिहितनिखिलस्वीयशस्त्रां विदूरात् ।
अश्वत्थामेव कोपातिक गम नमनाः खड्गमादाय तीक्ष्णं
दीनां लीनां निकुंजेष्वपि तरुविवरे तां चकर्त्ताप्यशेषाम् ।।६१।।
वार्ताहारमुखाम्बुजादरिवधं श्रुत्वा शिवक्ष्मापते–
र्दूताः काहभेरिडिंडिमरवैलरापूरयांचक्रिरे ।
भूगोलं मदमत्तकुंजरपतिक्रेंकारहेषारवै-
रापूर्णं परितः स्फुटंतमिव तद्विस्फारताराछलात् ।।६२।।
ततोप्यदृष्ट्वै शिवप्रतापः शिवं समुच्छृंखलतां गतः सन् ।
दूरादुदग्दक्षिणपूर्वभूपतापाय कोपान्नितरां प्रतस्थे ।।६३।।

इति सपदि विजित्य तत्र चांद्रं पुरमधिकर्धितयोत्पलं विधाय ।
निजबलमिलितः परां स्वकीयां पुरमभिगंतुमनाः शिवः प्रतस्थे ॥६४॥
इति सकलकलोत्स्फारमूर्धन्यभूषामणिशिवसुतविद्वद्वर्यसंपादितेऽस्मिन् ।
शिवनरपतिकाव्ये सुंदरे चंद्रराजक्षितिपतिवधलीलावर्णनः सर्ग एषः ॥६५॥

सर्ग ६

अथो जयश्रीसहितः शिवोऽसौ द्विजैः कृतस्वस्त्ययनः सहर्षैः ।
नानाविधैर्मंगलवाद्यघोषैरपारसेनासहितश्चचाल ॥१॥
(श्लोक २–९ सैन्याच्या मिरवणुकीचे वर्णन)
माद्यन्मातंगकुंभच्युतमदसलिलैः स्नापितां सत्सखीभिः
... प्राप्तपुष्पामतिहितविषयां तां सरोजायताक्षीम् ।
कान्तामारामसीमां कतिपयदिवसैः स्वीकृतब्रह्मचर्यो
राजा भोगोपयोग्यामृतुगमनमनाः सायमेवोज्जगाम ॥१०॥
(श्लोक ११–१५ शिबिरवर्णन, राजा झोपी जातो.)
प्रातः समुत्थाय ततः परेद्युरानंदितः स्वीयजनैः समस्तैः ।
आहूय कंचिद्द्विजमाशुमत्तमातंगदानेषु मतिं चकार ॥१७॥
आज्ञप्तः सकलकलद्विजोऽपि तूर्णं सामग्रीगणमकरोत्तदैव पूर्णम् ।
संयुक्तं द्विजवाजिगोवृषाणां भूषाभिर्विमलसुवर्णनिर्मिताभिः ॥१८॥
ततः पुण्यदेशे परं चन्द्रमालातटं विश्वकर्मप्रियैस्तैरनेकैः ।
जगाम द्विजैः सार्धमेव द्विजोऽसौ महालाङ्गलैर्भूमिशोधं चकार ॥१९॥
(श्लोक २०–३१ यज्ञमंडप व सामग्रीवर्णन)
सामग्रीमिति सकलां विधाय राजा संक्रान्तिप्रथमदिने द्विजैः समेतः ।
शुद्धान्तैः कृतवंदनः स्वपित्रोः पुण्याहं बहिरनुवाचयांचकार ॥३२॥
(श्लोक ३३–३५ यज्ञवर्णन)
आहूताः सकलकलेन मंत्रघोषैः सुत्रामप्रभृति सुरा विमानसंस्थाः ।
हव्यानां सपदि हुताशने हुतानां सानंदं परिजगृहुः स्वकीयभागम् ॥३६॥
(श्लोक ३६–३९ दानवर्णन)
तत्र द्विजा निखिलयज्ञसमाप्तिकाले राजाभिषेकमभिचक्रुरनल्पमंत्रैः ।
गंगांभसा कनककुंभशतैः सदूर्वचूतांकुरैः प्रमुदिता बहुवाद्यघोषैः ॥४०॥
कुसुमसुरभितैलैरामलक्यादिचूर्णैः परिमलमिलदंभःपूर्णसौवर्णकुंभैः ।
प्रमुदित उपविष्टः काञ्चनोत्तुंगपीठे नृपतिरपि चकाराभ्यंगमाराज्जनानाम् ॥४१॥
त्यक्त्वाभ्यंगीयवासोयुगलमभिनवं स्वांगमुन्माद्यं नाना-
वासोभिः सौरभाढ्यैः सपदि सुविहितस्फारभस्मावलेपः ।

धृत्वालंकारवासःप्रभृति समुचितं राजवेषेण राजा
प्रासादं स्वीयमुच्चैस्तदनु बहुधनांदोलिकास्थः प्रतस्थे ॥४२॥
अश्ववारगजपत्तिसमूहै रक्षितः शिवनृपस्त्वरयैव ।
प्राप्य मंदिरमथापि च रात्रावर्थदानमकरोदतिथिभ्यः ॥४३॥
राजा तदाप्रभृति शाहमहीपसूनुरेतान्यवारितधनानि मुदा चकार ।
मूर्तित्रयस्य रजतस्य सुवर्णराशेर्दानानि पात्रपुरुषस्य च पुस्तकादेः ॥४४॥
इति विविधमनल्पदानखंडस्थितमपि दानविधिं विधाय राजा ।
जलनिधिकलितं विशालशैलं मुदितमनाः खलु कोंकणं प्रतस्थे ॥४५॥
इति सकलकलोपनामशोभिद्विजशिवकोविदसूनुना कृतेऽस्मिन् ।
प्रथितशिवनृपालचारुकाव्ये वितरणवर्णनसर्ग एष जातः ॥४६॥

सर्ग ७

ततश्च सेनापतयोनुजग्मुरानंदिता दिग्विजयेन तेन ।
शिवं द्विजाशीःकलितारिवृंदमभ्यर्चितत्र्यंबकपादपद्मम् ॥ १ ॥
कैलासराजवहुलोहपुरन्दरादिनानागिरीशपरिपोषितदिव्यदेहाः ।
श्रीमच्छिवं प्रमुदिता इव ते गणेशाः सर्वेऽनुजग्मुरमिताः खलु पार्वतीयाः ॥२॥
ते तैलघट्टादवतेरुरुच्चादधःपथं संकटमुत्कटं च ।
पातालपाद्यामिव वैनतेया भुजंगमान्वैरिगणान्निहन्तुम् ॥ ३ ॥
सरसीसरसीरुहैः समेतं विकसत्तालतमालनालिकेरम् ।
नृपतिः क्रमुकौंधनागवल्लीमिलितं कौंकणमीक्षते स्म सर्वम् ॥ ४ ॥
७. जगाचा संक्षिप्त इतिहास–१९५७
सहकारी, प्रा. चं. रा. पोतनीस
प्रा. गो. हु. महाजन
८. भारतीय राज्यघटनेचा सोपपत्तिक इतिहास–१९६२
सहकारी, प्रा. पां. श्री. घारे

॥ श्री विनायकराव ओतुरकर निधी ॥

॥ श्री ॥

करानामा शके १८९४ माघ शु. ५ (वसंत पंचमी)
दि. ८ फे. १९७३ इसवी सन या दिवशी.
प्रा. राजाराम विनायक ओतुरकर, एम्. ए. वय अजमासे ७५ धंदा ग्रंथ लेखन, राहणार 'स्वातंत्र्य' ७६७।११ पुणे ४. करून

करारनामा करून घेणार

यांसी

भारत इतिहास संशोधक मंडळ या रजिस्टर्ड संस्थेचे निर्दिष्ट विद्यमान चिटणीस श्री. स. मा. गर्गे, सदाशिव पुणे ३०, करारनामा करून देणार

कारणे करारनामा करून देतो कीं,

भारत इतिहास संशोधक मंडळाचे वर्ग १ चे आजीव सभासद व करार करून घेणार प्रा. राजाराम विनायक ओतुरकर यांनी करारनामा करून देणाऱ्या संस्थेस यापूर्वी एकूण रु. १५,०००।-(रुपये पंधरा हजार) च्या देणग्या करारनामा करून देणाऱ्या संस्थेच्या तर्फे प्रसिद्ध होणाऱ्या त्रैमासिकाच्या खर्चास व त्यास आवश्यकता नसल्यास म. म. द. वा. पोतदार सल्ला देतील त्या इतर ग्रंथ प्रकाशनास त्या देणगीच्या व्याजाचा उपयोग व्हावा म्हणून दिल्या आहेत. त्या देणग्यांचा स्वीकार सदरहू संस्थेने यापूर्वीच केला आहे. त्यानंतर १०-७-७२ दिनांकी करारनामा करून घेणार यांनी आणखी रु. ५,०००।- (रुपये पांच हजार) रोख दिले व आणखी रु. ५,०००।- (रुपये पाच हजार) देण्याचे कबूल केले आहे. ते न आल्यास ही देणगी रु. २०,०००।- (रुपये वीस हजार) ची राहील. सदरील रु. २०,०००।- (रुपये वीस हजार) आणि पुढे मिळणाऱ्या रु. ५,०००।- (रुपये पांच हजार) देणगीचा विनियोग कसा करावा या संबंधी जुन्या अटी परस्पर संमतीने यापुढे रद्द करून नव्या शर्ती प्रा. रा. वि. ओतुरकर यांनी सुचविल्या, त्याबाबत करारनामा करून देणाऱ्या भा. इ. सं. मं. चे कारभारी मंडळ व करारनामा करून घेणारे प्रा. रा. वि. ओतुरकर यांमध्ये विचारविनिमय होऊन सदरील देणगीचा पुढे नमूद केलेल्या शर्तीनुसार विनियोग व्हावा असे ठरले आहे. व त्याप्रमाणे करारनामा करून देणाऱ्या संस्थेच्या कारभारी मंडळाने आपल्या दि. १०-७-७२ च्या सभेत तसा ठराव केला आहे. सदरील शर्ती करार करून देणाऱ्या संस्थेवर व करार करून घेणाऱ्या व्यक्तीवर व त्यांचे वालीवारसदारांवर बंधनकारक आहेत व त्या शर्तीप्रमाणे देणगीचा विनियोग व्हावा अशी बंधने करार करून देणारी संस्था स्वखुषीने स्वीकारीत आहे.

सदरील शर्ती पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) सदरील निधि रु. २५,०००।- "श्री. विनायकराव ओतुरकर निधि" म्हणून संस्थेने कायम निधि म्हणून संरक्षित ठेवावयाचा आहे. तो मूळ निधि इतर कोणत्याही कारणास्तव व कधीही खर्च करावयाचा नाही. सदर निधीवरील व्याज पुढे नमूद केलेल्या कारणाव्यतिरिक्त संस्थेने इतर कोणत्याही कारणांसाठी खर्च करावयाचे नाही. सदरील निधी सरकारमान्य बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवावा व त्यावरील फक्त व्याज पुढे नमूद केलेल्या उद्दिष्टांवर खर्च करावयाचे आहे. मूळ (रु. २५,०००।-) खर्च करावयाचा नाही. संस्थेच्या जमाखर्चास तो प्रतिवर्षी वरील नावाने स्वतंत्र निधी म्हणून दर्शवावा.

(२) वर कलम क्रमांक १ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे सदरील " श्री. विनायकराव ओतुरकर निधीच्या " व्याजाचा विनियोग पुढीलप्रमाणे व्हावा–

(अ) ग्रंथालयातील ग्रंथ ठेवण्यासाठी कपाटे विकत घेणे. (आ) ग्रंथालयातील दुर्मिळ व सैल झालेल्या ग्रंथांचे रक्षण करण्यासाठी व त्यांची उपयुक्तता वाढविण्यासाठी योग्य ते उपाय करणे. (इ) मराठ्यांच्या इतिहासास उपयोगी पडणाऱ्या परंतु दुर्मिळ झालेल्या ग्रंथांचे व साहित्याचे पुनर्मुद्रण करणे. (ऊ) संस्थेच्या मुखपत्राच्या प्रकाशनार्थ सहाय्य करणे. (ऋ) या प्रकाशित केलेल्या सर्व वाङ्मयाच्या प्रत्येक ग्रंथाच्या अग्रभागी " श्री. विनायकराव ओतुरकर निधीचे प्रकाशन " असा मजकूर दर वेळी घालावा.

(३) सदरहू निधीच्या व्याजातून पुस्तके अंशतः वा संपूर्ण कशीही प्रकाशित केली तरी सर्वांची बांधीव स्वतंत्र पुस्तके शेवटी विक्रीसाठी ठेवावी व त्यावर वरीलप्रमाणे मथळा घालावा.

(४) या निधीच्या व्याजातून संस्थेच्या ग्रंथालयांतील ग्रंथ सुरक्षित ठेवावयाच्या विशेष कपाटावर " श्री. विनायकराव ओतुरकर निधीतून खरेदी " असा मथळा घालावा.

(५) सदरहू " श्री. विनायकराव ओतुरकर निधी " प्रकाशने संस्थेच्या सभासदांना कशी व कोणत्या प्रकारच्या किंमतीत द्यावयाची याबाबत कारभारी मंडळास निर्णय करण्याचा सर्वाधिकार आहे.

(६) सदरील कारभारी मंडळाने प्रकाशनाची १ प्रत विनामूल्य प्रा. रा. वि. ओतुरकर व त्यांचेनंतर त्यांच्या पत्नी व थोरले चिरंजीव श्री. वसंतराव व नंतर त्यांच्या मुलास देत जावी व पुढील वारसास देववावी.

(७) या निधीत किंवा निधीच्या उत्पन्नात कोणासही भा. इ. सं. मंडळाच्या कारभारी मंडळाच्या ठरावाने व संमतीने भर टाकण्याचा अधिकार आहे.

(८) या निधीचा हिशेब स्वतंत्र ठेवावा व या निधीच्या व्याजातून प्रकाशित केलेल्या ग्रंथविक्रीचे जे उत्पन्न येईल त्यातून मंडळाने स्वतःसाठी १५ टक्के वाजूला काढून बाकी रक्कम " श्री. विनायकराव ओतुरकर निधीत " जमा करीत जावी. ते सर्व मूळ (रु. २५,०००।–) च्या निधीत जमा करावे व सदरहू प्रमाणे वाढतजाणारा सर्व निधी " श्री. विनायकराव ओतुरकर निधी " म्हणून वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे सुरक्षित ठेवावा व त्यावरील व्याज सदरील शर्तीप्रमाणे खर्च करावे.

(९) सदरहू निधी म्हणजे भारत इतिहास संशोधक मंडळाच्या कायम निधीसारखाच. परंतु या कराराने संरक्षित केलेला सशर्त संरक्षित कायम निधी रहावा. त्याचे हिशेब संस्थेच्या हिशेब तपासनीसांकडून संस्थेच्या इतर हिशेबाप्रमाणेच तपासले जावे व प्रतिवर्षीच्या अहवालात प्रसिद्ध केले जावेत.

(१०) सदरहू देणगीच्या शर्तीबाबत योग्य ते पालन होते की नाही हे पाहण्यासाठी व निधीच्या व्याजातून वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे विनियोग करण्याबाबत वेळोवेळी सल्ला देण्यासाठी एक सहा जणांचे सल्लागार मंडळ राहील. हे सल्लागार मंडळ पुढील सहा गृहस्थांचे येत्या दहा वर्षांसाठी (शके १८९४ ते १९०३) राहील. त्यांचा सल्ला भारत इतिहास मंडळावर या निधी प्रकरणी बंधनकारक राहोल :—

(१) प्रा. रा. वि. ओतुरकर (२) प्रा. ग. ह. खरे (३) डॉ. अ. रा. कुलकर्णी (४) श्री. दि. वि. काळे (५) श्री. वि. त्र्यं शेटे व (६) श्री. दि. दा. गांगल

(११) सदरहू १० वर्षात वरीलपकी कोणाचीही जागा मृत्यू, राजीनामा विकलांग परिस्थिती, इ. कारणांनी पूर्ण रिकामी झाल्यास त्यांचे ऐवजी इतरांची नांवे प्रा. रा. वि ओतुरकर यांनी सुचवावयाची आहेत.

(१२) प्रा. रा. वि. ओतुरकर यांच्या हयातीनंतर सदरहू पैकी कोणाचीही जागा कोणत्याही कारणाने रिकामी झाल्यास उर्वरित सल्लागारांनी त्या जागेसाठी नेमणूक करावी. सल्लागार मंडळाची मुदत १० वर्षे असावी. दर १० वर्षांनी कारभारी मंडळाला नवीन सल्लागार मंडळ निवडता येईल व त्यावर पूर्वीच्या सल्लागार मंडळांतील सल्लागारांना पुन: नियुक्त करता येईल व त्या सल्लागार मंडळाचीही कामे वरीलप्रमाणेच राहतील.

(१३) वर निर्दिष्ट केलेल्या सल्लागार मंडळाची सभा संस्थेच्या चिटणीसांनी वेळोवेळी बोलवावी व त्याचे निर्णय कारभारी मंडळापुढे ठेवावेत व जरूर वाटल्यास सल्लागार मंडळही आपली सभा बोलावू शकेल. वर निर्दिष्ट केलेल्या शर्तीची, प्रकाशनांची व इतर सर्व गोष्टींची कार्यवाही कारभारी मंडळाने सल्लागार मंडळाचे निर्णय बंधनकारक समजून करावयाची आहे.

(१४) सदरहू निधीबाबतच्या शर्तीनुसार काय कार्य झाले या बाबतचा अहवाल प्रतिवर्षी संस्थेच्या अहवालात स्वतंत्र परिच्छेद करून घालावा व प्रतिवर्षी प्रा. रा. वि. ओतुरकर यांस व त्यांच्या हयातीनंतर त्यांच्या पुरुष वंशजांपैकी श्री. वसंतरावांकडे व पुढे त्यांच्या वारसाकडे पाठवीत जावा.

येणेप्रमाणे करारनामा उभयतांनी राजीखुषीने संमत केला आहे व त्याप्रमाणे संस्थेने कार्यवाही करावयाची आहे.

करारनामा करून देणार

(१) (सही) **स. मा. गर्गे**
चिटणीस, भारत इतिहास संशोधक मंडळ.

साक्षीदार सही—(१) V. P. Bokil
1203 Sadashiv, Pooan 30.

करारनामा करून घेणार

(२) (सही) रा. वि. ओतुरकर

(२) साक्षीदार सही—सौ. क. श्री. गोखले
१३९४ शुक्रवार, पुणे.

अक्कलकोट प्रकरण (१८३०)

प्रा. अ. रा. कुलकर्णी, पुणे विद्यापीठ.

छत्रपती शाहूच्या कारकीर्दीत अक्कलकोट जहागिरीची निर्मिती झाली. मुघलांच्या कैदेतून सुटका झाल्यानंतर ताराबाईच्या पक्षातील सरदारांनी शाहूला विरोध करण्यास प्रारंभ केला. दौलताबादेपासून २५ मैलांवर असलेल्या पारदच्या शहाजी लोखंडे पाटलाने शाहूला प्रथम विरोध केला. या चकमकीत पाटील मारला गेला, पण पाटलाच्या विधवा पत्नीने आपल्या अनाथ बालकाला शाहूच्या चरणी घालून अभयदानाची याचना केली. शाहूने या मुलाचा प्रतिपाळ केला—फतेसिंह असे त्याचे नाव ठेवले आणि आपल्या मुलासारखे त्याला वाढविले. कदाचित् शाहूच्या मृत्यूनंतर तो छत्रपतिपदावर आरूढ होऊ शकला असता. पण राजसिंहासनापेक्षा अक्कलकोटची जहागीर त्याला श्रेयस्कर वाटली असावी. एका पत्रात म्हटले आहे, "तुमचे मानस स्वामींनी पुत्र करून, दौलत देऊन महत्पदारूढ केले ते विसी अक्षई चालण्याचे खास दस्तुर व मुद्रांकित पत्र असावे.....अक्कलकोट तुमचे बेजमीस पूर्वीपासून देऊन चालत आहे तो तुम्हांकडे दरोबस्त इनाम वंशपरंपरे दिल्हा च्यार कलमी कागद.... याप्रमाणे स्वामींनी तुम्हास कुलांत घेऊन राजपुत्र केले."[१]

शाहूच्या पत्नीला – विरूबाईला – फत्तेसिंह मातुश्री समान मानीत असे.[२] पेशव्यांशी या राजाचे संबंधही अत्यंत सलोख्याचे असे होते.

अक्कलकोट घराण्यातील पाचवा राजा, शहाजी दुसरा (१८२८–१८५६) याच्या कारकीर्दीत १८३० साली अक्कलकोट येथे झालेल्या एका बंडाव्याची हकीकत कागद – पत्रांच्या साहाय्याने येथे निवेदन करावयाची आहे.

१८१८–१८५७ हा काल भारतात सर्वत्र असंतोषाचा आणि अस्थिरतेचा गेला. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाल्यास, साताऱ्याचे चतुरसिंगाचे बंड, उमाजीनाईक रामोश्याचे बंड, त्याचे पुत्र तुकाराम आणि महाकाल यांचे बंड, मुसा आणि त्रिंबक खोरे येथील कोळ्यांचे बंड, भिल्लांचे बंड, १८४४ चे कोल्हापूरचे किल्ल्याच्या शिबंद्याचे बंड, सावंतवाडीचे बंड इत्यादी अनेक छोटे मोठे उद्रेक या काळात झाले. १८१८ साली मराठ्यांचे राज्य खालसा झाल्यावर मराठ्यांचे सरदार, शिबंदी यांना पूर्वीसारखे महत्त्व राहिले नाही. कंपनी सरकारने साताऱ्याचे राज्य एका करारान्वये निर्माण केले. साताऱ्याच्या अंकित असलेल्या जहागिरदारांशीही त्यांनी स्वतंत्र तहनामे करारमदार केले. या बदलत्या राजकीय परिस्थितीमुळे कंपनी सरकारावद्दल तर असंतोष निर्माण झाला होताच, पण त्याचबरोबर कंपनी सरकारच्या सल्ल्याप्रमाणे

१. इतिहास संग्रह व. २, अं. ३ पृ.–६, ७.

२. पेशवे दप्तर खंड ८, ले.–४८.

वागणारे स्थानिक राजे यांच्याबद्दलही लोकांच्या मनांत तिरस्काराची भावना निर्माण झाली होती.

२५ सप्टेंबर, १८१९ रोजी साताराचा राजा प्रतापसिंह याने कंपनीशी करार करून ब्रिटिश सरकारची अधिसत्ता मान्य केली होती, आणि स्वतःच्या अधिकारावर, स्वातंत्र्यावर अनेक बंधने लादून घेतली होती. रेसिडेंटच्या पूर्वसंमतीशिवाय आपल्या राज्याबाहेरील व्यक्तीशी कसल्याहि प्रकारचे संबंध ठेवण्याची त्याला मुभा देण्यात आली नव्हती.

मराठी जहागिरदारांचे कंपनी सरकारने तीन वर्ग केले होते.[3] (१) जुने मानकरी : यांत फलटणचे निंबाळकर, जतचे डफळे आणि मुधोळचे घोरपडे यांचा प्रामुख्याने समावेश होता. (२) शिवाजी महाराज आणि त्यांच्या वंशजांच्या कारकीर्दीतील प्रधान, प्रतिनिधी, आंग्रे आणि अक्कलकोटचे राजे हे दुसऱ्या विभागात होते; आणि (३) पेशव्यांनी निर्माण केलेले जहागिरदार तिसऱ्या वर्गात होते.

अक्कलकोटचा राजा फत्तेसिंह दुसरा (१७८९–१८२२) आणि साताऱ्याचा पोलिटिकल एजंट कॅप्टन जेम्स ग्रँट (ग्रँट डफ) यांच्यामध्ये ३ जुलै १८२० रोजी एक तेरा कलमी करार झाला. या करारात कंपनी सरकारतर्फे अक्कलकोटच्या राजाला अभयदान दिले असले तरी या जहागिरीचा मुलूख साताऱ्याच्या राजाच्या प्रदेशात मोडत असल्यामुळे व त्या राजाचे आधिपत्य अक्कलकोटकरांना मान्य असल्यामुळें साताऱ्च्या राजाच्या अंकित जहागिरदार अशी अक्कलकोटची गणना करण्यात आली आहे. या करारातील ११ व्या कलमान्वये ' जोपर्यंत या कराराचे पालन केले जाईल तोपर्यंत या जहागिरीला साताऱ्याकडून कसलाही उपसर्ग होणार नाही ' असे अश्वासन देण्यात आले होते व त्याच्या संरक्षणाची हमी पत्करली होती.[4] कंपनी सरकारशी झालेल्या या कराराला अनुसरून सातारा आणि अक्कलकोट यांच्यामध्ये १४ कलमी करार ११ जुलै १८२० रोजी झाला.

कॅप्टन ग्रँट जोपर्यंत साताऱ्यात होता तोपर्यंत त्याच्या देखरेखीखाली संस्थानिकांशी झालेले हे सर्व करारमदार योग्य रीतीने पाळले जात होते. १८२२ च्या अखेरीस तो साताऱ्याच्या सेवेतून निवृत्त झाला आणि नंतरच्या काळात, पोलिटिकल एजंट, राजा आणि त्याच्या कक्षेतील जहागिरदार यांच्यामध्ये मतभेद होऊ लागले, आणि त्याचे पर्यवसान शेवटी १८३९ मध्ये प्रतापसिंहाच्या पदच्युतीत आणि १८४८ मध्ये साताऱ्याचे राज्य खालसा होण्यात झाले. १८२२ साली कंपनीने प्रतापसिंहाकडे साताऱ्याचा राज्यकारभार सोपविला. सत्तांतराच्या जाहीरनाम्यात राज्यकारभारासंबंधी

3. *History of the Marathas by Grant Duff Ed.* S. M. EDWARDES. *6th Ed. Vol. II pp* 826–28

4. *Treaties Engagements and Sanads Relating to the States within the Bombay Presidency. ed. pp* 155–62.

काय कलमे घालवीत या संबंधी कंपनी सरकार आणि प्रतापसिंह यांच्यामध्ये बरीच विस्तृत चर्चा झाली. प्रतापसिंहाच्या रोजनिशीत या संबंधीच्या बऱ्याच नोंदी आढळतात.[५] जहागिरदार आपल्या वर्चस्वाखाली असावेत अशी कंपनीची भूमिका होती, तर राजाला आपली हुकमत त्यांच्यावर गाजवावयाची होती. "जहागीरदार लहान मोठे वगैरे लोक त्याजकडून हुकुमात तकरार पडल्यास ये विसीचा बंदोबस्त करण्याकरिता माहाराज बंदोबस्त करतील हे सर्व लोकांनी समजोन माहाराज सरकारचे हुकुमा प्रमाणे वागावे"[६] अर्थात् महाराजांची ही सूचना कंपनी सरकारने मानली नाही. हे सारेच प्रकरण कंपनीने संदिग्ध ठेवल्यामुळे परस्परांत आणि पुढे कंपनीशी संघर्षाला प्रारंभ झाला.

फत्तेसिंहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा मालोजी हा १८२२ साली अक्कलकोटच्या गादीवर आला. या काळातच बेबनावाला प्रारंभ झाला होता. रामचंद्र गंगाधर सरसुभेदार हा २२ नोव्हेंबर, १८२५ च्या कैफियतीत लिहितो. "यादी ता. २२ नवंबर सन १८२५ इ"..... मंगळवारी कसबे वणीहून स्वारी निघोन मौजे आंबे पो. नासिक येथे येता वाटेने सरकारचे भालदाराशी व अकलकोटकर यांचे पायदल लोकांशी बोलाचाली होऊन कटकट झाली म्हणोन दुसरे दिवशी प्रातःकाली ता. २३ नवंबरी अंब्यासच ऐकिले नंतर तेथे भोजन करून नासिकाकडे यावयास निघोन गावाबाहेर आलो तो सरकारची स्वारी पूर्वीच निघोन पुढे गेली अकलकोटवर जाग्यावरच तयार आहेत असे पाहिले नंतर पाव कोस पुढे आलो तो रा. बाळासाहेब भोसले व बळवंतराव बक्षी असे दोघेजण घोड्यावर बसोन माघारे येत होते त्याणी मला पाहताच बाळासाहेब मला तुम्ही आमचे बरावर माघारा फिरलो बाळासाहेब बोलिले की अकलकोटकराकडचा मजकूर ऐकिलांत का तेव्हा मी उत्तर केले की कांहींशी कटकट जाली असे ऐकिले होते तेव्हा त्यामुळेच ते अडोन बसले आहेत याजकरिता सरकार आज्ञेप्रमाणे त्यास सांगावयास जातो म्हणून तुम्हास बरोबर घेतले असे म्हणाले नंतर आम्ही तिघे अकलकोटकराचे गोटात गेलो त्याचे लोक तयारच होते आमचे बरावरचे स्वारांस मागेच उभे राहा असे त्यांजकडील लोकांनी सांगितल्यावरून मागेच राहिले आम्ही तिघे आंत गेलो तो बिचोव्याजवळ मालोजीबावा भोसले बसले होते जवळ कुशाबादादा महाडिक होते तेथे गेल्यावर बाळासाहेब मालोजी बाबाजवळ बोलो लागले की मी व बक्षी व कुशाबा दादा ऐसे चौघेही बोलत होतो ते उत्तर करीत होते त्यातील हाशील मिळोन आमचे बोलणे पडत होते की आपण चलावे वेळेचा गुण तुम्ही दुसऱ्या जवळ अडावे सरकारशी आडावे हे ठीक नाही तुम्हास मोठेपणा तरी सरकारापासून तुमची माणसे ही सरकारचीच माणसामाणशी कटकट होतच आहे

५. प्रतापसिंहाची रोजनिशी क्र. ५, पृ. १४६ ते १६१, तारीख १९ ते २७ मार्च, १८२२, पेशवे दप्तर, पुणे.

६. रोजनिशी क्र. ५, पृ. १४९, ता. १९–३–१८२२.

म्हणून तुम्ही सरकारची स्वारी निघोन गेली असता जाग्यावर अडोन बसणे ठीक नाही आपणास घेऊन यावे अशी सरकारची आज्ञा आहे त्या पक्षी कूच करून चलावे इतक्या-वर तुमची मर्जी या अन्वये आम्ही बोलत होतो त्यांचे बोलणे 'महाराजांनी आमचे वकिलास शिव्यागाळी मनस्वी दिल्या श्रीमंत आपासाहेबानी वकिलास गचांड्या दिल्या आमची अब्रू काही राखली नाही वडिलांनी दौलत मिळविली होती परंतु ती आज आमचे कपाळास बुडताती असे आले' असे म्हणाले तेव्हा गळा काही भरून आलासे वाटले व महाराज आम्हापाशी माहालच्या सोडचिठचा मागतील, दौलत घेतील तर सोडचिठचा आज देतो दौलत हवाली करतो आणि जिकडे बनेल तिकडे जाऊ या उपर माहाराजाकडे येण्याची मर्यादा राहिली नाहो. . . ."[७]

अशा संघर्षातच १८२८ साली मालोजीचा अंत झाला आणि त्याचा कॅप्टन ग्रँटनंतर, १८२३ साली कॅप्टन ब्रिग्जची सातान्याचा रेसिडेंट म्हणून नेमणूक झाली. राजा आणि जहागीरदार यांच्यातील कुरबुरी सुरू होत्याच. दसऱ्याचा सण हा मराठ्यांच्या दरबारात महत्त्वाचा मानला जातो. तेव्हा दसऱ्याच्या दरबारासाठी सर्व जहागीरदारांनी साताऱ्यास यावे असा प्रतापसिंहाचा आग्रह होता. पण जहागिरदारांना हे सारे प्रकरण खर्चाचे वाटत होते. या बाबत २३ जुलै १८२६ रोजी ब्रिग्जला लिहलेल्या पत्रात मालोजीने आपली व्यथा व्यक्त केली आहे. त्याच्याबद्दल ब्रिग्जकडे तक्रारी गेल्या होत्या. त्या संदर्भात हे पत्र लिहिले आहे.[८] तो म्हणतो, ' . . . .त्या वेळेस आपण इकडे वकिलांस पाठविले होते की बंदोबस्त करावा परंतु दोन तीन रोजात समजूत निघाली म्हणोन सांगोन पाठविले त्या करिता कंपनी सरकारचे वकिलाचे कारण पडले नाही उपरांतिक अजम च्यापलीन साहेब बहादूर याजकडून आपली याद आली त्याजवरून अश्चर्य वाटले त्यातील पर्याय इकडून लिहिले जाऊन जवाब हाली आला आणि आपल्यासही. . . .हानरीबल गवरनर अलपीष्टन साहेब बाहादूर यांचे पत्र आले तेही पाठविले आहे तरी माहाराज सरकारची चाकरी करून कृपा संपादावी आणि कंपनी सरकारची मर्जी संतोषवावी हे आपणास लिहावे असे नाही. . . .मुख्य आमचा विषम काल त्यास इलाज काय असे ये विसी येथून काय ल्याहावे खटपटीचा पर्याय सर्व आसाहेबाचे ध्यानात आहेच. सरकार शेवा करून कृपा संपादावी म्हणोन लेख त्यास आम्हाकडून या वेळ पर्यंत शेवेत कसूर नाही पुढे ही सर्व प्रकारे हजरच आहोत परंतु आम्हास निभाऊन आमचा आबताब रक्षण करून प्रतीपालन करणे वडील स्वामीकडे आहे."

या पत्रावरून जहागीरदारांची आगतिकता दिसून येते. याच पत्रात दसऱ्यास साताऱ्यास जाण्याबद्दल राजा लिहतो की दसऱ्यास यावयाचे हे काम खर्चाचे आहे

---

७. इतिहास संशोधक **य. न. केळकर**, यांच्या खाजगी संग्रहातून

८. डेक्कन कॉलेज, पारसनीस संग्रह रु. १, फा. ८ : १.

तरी ' दसरा माफ होय तो अर्ज करविला पाहिजे. वडील साहेबाची कृपा व आसा साहेबाची मेहरबानी हेच ईछुन आहोत. "

एखादा रेसिडेंट अथवा गव्हर्नर बदलून गेला म्हणजे त्याच्या जागी येणारा दुसरा माणूस आपल्याशी कसा वागेल याची एक प्रकारची धास्ती या राजांना वाटत असावी. ऑक्टोबर १८२७ मध्ये मुंबईच्या गव्हर्नरपदावरून एलफिन्स्टन निवृत्त झाला आणि या पदाची सूत्रे सर जॉन माल्कमकडे आली. त्याच सुमारास साताऱ्याहून ब्रिगजही गेला आणि कर्नल रॉबर्टसनची पोलिटिकल एजंट म्हणून नेमणूक झाली. ५ डिसेंबर १८२८ रोजी माल्कमला उद्देशून लिहिलेले पत्र या राजे लोकांची मनोभूमिका यथार्थपणे व्यक्त करणारे आहे.

' दिगर रसीदंट रबीसन साहेब बहादुर येथे कामावर आले ते समई यांचे खातरीविसी अलपीष्टण साहेब बहादुर याणी बहुत प्रकारे इकडील सरकारात पत्र पाठविले होते व ग्राट साहेब याणीहि खातरी केली होती त्याहीपेक्षा राबीसन साहेब बाहादुर याणी इनसाफ व माहालमुलुक प्रकर्ण सुधा पाहून इकडील सरकारचा बहुत बोज राखून व कार्यात कायमगिरी व सबुरी अशी वागणूक केली व करीत आहेत अैसीयास याच प्रकारे पुढे कोणी रसीदेंट या सरकारांत येनील ते असे वाकबगार यावेत या प्रो यादी लिहून कंपिणी सरकारानी बुकास बार करून ठेवावी म्हणजे कोणी येईल तो बुकास पाहून वागणूक ठेवीत जाईल व गोरनर साहेब बहुत असाच वाकबगार पाहून रवाना करीत जातील सबब लिहिले आहे "[९]

अर्थात् कंपनीचे अधिकारी आपल्या ताब्यात असलेल्या मुलुखातील व्यक्ती व घटना या संबंधीचे गोपनीय अहवाल वारंवार करीत असतच त्यामुळे नवीन येणाऱ्या माणलाला या अहवालांच्या अवलोकनामुळे आपल्या प्रदेशाची, तेथील व्यक्ती व घटना यांची पूर्ण कल्पना असे.

राजा, जहागीरदार आणि कंपनी असा हा संघर्ष चालू होता. अशातच मालोजीचा अंत झाला आणि त्याचा अल्पवयीन मुलगा शहाजी दुसरा (१८२८–१८५६) गादीवर आला. मालोजीची पत्नी तुळजाबाई प्रारंभीच्या काळात राजकुमार शहाजी दुसरा आणि फत्तेसिंह या आपल्या दोन मुलांचा प्रतिपाळ करीत होती. १८२० च्या करारा-प्रमाणे, अक्कलकोटचा राजा अल्पवयीन असल्यामुळे तेथील राज्यकारभाराची सारी व्यवस्था ही स्वाभाविकच सातारकरांच्याकडे १८२८ साली आली. परंतु सातारकरांची व्यवस्था स्थानिक वतनदार आणि इनामदार यांना पसंत पडली नाही. बोरगावच्या शंकरराव सरदेशमुखाच्या नेतृत्वाखाली असंतोषाला वाचा फुटली आणि १८३० साली प्रतापसिंहाच्या राजवटी विरुद्ध बंड पुकारण्यात आले. बंडवाल्यांनी अक्कलकोटचा बालराजा शहाजी दुसरा यास अटक करून किल्ला व गाव आपल्या ताब्यात घेतला.

---

९. पारसनीस संग्रह क्र. १. फा. ८ : १९ ता. ५–१२–१८२८.

राज्यात शांतता निर्माण करण्याची जबाबदारी सातारकरांची असल्यामुळे कंपनी सरकार व सातारकर यांच्या संयुक्त फौजा अक्कलकोटच्या सीमेवर येऊन दाखल झाल्या. या फौजांना स्थानिक बंडवाल्यांनी चांगलाच विरोध केला. १० जुलै १८३० रोजी बंडवाले आणि सरकारी फौजा यांच्यांत छोटीशी लढाई झाली आणि तीत कंपनी सरकारचा प्टन एडमंड कॅस्पॅरो हा घायाळ झाला आणि पुढे लगेच मरण पावला. कर्नल रॉबर्टसन हा त्यावेळी साताराचा रेसिडेंट होता. नव्या राजवाड्याच्या रस्त्यावर एका बाजूस रॉबर्टसनने स्पॅरोचे थडगे बांधले. हे बंड अगदी अल्पकाळात आटोक्यात आणले, आणि बंडाची कारणे शोधणे व अक्कलकोटची व्यवस्था पाहण्याकरिता कॅप्टन जेम्सनची नियुक्ती करण्यात आली.

या बंडासंबंधी जी पत्रे उपलब्ध आहेत त्यावरून बंडाची कारणे, बंडाचा देखावा आणि बीमोड या संबंधीची बरीच माहिती मिळते. डेक्कन कॉलेजातील पारसनीस संग्रहातील सातारा दप्तर, भारत इतिहास संशोधक मंडळातील साताऱ्याचे कागद, इतिहास संशोधक श्री. य. न. केळकर यांच्याकडे असलेले कागद या साधना-वरून हे प्रकरण मांडणे शक्य झाले आहे.

बंडाचा उद्रेक १० जुलै १८३० रोजी झाला असला तरी हे प्रकरण बरेच दिवस धुमसत होते. राजमाता तुळजाबाई भोसले यांनी ३० जून १८३० रोजी मुंबईचा गव्हर्नर मालकम यास लिहिलेल्या पत्रावरून अक्कलकोट येथील परिस्थिती आणि बंडाची पार्श्वभूमी यांची कल्पना येते.[१०]

"साहेब मुषफक मेहरबा करम फर्माये दोस्ता मेजर जनराल सर ज्यान मालकम साहेब गवरनर बाहादुर दाम अलतापहु अजी सो. बा. तुलजाबाई भोसली सलाम बाजे तसलाम आकी येथील खैरयेत जाणून आपले कडील खैरयेत हरहमेशा खत पाठवून दिल आराम करवीला पाहिजे दिगर मजमुन माहाराज सरकारातून दौलतीचे बंदोबस्तास कामगार ठेविले त्याचे हातून आमचे सांप्रदायानरूप बंदोबस्त केला नाही साहेब चिरंजीव राजश्री येशवंत भोसले व कृष्णाजी भो व पिराजी भो यांस मुंबईस पाठविले दीडवर्षे जाले तो याणी इकडे तोफा फोडील्या व कोटी व पागा व सेरी व भांडी वगैरेची लिलाव केला व जनानखान्यातील खाशाची असीला त्याही बाहेर काढिल्या तेव्हा अबरू राहिलीच नाही याकरिता जो मजकूर होत गेल तो येथून चिरंजिवास लेहून आसाहेबास जाहीर व्हावया करिता येथील लिहिले गेले हे सातारकराकडील कामगार याणी नवीन सिबंदी ठेऊन येथील भो वगैरे मंडळीस बेड्या घालून मारहाण करून अबरू घेतली तेव्हा संकट समये जाणून चिरंजिवास मुंबईहून आणून त्याजकडील कामगारास कामातून काढीले हे त्याणी माहाराज सरकारात

१०. पारसनीस संग्रह, रु. १, फा. ८ : ५ ता. ३० जून १८३०.

गैर समजाऊन फौज रवाना जाली परंतु परस्पर खटल्यास कारण पडेल यास्तव आसाहेबास अर्ज लिहिला आहे तरी याच्या बंदोबस्ताविसी तिकडे हुकुम व्हावा मजला आसाहेब यानी हुजूर पुण्यास येण्याविसी हुकुम आला असता चिरंजीव सुद्धा येऊन हजर होईन सारा सरंजाम अबरूपेक्षा दौलतीची आस्ता नाही जमीदार याणी बंड केले म्हणोन गैर समजाविले परंतु हक पोटगी बंद केली सबब परागंदा होते ते हाली त्रिवर्ग जमेदाराची खातरी करून कसल्यास आणिले इकडील संवस्थानचे अगत्य पूर्वीपासून आसाहेबास आहेच व्रडिल साहेबाचे चालविले याजप्रो माझे चालवणे साहेबाकडे आहे हरवक्त खत खतुत पाठवून दिल आराम करीत असावे रवाना छ ८ मोहरम ज्यादा काये लिहिणे प्यार मोहबत असो दीजे ही किताबत"

वरील पत्रावरून अक्कलकोटात उठाव का झाला याची कल्पना येईल. बंडवाल्यांचा रोख सातारकरांचे अत्याचारी कामगारांवर होता. त्यांची अक्कलकोटकराबद्दल तक्रार नव्हती. कदाचित् या बंडास राजमातेचे देखील अंतस्थपणे सहाय्य असावे. कारण यात "जमीदार याणी बंड केले म्हणोन गैर समजाविले परंतु हक पोटगी बंद केली सबब परागंदा होते" असे म्हटले आहे. तसेच हे पत्र बार करावयाचे नाही असे 'श्री' कारापाशी लिहिले आहे. आणि पत्राच्या दुसऱ्या टोकावर "श्रीकारापाशी लिहिल्यावरून बार केले नाही" असा शेरा मारला आहे. हे पत्र मालकमला १५ दिवसांनी म्हणजे १३ जुलैला मिळाले. परंतु तोपर्यंत बंड संपुष्टात आले होते.

१० जुलै रोजी कर्नल अर्चीबाल्ड रॉबर्टसन याने प्रतापसिंहाला पत्र लिहिले आहे.[११] तो म्हणतो, "दरीविला अक्कलकोटचे प्रकर्ण कसे आहे ते पाहावे अगर बनल्यास इलाजहि करावा याज करिता सोलापूराहून सोलापूरचे लस्करसुधा कुच करून आज प्रातःकाली मेहरबा दिनकरराव मोहिते हंबीराव सेनाकर्ते या सुद्धा अक्कलकोटास दाखल जालो अकलकोटा बाहेर उभे राहून पाहत असता अकलकोटातील कितेक लोकाचा देखावा बाहेर दिसला त्याजकडे महाराज सरकारचे स्वार याणी जाऊन दाहा पंधरा असामी त्याजकडील ठार केल्या व दुसरीकडे काही लोक दिसले त्याजवर सोलापूरचे तुरप स्वार गेले होते त्यास त्या तुरपातील सरदार कपतान ईस्वारल साहेब बहादुर यास गोळीची जखम भारी लागली आहे माहाराज सरकारचे स्वारा पो आठदहा आसामी जखमी व तीन असामी ठार व दोन तीन घोडी जाया जाली असे जाले ते गोली वाजवितात त्यापेक्षा तूर्त उगीच हला करून माणूस इकडील तिकडील जाया करवावे हे रीत नाही सबब येथे मुकाम करून दस्तुर माफक जसे युक्त दिसेल तसे करावयास येईल माहाराजाकडील स्वारानी कामकाज चांगले केले व दिनकरराव नानाही बहुत हुशारी व तरतूद फार चांगली ठेवितात."

---

११. पारसनीस संग्रह, रु. १, फा ८ : २२

महाराजातर्फे सैन्याचे नेतृत्व हंबीरराव सेनाकर्ते दिनकरराव मोहिते करीत होते. १० जुलैचा वृत्तांत त्यांनीही महाराजांना कळविला आहे.[१२] या सविस्तर वृत्तावरून दोन्ही पक्षांत झालेल्या चकमकी, उभयतांचे झालेले नुकसान, अक्कलकोटच्या परिसरात निर्माण झालेली घबराहट याची योग्य ती कल्पना येते. हे पत्र पुढील-प्रमाणे आहे.

सेवेसी विनंती शेवक दिनकरराव मोहिते हंबीरराव सेनाकर्ते याणी चरणावर मस्तक ठेवून कृतानेक विज्ञापना तागाइत छ २१ मोहरम मुक्काम तारीख १० जुलई सन १८३० इसवी शनवार व आदीतवार प्रात:काळ ६ घटका दिवस पर्यंत मुक्काम लस्कर नजीक अक्कलकोट येथे स्वामीचे कृपे यथास्थित आहे. काल शुक्रवारी आवशीचे सहा घटका रात्री साहेब लोकाकडील सरंजाम दोन तुरुपाच्या तोफा व दोनशे तुरक (प) व पलटणचे सिपाई ८०० याप्रमाणे व हुद्देदार साहेब लोक व रसीदंत व सरकारी सरंजाम सुद्धा सोलापुराहून कूच करून जेवावयास करनले येथे आलो तेथे अक्कलकोटकराकडील ठाण्यात लोक होते सबब पावकोसाचे छटचाने आलो तलाव्याचे स्वार गावाजवळ गेले त्याजवर गोळचा टाकिल्या त्यात मोगलाई परेसी स्वार सरकारी होते त्यापैकी सेख अप्पा नाईक स्वार याचे घोडीचे पायास जिवाळी गोळी लागली नंतर अक्कलकोट नजीक आलो तो बातमी आली की सरदेशमुख व देशमुख याचे खटले वायकामुले जातात कळले त्याजवरून साहेबास खबर दिल्ही तेव्हा साहेबानी पंचवीस स्वार पाठवून खटले धरुन आणावे सांगितले त्याजवरुन परेसी स्वार पंचवीस व राजश्री राव मानसिंगराव भोसले तफेदार माहादेवकर यास पाठविले त्यास खटले मोरच्याचे वाहोर निघाले होते ते अक्कलकोटकराकडील याणी आणवून खटले किल्यात घेतले सबब हे स्वार मोरच्यावर चालून जाऊन त्यांतील काही आसामी जाया करून तेथील मोर्चावरील लोक यास वेशीपर्यंत पिटीत स्वार व मानसिंगराव वेशीत जाऊन आले स्वार थोडे व वेस त्याणी जलद लावून वरून गोळचा टाकिल्या तेव्हा इकडील स्वारातील दौलतराव शिंदे नाईक याचे घोडीस गोळी लागोन मेली. स्वार कायम बापू सिंदे नाईक याचे घोडीस दोन गोळचा लागल्या परंतु घोडी हा वेळ कायम व स्वार शाबूद व दोन आसामीची घोडी पडली ते स्वार यास काढोन परत घेऊन आले नंतर पुन्हा अक्कलकोटकराकडील लोक मोर्च्यास आले ते रोखोन राखण्याकरिता रसीदंड साहेब याणी जफ्ता (?) पाठवावे सांगितल्यावरून परेसी मोगलाई रिसाला व सारे हुद्देदार मानकरी लोक व बक्षीसुद्धा पाठविले त्याजवर ते चालून आले व बार टाकल्यावर स्वार व मानकरी हुद्देदार मंडळीने कसूर न करिता वाढून (चालून) पेठेपर्यंत गेले तेव्हा अक्कलकोटकराकडील स्वार व पायदळचे वीस आसामी जाया व जखमी केले व पेठेस आग दिल्ही आणि तसेच वेशीपर्यंत उठावणी केली. त्या उठावणींत सरकारी स्वार ठार व मीर आमद आली

---

१२. भा. इ. सं. मं. सातारा दप्तर प. क्र. ९

व त्रिंबकराव शेवाळे नाईक व मानाजी घाटगे हे मेले त्यापैकी एक मुडदा मानाजी घाटगे याचा घोडी समवेत आणिला बाकी दोन घोडी समवेत आसामी याचा ठिकाण नाही. दिंडीतून आत गेले किंवा वेशीत पडले याचे घोडीचाही ठिकाण नाही बाकी जखमी जाहले ते श्रीपतराव धायगुडे यास गोळीची जखम गालास लागली व गणपतराव होनराव निमणीकर यास गोळीच्या जखमा दोन कपाळावर व कुशीस व त्याचे घोडीस तरवारीची जखम व रामजी घुले यास भाल्याची जखम याप्रमाणे लागल्या त्याच्या गोळ्या काढून जखमा बांधविल्यानंतर रसीदंट व जाम्ही सरंजामसुद्धा नजीक गेलो आम्हावर व साहेबाचे तुरूप पायदळ याजवर तोफा डागल्या व गोळ्या मारिल्या त्यांत तुरूपाकडील दोन टोळ्याचे दोन कमानीन साहेब सोलापूराहून आले त्यापैकी एक कमानीन कपतान साहेबास गोळी लागली नाजुक जागी बचेल असे वाटत नाही व गोळी निघाली नाही व एक त्याजकडील तुरूप स्वार यास गोळी लागली तो बचेल असे वाटते नंतर मोरेचे व तोफा लावावयास जागा पाहण्यास रसीडंट व आम्ही व आम्हाबरोबर चिटणीस व निंबाजी भोसला वगैरे पाच चार मंडळी एक दोन वेळा गेलो मोर्च्यात येताच गोळे डागिले (?) ते साहेबसुद्धा आम्हापाशी नजीक येवून पडला परंतु स्वामी कृपेकरून कोणी जाया जाहले नाही नंतर तिसरा प्रहर जाहला सारे रात्र माणसे चालून आले परंतु रसीडंट याचे मनांत तोफा चालू करून पलटणची हल्ला करावी थोरली तोफ आणविली तीही उद्यां येऊन पोचेल व आणीक पलटणे येणार साहेब याणी आपलेकडून प्रथम जलदी तोफेची वगैरे न केली त्याणीच प्रारंभ केला आता यापुढे निभाव निघणे समजतच आहे सरकारी कामगार हुजूरचे येकंदर काल त्याणी किल्यातून वस्त्रपात्र, चीजवस्तसुद्धा घेऊन घालविले ते आज येऊन मंडळी पोचली उद्यां जे वर्तमान होईल ते शेवेसी विनंती लिहीन. आज मोगलाई परसी स्वार व हुदेदार याणी उठावणी चांगली केली जखमी याचा बंदोबस्त ठेविला आहे. रात्री पाऊस फारच पडला परंतु हुशारी रात्री ठेवली सारे रात्र सारे तयार राहिलो घोडे माणूस पावसामुळे ताठले गेले. रॉबिन्सन साहेब याणी सांगिलले की थोर तोफ जी मोठे गोळ्याची दिवालतोड असेल ती गोळे सामान समेत जलद जलद पाठवून द्यावी काल दौलतखान रिसालदार याणी दक्षणचे दरवाजाकडे उठावणी तुरूपाची चांगली केली. त्याजवर गोळे टाकले ते नजीक पडले परंतु कोणी जाया जाहले नाही नंतर रिसालदार याणी उत्तरेचे बाजूनी पूर्वेकडे मोर्चा देवळांत होता त्याजवर जंबुरा चालू करून मोर्चा उठविला. चांगले काम दौलतखान रिसालदार व हुद्देदार याणी केले परंतु सरकारी किंवा इंग्रजी तोफ काल केली नाही व आजही तयार होऊन जावयाचा बेत नाही कारण सरंजाम त्याणी आणविला तो आलियावर सुरूवात करणार साहेबाकडील तुरूप साहा जखमी जाहाले त्यांत येक ठार झाला. येक आज तुरूप किल्यातून जखमी परत साहेबाकडे पाठविला आपले कडील दोनी स्वार जखमी आत कायम आहेत पाठविले नाहीत. मिर्जाअली हकीम यानी इकडील व साहेबाकडील जखम्या सुद्धा गोळ्या काढल्या, जखमा बांधिल्या. चांगले काम केले

दारूचे कारतुस जंगी व तोडे हे सामान कम याजकरिता सरकार या वेळेस जितकी सरंजामाची पुरवणी जलद पोहोचण्याची करतील ती थोडी आहे. दारूगोली तोडा इकडे खरेदी मिळत नाही सबब सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

११ जुलै १८३० च्या पत्रात कर्नल रॉबर्टसन लिहितो,[१३] "दरीविला येथून सातारियात छावणीत करणेल राबीसनसाहेब बहादुर आहेत त्यास लिहिले आहे की, मोरच्याचे कामाजोग्या तोफा दोन नव्या थोर छयावणीत असतील त्या दारूगोला सरजाम सुद्धा सातारियाहून अकलकोटास जलद रवाना करून द्याव्या व गरनाळही असली तरी तीही सरजामसुधा त्या समागमे रवाना करून द्यावी समागमे कंपनीचे सीपाई २०० दोनसे व आयसोा (?) वगैरे गोलदाज मडली आहेती तीही रवाना करावी व समागमे हाती सुमार २ पाहिजेत ते माहाराज सरकारचे घेऊन रवाना करावे व आणखी काये मदत पाहिजे ते ही माहाराज सरकारातून होईल म्हणोन राबीसन साहेब यास इकडून लिहिले आहे. त्यास तोफा लस्करचे छावणीत असल्यास रवाना करतील त्यास समागमे दोन हाती माहाराज सरकारातून देऊन व आणखी काये बहुतसी मदत होईल तितकी माहाराज सरकारातून जाली पाहिजे कदाचित् त्याजवल थोर तोफा नसल्यास किल्यावर तोफा थोर दोन आहेत त्या जलदीने सातारीयाचे किल्ल्याखाली उतरून त्यासमधे दारूगोल्याचे सामान जे असेल ते सुधा व दोन हाती समागमे देऊन माहाराज सरकारातून रवाना व्हाव्या त्या तोफास दारूगोला काही कमी असेल यास्तव त्या फर्म्याचे गोले व दारू वगैरे विसी राबीसन साहेब बहादुर यास महाराज सरकारातून कलविले म्हणजे त्या प्रो गोले वगैरे लस्कर पो काहाडून देतील......आणखी राबीसनसाहेब यास इकडून लिहिले आहे की नगराहून थोर तोफा रवाना व्हाव्या म्हणोन पेशजी येथून लिहिले गेले आहे कदाचित् तिकडून तोफा रवाना जाहाल्या असल्यास सातारियांतील तोफा रवाना करू नये म्हणोन परभारे तुम्हास पुण्याहून लिहिले जलदीने येईल मग सातारियाच्या तोफा रवाना करावयाची जरूरी नाही सिपाई मात्र दोनसे पाठवावे असे लिहिले आहे......"[१४]

बंडाचा भडका कदाचित् अधिक उडेल अशी भीती वाटत असल्यामुळे कंपनी सरकारने संरक्षणाची योग्य ती दक्षता घेतली होती हे वरील पत्रावरून दिसून येते. सातारा आणि अहमदनगर या दोन्ही ठिकाणांहून तोफा मागविल्या आहेत. जेथून मदत लौकर येईल तेथून ती त्यांना हवी होती.

१२ जुलैपर्यंत अक्कलकोटची परिस्थिती काबूत आली असावी. कारण १३ जुलैच्या तुळजाबाई भोसले यांना लिहिलेल्या मालकमच्या पत्रात अक्कलकोटप्रकरणी काढलेल्या जाहीरनाम्याचा उल्लेख आहे. तुळजाबाईने ३० जूनला जे पत्र लिहिले होते

१३. पारसनीस संग्रह रु. १, फा ८ : १३. ता. ११ जुलै, १८३०

१४. पारसनीस संग्रह : रु. १, फा ८ : ६.

त्या पत्राच्या उत्तरात मालकम लिहितो, "तुम्ही छ ८ मोहरमचे पत्र रवाना केलेते आज प्रातःकाली पंधरा रोजानंतर पोहचले तेव्हापासून खराब व फिसादी लोक याणी आपल्यास व आपले पुत्रास त्याणी आपले खराब व मतलबात पाडिले त्याजवरून आजचे तेरिखेचे जाहीरनामा सादर केला त्याची नकल तुम्हास मालुम होण्याकरिता मलफुफे केली आहे त्यास जाहीरनाम्याप्रमाणे जलदीने कबूल करावे नाही तरी अकलकोटचे संस्थानाची खराबी होईल जाहीरनामा आपल्यास पोहचल्यावर आपण व आपले पुत्र करनेल राबटसन साहेब बाहादर याजकडून हुकुम होईल त्या प्रो निखालस वागावे साहेब मवसुफ यास आमचे तर्फेने कुल मुखत्यारी दिल्ही असे अपले पुत्रास आमचे मुलाकतीस पाठवावयाची मर्जी असल्यास त्याचाही बंदोबस्त साहेब मवसुफ करतील आपला जो मजकूर असेल तो आम्ही ऐकून घेऊन त्याचा बंदोबस्त करून द्यावयास येईल परंतु ही मेहरवानी व अहेसान आपण जलदीने कंपणी सरकारसी रूजु जाहाल्यास करावयाचा आहे यानंतर खटले वाढलियास आपण व आपले कुटुंबाचे व हाली अकलकोटास लोक आहेत त्याची खराबी होईल व आपले कडून दुसरे खतखतुत आम्ही घेणार नाही व जवाब सवालही व्हावयाचा नाही व बरदास्त व अहेसान होणार नाही त्यास जलदीने कंपनी सरकारासी रुजू राहून त्या सरकारचे मर्जीवर कायम राहावे."

कंपनीच्या ताठर धोरणाचा या पत्रावरून चांगलाच प्रत्यय येतो. कसल्याही प्रकारची बंडाली अथवा असंतोष कंपनीला सहन होण्यासारखा नव्हता. कंपनीने ही कारवाई सातान्यावरील प्रेमामुळे केली असे म्हणता येणार नाही. कारण सातारकराबरोबरचे संबंधही बिघडत चालले होते. पण बंडाचा बीमोड करण्याच्या कामी मात्र कंपनी सातारकराच्या पाठीशी उभी होती. अक्कलकोटकराबरोबर झालेल्या स्वतंत्र कराराचा कंपनीला विसर पडलेला दिसतो. कारण उपलब्ध कागदपत्रावरून अक्कलकोटकरांच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार केलेला दिसत नाही. उलट कंपनी सरकारशी जलदीने रूजू झाला नाही तर तुमचे काहीही म्हणणे आम्ही ऐकून घेणार नाही; आपले व आपल्या कुटुंबाचे नुकसान झाल्यास त्यास आम्ही जबाबदार राहणार नाही असे स्पष्टपणे कळविले आहे.

१३ जुलैच्या पत्राची प्रत कंपनीचा सेनापती कर्नल अर्चीबाल्ड रॉबर्टसन याच्याकडेही गेली असणार आणि तुळजाबाईने आपण हजर होऊ असे त्याला कळविले असणार. कारण २० जुलैच्या आपल्या तुळजाबाईस लिहिलेल्या पत्रात[१५] तो म्हणतो, "चिरंजीव सुधा निघोन म्हणोन लिहिले ते कळले त्यास बहुत चांगले आहे अैश्यास गवरनर साहेब बहादुर याचे पत्रा प्रो जलदी करावे केवल दाहा दिवसाचे मुदतीचीच वाट पाहू नये आम्ही वाट पाहातो की ज्याणी किल्ल्यात लोक जमा केले त्याणी जलदीने किला खाली करावा आणि त्या मंडळीस घेऊन चिरंजीवास

१५. पारसनीस संग्रह रु १ फा ८ : ८.

घेऊन जलदीने आपण यावे जसे गवरनर साहेब याणी लिहिले आहे त्याप्रो होईल."

कंपनी सरकारच्या हवाली होण्याखेरीज तुळजाबाईपुढे अन्य मार्ग नव्हता. परंतु सोलापूर नजीक वळसंग येथे तळ ठोकून बसलेल्या रॉबीनसन रेसिडेंटाला मात्र मालकमने आपल्या पत्राची दखल घेतली नाही याची ती जाणीव करून देते. ती लिहिते.[१६] "आ साहेबाकडून ता। १६ जुलईचे खत पाठविले ते व गवरनर साहेब याजकडील जाहीरनामा व आमचे नावे पत्र पाठविले ते पावले गवरनर साहेब यास पेशजी आम्ही छ ८ मोहरमचे खत पाठविले ते पावले म्हणोन गवरनर साहेब लिहितात पत्रातील आमच्या मजकुराचा जवाब न लिहिता आसाहेबाचे हुकुमाप्रपाणे वागावे म्हणून हुकुम त्यास साहेबाचे म्हणणे की कबुली करून जे बोलणे असेल ते आम्हांजवळ बोलावे अथवा गवरनर साहेब याजपासी बोलावे समजून घेऊन करणे ते करावे. ....चिरंजीव सुद्धा किला सोडून निघोन येतो मर्जीस येईल तसा बंदोबस्त राखावा"

११ जुलैलाच युद्धबंदी झाली, परंतु ही वार्ता १४ तारखेपर्यंत साताऱ्यास पोहोचलेली दिसत नाही. कारण १० जुलैच्या पत्रांना उत्तरे १४ जुलै रोजी साताऱ्याहून लिहिली गेली आहेत. गव्हर्नरला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.[१७] करनल रॉबींसन साहेब बहादुर रसीदट सोलापुरास जाऊन अकलकोटकर यास बहुत तरेने सांगून पाठविले परंतु त्याचे दिलात न आल्यामुळे अकलकोटास सोलापुरने सरंजाम घेऊन व इकडील सरंजाम दिनकरराव मोहिते हंबीराव सेनाकर्ते यास लढाऊ सरंजाम देऊन पो होते ....थोर तोफा आणखी सरंजाम आणऊन नंतर लढाई सुरूवात करावी येसा बेत आहे म्हणून रसीदंट साहेब याचे खत आले त्याणीही आसाहेबास सर्व मार लिहिला असेल सेनाकर्ते याणी लिहिले की आणखी सरंजाम पाठवावा त्यास उत्तर गेले की सरंजाम आणखी पाठवण्यास इकडे नाही तुम्हास लागेल तो रसीडंट साहबापासून घ्यावा त्यास सर्व मार साहेबास जाहीर व्हावा म्हणून लि॥ आहे साहेबास सर्व बंदोबस्त ठेवणे असेल तसा ठेवीतीलच सर्व साहेबाकडेसच आहे रसीदट साहेब येथे नाहीत सबब जलद खबर कलावी म्हणून लि॥ आहे."

रेसिडेंटलाही साताऱ्याहून १४ जुलै रोजी पत्र गेले असून त्यात सेनाकर्तेकडून आलेल्या पत्रातील[१८] हकीकत सांगून म्हटले आहे. "१. तोफा दोन दिवाळतोड पाठवून द्याव्या म्हणून लिहिले त्यांस तोफा आहेत परंतु बैल व दारूगोळ्याची तयारी नाही.

---

१६. पारसनीस संग्रह रु. १, फा. ८ : ९ ता २०।७।१८३०

१७. पारसनीस संग्रह रु. १, फा. ५ क्र. ७.

१८. भा. इ. सं. मं. सातारा दप्तर

२ शिबंदी आसामी ४०० दारूगोळी सुद्धा पाठवावे म्हणोन लिहिले त्यास येथून लोक जेव्हा गेले ते वेळेसच साहेबास विचारून चौकी पहाऱ्यास ४।५ शे ठेविले याजकरिता पाठविणे ते नवीन पाठवावे तरी ना उपयोगी आयते वेळेचे उपयोग नाही व चोराचे बंदोबस्ताबद्दल स्वार शिबंदी ठेवावयाची तीही अद्यापी ठेविली नाही सबब साहेबानी आपला सरंजाम पोक्त आणवून करणे ते करावे. तूर्त नाकेबंदी चांगले करून त्याचे मारक्यात न जाता हुशारी राहील असे करावे आम्हाकडील लोकास दारूगोळी नसल्यास आपलेकडून देववून बंदोबस्त ठेविला पाहिजे इकडून पुरवणी होणे ती साहेबास ज्याहीरच आहे. इकडील लोकापासील बंदुकीचा उपयोग नसल्यास साहेबानी आपले कडील देवाव्या इकडील सर्व बंदोबस्त ठेवणे आसाहेबाकडे आहे वारंवार काय लिहावे सेनापती व सरलष्कर यास सरंजामाचा मजकूर पुसला त्याणी सांगितल्यावरून लिहिले व सेनाकर्तेही सर्व माहीत आहेत ते सर्व बोलतील.

३. येथून घोडी ३१ तेथे स्वारांची पडली त्यास देण्याकरिता लागतील ती पाठविली आहेत व बाण ४४ व कारतूस ३००० दिनकरराब मोहिते याजकडे पाठविले आहेत व बाण व गरनाळीचे गोळे टाकणे ते आतील दारूखान्याची जागा जानराव शिर्के व आतील मंडळी आली त्यास माहीत आहे.

४. सदरहू मजकूर आसाहेबानी इकडे लिहिला तो मजकूर गवरनर साहेबास आपलेकडून कळवण्यास वेळ लागेल सबब जलदीने इकडून लिहून पाठविले आहे."

हे पत्र अत्यंत बोलके आहे. बंडाचा बीमोड करण्याची ताकद एकट्या सातारकरांच्यांत नव्हती हे यावरून दिसतेच, पण 'इकडील सर्व बंदोबस्त ठेवणे आसाहेबाकडे आहे' या कबुलीवरून सातारकर सर्वस्वी कंपनी सरकारावर कसे अवलंबून होते याची कल्पना येते. कंपनी सरकारचे सहाय्य नसते तर जहागीरदाराला शासन करणे सातारकरांना शक्य झाले असते का ? सैन्याची तयारी केली आहे त्यावरून अक्कलकोटचे वंड हे सामान्य स्वरूपाचे असावे असे वाटत नाही.

१६ जुलैला दिनकराव मोहित्यांनी प्रतापसिंहाला वृत्तांत धाडला तो त्यास २० जुलैला पोहोचला. त्यातील मजकुराची कलमे पुढील प्रमाणे होती.[१९]

१. मौजे वडगाव परगणे सोलापूर येथून कूच करून आज दोन प्रहरा मुकाम मजकुरी मेहरबान रॉबर्टसन साहेब बहादुर सुद्धा पावलो.

२. रसीडंट रॉबिन्सन साहेब याची प्रकृत कालपासून काही थोडी मांदी आहे श्रम मेहनत फार पडली सबब.

३. शहाजी भोसले कालच मुकामास सोलापूरास आले.

४. हरीपंतास साहेब आज बलाऊन सांगितले की किल्यातून दास्तानपैकी जवाहीर वगैरे नक्त सुद्धा काय आणले असेल ते आम्हापासी आणावे आम्ही चार साहेब लोक बसून मोजदाद करू त्याजवरून हरीपंत बोलले त्यास नित्य खर्चास पाहिजे त्याचे उत्तर केले की किबे येऊन खर्चाची याद करतील आणि त्याप्रमाणे देऊ असे सांगितले ये विसी काल मी विनंती लिहिलीच होती....

---

१९. भा. इ. सं. मं. सातारा दप्तर. पत्र. २४

५ फंदवाली मंडळीपासून उद्या लेहून घेऊन नंतर निराळी ठेवितो असे बोलिले.

६. सिनाप्पा भाऊस आज भेटविले साहेबास तेही बेडी घातल्याचा वगैरे आहवाल बोलून नंतर माहाराज सरकारानी वेवस्था केली त्यांत भोसल्याचे फार कल्याण केले होते मी पूर्वीपासून दौलतीचा वाकबगार असेही पेशजी कधीच झाले नव्हते परंतु सोदे मंडळीनी दौलत खराबीत आणली असे बोलले.

७. सरंजाम व तोफा वगैरे परत पाठवावयाचे ते पाहून परवाचे दिवशी रवाना करून देतो ही विज्ञापना."

१० जुलैच्या बंडाचा दुसऱ्याच दिवशी मोड करून सोलापूरकडे परतत असताना वाटेतूनच महाराजांना हे पत्र लिहिले आहे. बंडाचा मोड झाल्यानंतर काय घडले याची सविस्तर माहिती या पत्रात आहे.

जाहीरनाम्याप्रमाणे शहाजी भोसले १५ जुलैसच रेसिडेंटाला जाऊन मिळालेला दिसतो. हरीपंत ह्या अकलकोटकरांच्या किल्यावरील अधिकाऱ्याला किल्यावरून ज सामान आणले असेल ते सरकार हवाली करावे अशी आज्ञा दिली आहे. बऱ्याच बंडखोरांना पकडून आणले असावे असे दिसते. सिन्नप्पा हा देखील एक बंडवाला जमीनदार पण त्याच्याकडून येथे वदवून घेतले आहे की सातारकरांनी भोसल्यांची उत्तम व्यवस्था ठेवली होती, परंतु काही 'सोदे' मंडळीनी बंड पुकारून दौलतीचे नुकसान केले. या पत्रावरून बंडाचा पुरता मोड १६ जुलै पर्यंत झाला होता असे दिसते. कारण सर्व सरंजाम व तोफा १।२ दिवसांत परत पाठवतो असे सेनाकर्ते म्हणतो.

नीलकंठ शेषाद्री हा सातारकरांचा कारकून अक्कलकोटकरांच्या दरबारी होता. अक्कलकोटकरांच्या हालचालीवर देखरेख ठेवणे, ते साहेबापाशी परस्पर काय बोलतात त्यावर नजर ठेवणे व सर्व वृत्त साताऱ्यास कळविले आहे. बाळाजीपंत नातू हा ग्रँट डफच्या काळातच सातारा सोडून गेला होता. पण अद्याप तो कंपनी सरकारच्या चाकरीत होता. जहागिरदार आणि राजा यांचे संबंध कशाप्रकारचे होते याची त्याला कल्पना होती आणि म्हणूनच तडजोडीच्या कामी कंपनीसरकारने त्याची नियुक्ती केली असावी. सातारकरांची पुढील दोन्ही पत्रे उद्बोधक आहेत[२०].

"राजश्री नीलकंठ शेषाद्री कारकून नि॥ अकलकोटकर भोसले यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री दिनकरराव मोहिते सेनाकर्ते याचे विनंतिपत्र आले त्यात अकलकोटकर भोसले याजकडील लबाड मंडळी तेथे साहेबासी हस्ते परहस्ते बोलत असतील त्याजवर नजर ठेवणे विसी राजश्री बाळाजीपंत नातूस लिहिले त्याजवरून बाळाजीपंत नातूस येकीची पत्र पो आहे ते पावते कर्णे आणि पुण्यातील व मुमईचे बोलण्याचे बातमी विसी पेशजी तुम्हास हुकुम गेले त्या प्रमाणे बातमी लागून गोरनर साहेबास कळवणे व इकडे वरचेवर लेहून पा जाणे व माहीतगारीचे बोलण्या विसीची

२०: पारसनीस संग्रह रु. १, फा. ८·१५, ता. २६ जुलै १८३० व तत्रैव पत्र क्र. ११·-तारीख ?

याद तुम्हाकडे काल रा। जालीच आहे व अकलकोटचा येकंदर बंदोबस्त केला त्याचे– मजकुराचे कारण लागल्यास बालाजीपंत नातू जवळ आहेच व तुम्ही....विनंति पत्र पोा ते पावोन कलमवार मजकूर कळो आला त्यास तुम्हास मुमईस जावे म्हणणे व खर्च बातमीचा आम्ही देऊ सांगीतले त्यास तुम्ही गेला असता बातमी फुटेल काम हाती लागणार नाही याकरिता जाऊ नये असे इकडील सलेस येते याजकरिता दुसरा रवाना कर्णे तो बाळाजी पंताचे विच्यारे....जी आसामी सांगतील ती पाठवणे आणि बातमी काढावी व कोडतात बोलणे जालीयास गोरनर साहेबानी सांगितल्यास इकडून बोलणार पाठवून बोलता येईल नाहीपेक्षा साहेब बल (वं) त च आहेत काळजी करणे कारण नाही खर्चचा मजकूर पेशजी लिहिले प्रमाणे कर्णे साहेबाकडील घेणे कारण नाही इकडील कामगार अकलकोटास होते त्याणी गाफीली केली वगैरे लिहिले त्यास इकडील बंदोबस्ताचे बुका अन्वये ते चालले हे माहीत आहेच अकल-कोटकर याची पुढे गैरनजर दिसली त्यावर बंदोबस्त लागलाच कर्णे अवघड नव्हता परंतु सरकारानी सबुरी करणे कारण ते तुफानी लोक कमज्याजती बोलतील तेव्हा जे करणे गैर राहा त्याची चलती सहजच नजरेत येईल याकरिता सबुरी जाहली हाली हा काळ पर्यंत इंग्रजी सरकारातून सबूरीच आहे तेव्हा त्या वेळेस जल्दी करण्याचे इकडून कारण कोणते सबब कामगार याजकडे गाफीली ती कोंणती त्यास हुकुमाप्रमाणे वागणे प्राप्त हे पत्र गोरनर साहेबास वाचून दाखवणे व बालाजीपंत नातूसहि कलवणे पेशजी याद कलमवाराची पाठविली ती गोरनर साहेबास वाचून दाखविली न दाखविली दाखविली नसल्यास दाखवून उत्तर काय करीतात ते लिहिणे. ”

प्रतापसिंहाला राजकारणाचे धडे कॅप्टन ग्रँट डफ कडून मिळाले होते. तो कुशल प्रशासक होता. इंग्रजाशी वागताना कसे सावधगिरीने वागले पाहिजे याची त्याला पूर्ण जाणीव होती हे वरील पत्रात त्याने कारकूनाला ज्या सूचना केल्या आहेत त्यावरून स्पष्ट होते. अकलकोटचे प्रकरण रॉबिन्सन व मालकम नोकरीवर आहेत तो पर्यंत संपावे अशी त्याची इच्छा होती. रॉबिन्सन साहेब माल्कमला काय अहवाल पाठवीत होता याची राजाला कल्पना नसे. पण माल्कमच्या सदसद्विवेक बुद्धीवर त्याचा विश्वास असावा. तो लिहितो, (हे पत्रही बहुधा नीलकंट शेषाद्रीलाच उद्देशून याच सुमारास लिहिले असावे).

“ राबीनसन साहेब याणी ल्याहवयाचे इकडील फार जीकीर असे साहेबाचे दिलात येईल परंतु गोरनर साहेब या सारीखा समजदार व दौलतदारात वागून बोज राखणार हे सर्व माहित तेव्हा आजच सर्व नडी उलगडून घेतल्या पाहिजेत नारहीत पुढे हरवक्त कंपनी सरकारात जिकर पडेल या करिता सर्व मार दिलात आणून बंदोबस्त चांगलेपणाची साहेब याचे हाते संस्थानचा बोज राहील असा बंदोबस्त करून घेणे प्राप्त सबब जिकीर करणे प्राप्त आली आहे हे दिलात यावे व साहेब समजदार आहेत तेव्हा जिकीर वाटणार नाही परंतु सर्व ताडीव अर्थ दिलात यावे म्हणून लिहिले आहे ते पुढे आसे कामात कंपनी सरकारात जिकीर हरवक्त घडू नये सबब

रसीदंट याकडून लिहविले व साहेबही विलायतीस जाणार पुन्हा येणे व्हावयाचे नाही तेव्हा बोलणेच अल आहे सदरहु प्रोा साहेबाकडून लिहीवीले आहे कलावकरिता नकल पाा आहे तुम्ही जवाब करणे तो हे धरून बोलाव."

अक्कलकोटकर आणि सातारकर यांच्यामध्ये तडजोड कशी घडवून आणावी या संबंधीची बोलणी बरेच दिवस चालली असावीत बाळाजीपंत नातूची मध्यस्ती होती. दिनकरराव मोहिते १३ सप्टेंबर १८३० रोजी पुण्याहून प्रतापसिंहास कळवितो.[२१]

"अकलकोटकराविसी आम्ही राविनसाहेब याजला सांगितले यात काही वाईट दिसत नाही. तथापि महाराजाचे मर्जी नसल्यास सातान्यास मुलास घेऊन जातच आहो तेथे गेल्यावर एखादी शकल काढू असे बोलण्यात आलेच आहे व दादानीही (बाळाजीपंत नातू) सांगितले आहे की मीही परवाचे दिवशी जाऊन सरकारचे मर्जीप्रमाणेच शकल काहाडू तो आजच बोललो असतो परंतु साहेब लोक पुष्कळ होते सबब थोडकेच बोललो त्यास सेवकाचे मनांत असे की जाताच सरकारानी साहेब तेथे येईंतोपर्यंत सोईनेच घेतले पाहिजे तेथे आल्यावर सरकार मर्जीप्रमाणे करून दिल्यावाचून तोडच नाही कारण की शिफारस पत्र घेऊन सरकार मर्जी नीट राखून पुढे जावयाचे सबस मी लिहिले आहे आणि आताच जर नेट बसविले असता येथूनच रसीडंट याजला लिहितील की मी बोललो हे सरकारनी ठरवावे म्हणजे मी येईन त्यास असे त्यानी म्हटल्यावर पुढे कलमे उगवून घेण्यास अवघड पडेल याजकरिता विनंती लिहिली आहे त्यास सातारियास आल्यावर त्यावेळेस सरकारची मर्जी मोडन जातील असे दिसत नाही."

शहाजीराजे सोलापूरास रेसिडेन्टाला जाऊन मिळाले. तेथून त्यांना पुण्यास नेण्यात आले होते व तेथून त्यांना सातान्यास नेण्यासंबंधी वाटाघाटी चालल्या होत्या. सातान्यास जाण्यासंबंधी शहाजीराजांचे मन वळविले असावे. परंतु २३ सप्टेंबरच्या यादीवरून[२२] अगदी निघण्याच्या सुमारास न जाण्याचा हट्ट धरला होता असे दिसते.

"अकलकोटकर आज प्रात:काली निघोन सातारियास चालते व्हावयाचा करार असता बेकरार होऊन आम्ही जात नाही बंदोबस्त पहिल्याप्रमाणे करून द्यावा व सालमजकुरी जाणे माफ करावे असे तऱ्हेचे बोलणे पडले हे समजल्यानंतर राजश्री बालाजीपंतदादा सूर्योदयी गारपिराहून जाऊन साहेबास जाहीर केले त्याचे हुकमाने अकलकोटकर याजकडे गेले त्यास समजोन सांगितले शाहाजी बोवा न बोलता बाईजवळ आत गेले. बाईस दादानी समजोन सांगितले त्याचे साफ म्हणणे पडले ते

१. पहिल्याप्रमाणे बंदोबस्त महालसुद्धा आमचा करून द्यावा.

१. साल मजकुरी आम्ही सातारियास जात नाही व त्या इलाख्यात आमचा परिणाम नाही.

---

२१. भा. इ. सं. मं. संग्रह सातारा दप्तर.

२२. भा. इ. सं. मं. संग्रह सातारा दप्तर.

१. सातारियात आम्हास कैदेत ठेवावयास माहाराज सरकारातून घरे तयार करून ठेवली आहेत त्यास येथेच आम्हास कैद करावे पाहिजे तिकडे जाऊ परंतु सातारियास जाणे नाही.

१. अकलकोटी आमचे कारखानदार कारभारी याजकडील कामे बंद केली. पाहाऱ्यात दिल्हे तेव्हा पुढील परिणाम आम्हास कळतच आहे.

१. आम्ही पुण्यास आलो साहेबाचे भरवशावर आलो साहेबानी जे पाहिजे ते करावे आम्ही जिवंत सातारियास जात नाही सारे गळे कापून मरून जाऊ.

१. आमची आब्रू मागे राहिली नाही असे नाना प्रकारचे मुद्दे घातले.

६

येणे प्रमाणे मजकूर दादानी सरकारात जाहीर केला लेजिट साहेब याणी गवरनर यास लिहिले त्यास या माणसाचा अनभव आला.

१ गवरनर साहेब याचा हुकुम येऊन दादा व एजंट सो त्याजकडे गेले बाईनी कवाडास कडी घालून खोलीत मुलासुद्धा बसली २०० संत्री जाऊन त्याचे वाड्यातील दरोबस्त संत्रीनी बाहेर काढली मेणा नेला व हाती धरून मेण्यात घालावयास पुण्याहून दादाकडील कुणीबिणी नेल्या त्याजवरून चार घटका घोळ होऊन तिसरे प्रहरी ठरले की शाहाजी बावास प्रातःकाली न्यावे लहानमुले व बाई पुण्यात राहावी नंतर माणसाची मोकळीक जाहाली १०० संत्री राहून बाकी मुकामास गेले.

१ उदईक शुक्रवारी चालते जाहाल्यास उत्तम नाहीतरी जे होईल ते लिहीन त्याची हुरमत कोणती राहिली नाही बहुत शोभा होऊन नाखूष साहेब जाहले आपले मोठेंपणाकरिता व लिहिणे खरे व्हावयाकरिता विचार करीत आहेत."

'सातारियास जाणे नाही' हा अकलकोटकराचा निश्चय काही सफल झाला नाही. या सर्व प्रकरणात कंपनी सरकारास सातारकरांची बाजू पटलेली दिसते. अकलकोटकरांसंबंधी कंपनीने कडक धोरण स्वीकारले आहे. याचे कारण या बंडाच्या मुळाशी तुळजाबाई असावी असा कंपनी सरकारचा संशय असावा. प्रतापसिंहाच्या रोजनिशीत अशी नोंद आढळते की,[२३] "जिमिसन सो बोलले की शहाजी चांगला आहे परंतु तुलजाबाई फार फिसाद सिकिवती सबब रसिदंट याणी आम्हास लिाा की बाईस माहेरी पोचवून खर्चापुरते द्यावे परंतु दोन महिने वाट पाहून ती चाल नीट न दिसे तरी बाईस पोचऊन देऊ असे बोलले" 'जिमिसन' (जेम्सन) म्हणजे कंपनीने बंडाव्याच्या चौकशी साठी नेमलेला अधिकारी. यांनी अल्पकाळात अक्कलकोटांत सुव्यवस्था निर्माण केली.

सातारकरापासून फुटन निघण्याचा प्रयत्न १८३० साली असफल झाला. पण पुढे १८३९ साली कंपनीने प्रतापसिंहालाच पदच्युत केले, आणि त्याच्या अंकित असलेले सर्व जहागिरदार आपल्या अंमलाखाली आणले.

---

२३. पेशवे दप्तर भाग ४२, पत्र क्र. ६२, ता. ५–१–१८३१

५५०

Conditions of Social life as depicted in the Brahman literature : Dr. V. V. Bhide.

The Brahmnas constituste an important organ of the Vedic iteratu re. They mainly deal with the procedural aspect of the various sacrifices. However one can get references to the conditions of social, religious and political life of the ancient Indian people. These re ferences throw much light on the education, diet, drinks, occupations, recreations, the position of women, and the economic life of our forefathers. An attempt has been made to present an account of the ancient Indian Society as depicted in the Brahmana literature.

' Sakaḷakaḷekṛta Śivakāvya ' by R. P. Goswami.

Śivakāvya of Saṅkarṣaṇa Sakaḷakaḷe, whose period is uncertain, is an unpublished Sanskrit work on Shivaji's life. Present version is based on a single manuscript which consists of 16 cantos, beginning with 2nd upto the 17th, available in the Bharat Itihas Samshodhak Mandal's collection. This portion describes the life of Shivaji from 1656 A. D. to 1664 A. D. The detailed description of his north Konkan expedition occurs in this portion. The most important contribution of this work is that it reveals Shivaji's relations with the Rajput King Karṇa of Bikaner, who was one of the top officials of Aurangzeb in the Deccan. Selected passages of historical importance from the original text are reproduced with a short critical introduction.

The Akkalkot Prakarna : by Dr. A. R. Kulkarni.

This article deals with the resistance given by the Zamindars of Akkalkat to the officers of the Raja of Satara. During the period of Regency, the Raja of Satara, established his administrative control over Akkalkot. But the treatment accorded by his officers to the infant Raja of Akkalkot and the Zamindars was strongly resented by the pople in 1830. The rebels captured the town and the fort, though the combined forces of Satara and the Company ultimately suppressed this revolt. This event has been narrated in this article with the help of original documents.

Prof. R. V. Oturkar : by. D. K. Deshpande.

A briet account of Prof. R. V. Oturkor's life and activities is given in this article

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिकाची केंद्र सरकारच्या नियमानुसार द्यावयाची माहिती (१९५६ चे नियम, नियम ८, नमुना ४)

१. प्रकाशनस्थळ—भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें ३०.

२. प्रकाशनकाल—त्रैमासिक (सध्या वार्षिक).

३. मुद्रकाचें नांव, राष्ट्रीयत्व व पत्ता } अ. रा. कुलकर्णी, चिटणीस, भारतीय, १३२१ सदाशिव पेठ, पुणें ३०.

४. प्रकाशकाचें नांव, राष्ट्रीयत्व व पत्ता } अ. रा. कुलकर्णी, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें ३०.

५. संपादकाचें नांव, राष्ट्रीयत्व व पत्ता } अ. रा. कुलकर्णी, (कार्यकारी), भारतीय, भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणे ३०.

६. मालक व पत्ता—भारत इतिहास संशोधक मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें ३०.
मी चिटणीस प्रकट करतों कीं, माझी माहिती व विश्वास याप्रमाणें वर दिलेला तपशील अचूक आहे.

११–३–७४

अ. रा. कुलकर्णी
चिटणीस

हे त्रैमासिक डॉ. अ. रा. कुलकर्णी, यांनीं लोकसंग्रह मुद्रणालय, १७८६ सदाशिव पेठ, पुणें येथें छापून भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें ३०, येथे प्रसिद्ध केलें.